३ कडक वेळेची मर्यादा पाळली पाहिजे आणि ती योग्य स्तरावर दिली जावी.

४ ब्लॉक व जिल्हा स्तरीय योजना ई-ग्राम स्वराज वर अपलोड कराव्यात आणि या योजनाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी योग्य साफ्टवियर वापरावे.

5 नागरी (civil) कामाचे भौगोलिक जियो-Taging अनिवार्य झाले पाहिजे.

6 सामाजिक नियोजन संबधित कार्याची कागदपत्रे सक्तीने अपलोड करणे आवश्यक आहे.

**३.५.७ पुनरावलोकन (Monitoring). देखरेख आणि मुल्यांकन**

१ खंड ५.१६ आणि खंड ६.१६ मध्ये वर्णन केल्यानुसार बीडीपी आणि डीडीपी मध्ये सुधारणा व व्यवस्थापनठेवण्यासाठी देखरेख समिती स्थापन केली जाईल.

२ खंड आणि जिल्हा पंचायत मार्फत केल्या जाणा-या कार्यामधील कमीत कमी २० % कामाचे सामाजिक लेख परीक्षण केले जाणे बंधनकारक आहे.

३ कांही मान्यता प्राप्त राज्य आणि जिल्हास्तरीय संस्थाद्धारे तृतीय पक्षाचे मुल्यांकन

### ३.५.८ कार्य निष्पादन प्रोत्सान

१ योजनेची कामगिरी व अंमलबजावणीच्या आधारे उत्कृष्ट कामगिरी करणा-या गट आणि जिल्हा यांना पुरस्कार.
२ सामाजिक नियोजना अंतर्गत सामाजिक दृष्ट्या संबधित प्रासंगिक कार्य समाविष्ट करण्यासाठी आय आणि डीपी यांना विशेष प्रोत्साहन.
३ महिला आणि मुलासाठी सर्वात अनुकूल आयपी आणि डीपी यांना विशेष पुरस्कार.
४ अभिनव प्रयोगासाठी विशेष पुरस्कार.

### ३.६ गट आणि जिल्हा विकास योजनासाठी अंतिम मुदत

१ प्रत्येक वर्षी योजना तयार करण्याचे अभियान उच्च पातळीपासून म्हणजे राज्य सरकार स्तरापासून सुरु केले जाईल.
२ मोहिमेच्या सुरुवातीस तपशीलवार कालावधी निर्दिष्ट केला जाईल.
३ राज्य सरकारने, मोहिमे दरम्यान होणारी प्रत्येक कामे कांही कालावधीत पूर्ण केली पाहिजेत,ते सुनिश्चित करण्यात यावे लागेल.
४ कार्य प्रणाली नुसार कल्पना करून, परिस्थितीचे विश्लेषण करणे, भागीदारी योजनेच्या विकासावर वस्तू स्थितीचा अहवाल तयार करणे, गरजेप्रमाणे योजनांना प्राधान्य क्रम देणे, आणि नियोजित वेळेत योजनांना मान्यता देऊन समयबद्ध पद्धतीने कामपूर्ण करण्याची आवश्यकता आहे.
५ ब्लॉक डेव्हलपमेंट योजनेची अंदाजे टाइम फ्रेम खालील प्रमाणे असू शकते.

**तक्ता- २ पंचायत समिती विकास योजनेसाठी अंदाजित कालावधी**

| अक्र | कार्यवाही करण्याच्या बाबी | कालावधी |
|---|---|---|
| १ | खंड पंचायतीच्या बैठकीत योजना प्रक्रियेची सुरुवात | नोव्हेबर मध्ये |
| २ | क्षेत्र निहाय डेटा संकलन व स्थितीचे विश्लेषण | डिसेंबर पर्यंत |
| ३ | क्षेत्र निहाय प्राथमिकता व क्षेत्रातील कार्य समूहांना निधी वाटप | ७ जाने.पर्यंत |
| ४ | क्षेत्र निहाय योजनेचा प्रारूप,आणि बजेट तयार करणे व खंड विकास योजना प्रारूप आणि खंड पंचायत चे बजेट मध्यवर्ती पंचायत योजना समिती/ स्थायी समिती च्या बैठकीमध्ये सादर करणे | १० जाने.पर्यंत |
| ५ | खंड पंचायतीच्या योजनेचा प्रारूप आणि बजेट विशेष खंड सभेच्या बैठकीमध्ये सादर करणे | १५ जाने.पर्यंत |
| ६ | प्रारूप योजना आणि मध्यवर्ती पंचायतचे बजेट मान्यतेसाठी खंड सभेच्या बैठकीमध्ये सादर करणे | ३१ जाने.पर्यंत |

जिल्हा विकास योजनेसाठी अंदाजित कालावधी खालील प्रमाणे असेल

**तक्ता-३ विकास योजनेसाठी अंदाजित कालावधी**

| अ क्र | कार्यवाही करण्याच्या बाबी | कालावधी |
|---|---|---|
| १ | जिल्हा बैठकीत नियोजन प्रक्रिया आरंभ | डिसेंबर मध्ये |
| २ | प्रदेश निहाय डेटा संग्रह, संकलन आणि परिस्थिती विश्लेषण | जाने.पर्यंत |
| ३ | क्षेत्र निहाय प्राधान्य क्रम आणि क्षेत्रीय कार्य गटाला निधी वाटप | ७फेब्रु पर्यंत |
| ४ | प्रदेश निहाय प्रारूप आराखडा आणि अर्थसंकल्प तयार करणे खंड विकास योजनेचा प्रारूप आणि खंड पंचायतीचे बजेट मध्यवर्ती पंचायत योजना समिती/ स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सादर करणे | १०फेब्रु पर्यंत |
| ५ | जिल्हा पंचायत योजनाचा प्रारूप आणि बजेट विशेष जिल्हा सभेमध्ये सादर करणे | १५ फेब्रु पर्यंत |
| ६ | प्रारूप योजना आणि जिल्हा पंचायत चे बजेट मान्यतेसाठी जिल्हा सभेच्या बैठकीसादर करावे. | फे.अखेर पर्यंत |

## प्रकरण ४ थे

# जिल्हा परिषद व पंचायत समिती नियोजनाच्या एकत्रिकरणासाठी महत्वाचे कार्यक्रम, क्षेत्रे, विषय आणि समस्या

ग्रामीण भागासाठी पंचायत समिती विकास आराखडा (BPDP) आणि जिल्हा विकास योजना (DPDP) अनुक्रमे पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांनी आपापल्या भागासाठी तयार करणे आवश्यक आहे. जेणे करून आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय मोहीम राबविता येईल, आणि केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे कार्यक्रम राबविता येतील. बीडीपी आणि डीडीपी यांनी फक्त योजनाचाच विचार केला जाऊ नये तर त्या क्षेत्राच्या वेगवान बहु आयामी एकीकृत समाकलीत विकासासाठी आवश्यक केंद्रित व्यापक विकास योजना समजून घेणे गरजेचे आहे. म्हणूनच महत्वाचे कार्यक्रम, क्षेत्रे, आणि मुद्दे बीडीपी आणि डीडीपी मध्ये एकत्रित केले जाणे आवश्यक आहे. या व्यतेरिक्त घटनेच्या ११ व्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध २९ विषयाशी संबधित गरजा योग्य त-हेने या योजनाच्या माध्यमातून पूर्ण केल्या पाहिजेत. दारिद्रय, ग्रामीण औद्योगिकरण, शेतकऱ्याच्या उत्पनात वाढ,पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छता, पर्यावरण आणि हवामान बदल, योजनाचा लाभ मिळवून देण्याची लैंगिक समानता, मुलाच्या आणि कमकुवत घटकाच्या पोषण विषक गरजा, आणि असुरक्षित गट यांना नियोजनामध्ये उच्च प्राथमिकता देण्यात यावी. या व्यतेरिक्त विकासात्मक गरजा ओळखण्यासाठी मिशन अंत्योदय डेटा आणि जीपिडीपीला, बीडीपी आणि डीडीपी मध्ये एकत्र केले जावे.

### ४.१ जीपिडीपी, मिशन अंत्योदय डेटा एकत्रीकरण आणि विकास आवश्यकताची ओळख आणि प्राथमिकता

ग्रामपंचायत विकास योजना (जीपिडीपी) ही संबधित ग्रामपंचायत क्षेत्राची (एम ओपीआर, २०१८) बहु-आयामी आणि समाकलित विकासासाठी एक आवश्यकता वर आधारित व्यापक विकास योजना आहे. या फ्रेमवर्कच्या कलम ४.१.३ मध्ये हि बाब अधोरेखित करते कि जीपिडीपीसाठी विविध प्रकारचा डेटा एकत्रित केला जातो. घटनेच्या ११ व्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध २९ विषयाशी संदर्भात विकासातील अंतर शोधण्यासाठी मिशन अंत्योदय (एम ए) डेटाचा वापर केला जातो. हा व्यायाम व्यापक आहे. जन योजना, जीपिडीपी तयार करण्याच्या मोहिमेचा एक भाग असून प्रत्येक वर्षी तयार्कारण्यात येते. ग्रामीण विकास मंत्रालय गेल्या तीन वर्षापासून खेडे व ग्रामपंचायतीमध्ये मिशन अंत्योदय (एम ए) सर्वेक्षण करीत आहे. एम ए सर्वेक्षणातील ओळखले गेलेले विकासात्मक अंतर जीपिडीपी तयार करण्यासाठी महत्वपूर्ण माहिती आहे. सर्वेक्षण अनुबंध-३ मध्ये दिलेल्या प्रश्नावलीवर आधारित आहे. प्रत्येक गाव आणि ग्रामपंचायतीच्या विश्लेषणा मध्ये महत्वपूर्ण विकास अंतराल यामध्ये गंभीर अंतराल, मध्यवर्ती व सामान्य अंतराळ यामुळे विकासा संबधी च्या समजू शकतात. आणि जीपिडीपी त्या दूर करण्याकडे लक्ष देण्यावर भर देते. हे आकृती-७ मध्ये कार्यक्रम निहाय दर्शविले गेले आहे.

आकृती-७ मिशन अंत्योदय (एम ए) सर्वेक्षण द्धारे ओळखल्या गेलेल्या विका सा संबधी गरजा आणि त्या प्लान प्लस मध्ये अपलोड केले गेलेल्या जीपिडीपी द्धारे दूर कराव्यात

मिशन अंत्योदय डेटा ब्लॉक पंचायत व जिल्हा पंचायत स्तरावर एकत्रित करणे आवश्यक आहे, जेणे करून ते आपापल्या भागातील विकासाच्या गरजा ओळखू शकतील. याकरिता जीपिडीपीला हि माहिती एकत्रित करण्याची गरज आहे. जेणे करून हे कळू शकेल कि बीडीपी आणि डीडीपी यांना कोणत्या विकासाची आवश्यकता आहे,आणि कोणती कामे अद्याप पूर्ण करणे आहे. ब्लॉक स्तरावर विकासातील अंतराचे एकत्रीकरणावरून विकासात्मक गरजा ओळखल्या जातील आणि बीडीपीने त्याचे निराकरण करण्यासाठी बीडीपीमध्ये प्रस्तावित केलेल्या कामासह या आवश्यकता समायोजित केल्या जातील. जे कि बीडीपीद्धारे त्यांचे समाधान करण्यात येईल. यातून कांही गरजा ज्याचे समाधान बीडीपीच्या प्रस्तावित प्रक्रियेमुळे होऊ शकले नाही, तर ते डीडीपी च्या गरजा समजल्या जातील.या व्यतेरिक्त स्थानिक विश्लेषनाद्धारे गरजाची स्थानिक ठिकाणे शोधण्यात देखील मदत होईल. गरजा एका ग्रामपंचायतीशी किंवा एका पेक्षा जास्त ग्रामपंचायतीशी आहेत कि नाहीत हे शोधणे आवश्यक आहे तसेच गरजाच्या अपरिहार्यतेचे मुल्यांकन करणे देखील महत्वाचे व आवश्यक आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे ब्लॉक आणि जिल्हा पातळीवरील जीपिडीपी आणि मिशन अंत्योदय डेटा आपापल्या क्षेत्रातील गरजा ओळखण्यास मदत करेल.या गरजा कृतीच्या अनिवार्यतेनुसार आणि ज्या पंचायत आवश्यकतासाठी ओळखल्या गेल्या आहेत त्यांच्या संख्येवर आधारित प्राधान्य दिले जाऊ शकते. म्हणून, संबधित साफ्टवेअर आणि जीआयएस प्लाटफार्म वरील डेटा एकत्रित केल्याने प्रस्तावित क्रीयाकलपाचे स्थान शोधण्यात आणि संभाव्य परिणामाचे मुल्यांकन करण्यात मदत होईल. हे परिस्थितीच्या विश्लेषणामध्ये सुस्पष्टता आणेल, बीडीपी आणि डीडीपी मधील प्रस्तावित क्रिया / प्रोजेक्टची प्राथमिकता निश्चित करेल. जीआयएस प्लाटफार्म वरील डेटा विशिष्ट विश्लेषण म्हणजे मागील वर्षातील घटनाच्या विश्लेषणास मदत होईल.

### ४.२ पंचायत सक्षमिकरणासाठी वित्त आयोग अनुदान

राज्य घटनेच्या ७३ व्या दुरुस्ती अंतर्गत अनुच्छेद २८० (३) (खख) याचा समावेश करण्यात आला होता, त्या अंतर्गत केंद्रीय वित्त आयोगाने राज्यातील एकत्रित निधी वाढविण्यासाठी शिफारस करावी लागते. जेणे करून राज्याच्या शिफारशीच्या आधारे पंचायतीच्या संसाधनामध्ये पूरक मदत करू शकेल. ग्रामीण स्थानिक संस्थाच्या निधीत (आरएलबीज) बदल करण्याच्या शिफारशी दहाव्या वित्त आयोगाने (१९९५ ते २००० पासून) सुरु केल्या. १२ व्या वित्त आयोगा पर्यंत (२००५ ते २०१० ) आरएलबीज कडे नाममात्र रक्कम हस्तांतरित केली गेली (तक्ता-४).

**तक्ता-४** १० व्या ते १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार केंद्र सरकारकडून ग्रामीण स्थानिक संस्थाना हस्तांतरित केलेला निधी

| वित्त आयोग | कालावधी | वाटप (रु करोड ) | वितरीत (रु करोड ) |
|---|---|---|---|
| १० वा | १९९५ ते २००० | ४,३८०.९३ | ३,५७६.३५ |
| ११ वा | २००० ते २००५ | ८,०००.०० | ६,६०१.८५ |
| १२ वा | २००५ ते २०१० | २०,०००.०० | १८,९२६.७९ |

आयोगाने, प्रचलीत पद्धती शिवाय थोडे पुढे जाऊन एक मुलभूत मौलिक शिफारस केली त्यानुसार तिन्ही स्तरावरील पंचायतराज संस्थासाठी एक लहान एक रक्कमी निधी देण्या ऐवजी विभाजित रक्कमेच्या निश्चित टक्केवारीमध्ये निधी देण्याची शिफारस केली. क) विभाज्य पूल रक्कमेच्या १.५ % मुलभूत अनुदान आणि ख) कामगिरी अनुदान, २०११-१२ पासून सुरु करण्यात आले असून ४ वर्षाच्या कालावधीसाठी शिफारस केली आहे. यात पहिल्या वर्षी विभाज्य पूल रक्कमेच्या १.५ % आणि उर्वरित तीन वर्षाकरिता प्रत्येक वर्षातील विभाज्य पूल रक्कमेच्या १.० % अनुदान दिले गेले. आयोगाने २० रु. प्रती व्यक्ती दराने एक विशेष क्षेत्र मुलभूत अनुदान देण्याची शिफारसहि आयोगाने केली होती. याची गणना ५ व्या आणि ६ व्या अनुसूची क्षेत्रात आणी संविधानातील भाग ९ आणि ९ए मधील मुक्त क्षेत्रासाठी पुरस्कार, पुरस्कार कालावधीत प्रत्येक वर्षातमुलभूत अनुदानाच्या आधारावर केली होती. आयोगाने या क्षेत्रासाठी २०११-१२ करिता मुलभूत अनुदान प्रती व्यक्ती रु १० आणि त्यानंतरच्या वर्षासाठी प्रती व्यक्ती रु २० विशेष क्षेत्र निष्पादन अनुदान देण्याचेही आयोगाने शिफारस केली होती. १३ व्या वित्त आयोगा द्धारा वाटप रक्कम रु ६५,१६०.७६ करोड या वाटपा पैकी ५८,२५६.६३ करोड वितरीत केले गेले.

चौदाव्या वित्त आयोगाने (एफएफसी) राज्य घटनेच्या भाग ९ मधील तरतुदी प्रमाणे स्थापन झालेल्या देशातील ग्रामपंचायती साठी रु २,००,२९२.२० कोटी ची शिफारस केली जी प्रती वर्ष प्रती व्यक्ती ४८८ रु होती. या रक्कमेपैकी १,८०,२६२.९८ कोटी रुपये (९० %) २६ राज्यासाठी मुलभूत सुवीधासाठी अनुदान आणि २००२९.२२ कोटी रुपये (१० %) निष्पादन अनुदान होते. भाग नऊ वगळता इतर क्षेत्र जिथे पंचायत अस्तित्वात नाही (मिझोरम,मेघालय, नागालड,आणि सहाव्या अनुसूचीमध्ये आसाम, (बोडोलंड, उत्तरी काछार आणि कार्बी अलोंग जिल्हे) त्रिपुरा आणि मणिपूर चे पर्वतीय क्षेत्र ज्यासाठी जिल्हा परिषद आहेत) यासाठी अनुदानाची शिफारस केली गेली नाही. तथापि भारत सरकारने या भागासाठी कांही अनुदान दिले.यावरून वेगळा दृष्टीकोन स्वीकारून १४ व्या वित्त आयोगाने विश्वास आधारित दृष्टीकोन स्वीकारला आणि अशी शिफारस केली कि इतर स्तराचा समावेश न करता थेट निधी ग्रामपंचायातीना हस्तांतरित करण्याची शिफारस केली, कारण मुख्यत: ग्रामीण नागरिकासाठी मुलभूत सेवा पुरविणे यासाठी ग्रामपंचायती जबाबदार आहेत. प्रदान केलेल्या अनुदानाचा उपयोग, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, रेन वाटर हार्वेस्टिंग, सामुदायिक मालमत्तेची देखभाल, रस्ते, पदपथ आणि पथदिव्यासह देखभाल,मुलभूत सेवाच्या सुविधेत सुधार, स्मशानभूमी बांधणे व व्यवस्था राखणे, आणि कायद्यानुसार ग्रामपंचायतीला सोपविण्यात आलेल्या कार्यांतर्गत करावयाच्या कामाकरिता निधी खर्च करण्यात यावा. ग्रामपंचायतीला वाटप केलेल्या रक्कमेच्या १० % रक्कम प्रशासकीय, तांत्रिक

बाबीवर, भांडवली व्ययावर खर्च करण्यास परवानगी होती. १४ व्या वित्त आयोगाच्या २०१५-१६ ते २०१९-२० कालावधी मध्ये १,८०,२३७.०६ कोटी वितरीत केले गेले आहेत, जे १३ व्या वित्त आयोगाच्या मुदतीत जाहीर झालेल्या रक्कमे पेक्षा तिप्पट होती.

१५ व्या वित्त आयोगाने २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा पहिला अहवाल सादर केला आहे, आणि स्थानिक संस्थाच्या संदर्भात भारत सरकारने आयोगाच्या शिफारशी मान्य केल्या आहेत. १५ व्या वित्त आयोगाने ग्रामीण स्थानिक स्वराज संस्थाना बंधित आणि अबंधित अनुदानाची शिफारस केली आहे. १५ व्या वित्त आयोगाचा सह्य्यता निधी गैर भाग – ९ राज्य आणि पाचव्या आणि सहाव्या अनुसुसुची भागातील पारंपारिक संस्था यांचा समावेश आहे. पंचायतराज च्या सर्व स्तरासाठी दोन भागामध्ये तरतूद वाटप केली आहे १) ५० % अबंधित अनुदान २) ५० % बंधित अनुदान याप्रमाणे आहे, ग्रामीण स्थानिक संस्था प्रशासकीय खर्चा शिवाय स्थानिक आवश्यक गरजाकरिता खर्च करू शकतात. अबंधित अनुदान मुलभूत सेवा करिता खर्च करता येईल, जसे कि क) स्वच्छता व खुले शौच मुक्त (ओडीएफ) स्थिती राखण्याचे काम ख) पिण्याचे पाणीपुरवठा, जलसंधारण,जल पुनर्वापर.परंतु ग्रामीण स्थानिक संस्थाने प्रथम श्रेणीतील गरजा पूर्ण झाल्या तर या बंधित निधीची तरतूद इतर श्रेणीसाठी खर्च करू शकतो. १५ व्या वित्त आयोगाच्या कालावधीसाठी एकूण अनुदान रुपये ६०,७५० कोटी असेल.

केंद्र शासनाकडून दिलेल्या १५ व्या वित्त आयोगाच्या अबंधित अनुदानाचे वितरण, राज्य द्धारा राज्य वित्त आयोगाची (एसएफसी) मान्यता प्राप्त स्वीकृती आणि १५ व्या वित्त आयोगाने सुचविलेल्या पुढील कृतीच्या अनुषंगाने केले जाऊ शकते.

१ ग्राम / गाव पंचायातीकरिता ७० ते ८५ टक्के

२ खंड / मध्यवर्ती पंचायातीकरिता १० ते २५ टक्के

३ जिल्हा पंचायातीकरिता ५ ते १५ टक्के

४ ज्या राज्यात फक्त खेडे व जिल्हा पातळीवर द्विस्तरीय पंचायत यंत्रणा आहे तेथे ७० ते ८५ टक्के वाटप ग्राम / गाव पंचायातीकरिता १५ ते ३० टक्के जिल्हा पंचायातीकरिता करण्यात येईल.

राज्यातील एक श्रेणीतील संस्थामध्ये अंतरस्तरीय वितरण ९० -१० च्या प्रमाणात किंवा नवीन एसएफसी च्या स्वीकृत शिफारशी प्रमाणे लोकसंख्या आणि क्षेत्र या आधारावर करण्यात आले पाहिजे. गैर भाग -९ मध्ये पारंपारिक संस्थासाठी, राज्याच्या ९०-१० या प्रमाणात जनसंख्या आणि क्षेत्र या आधारावर अनुदान वाटप केअवे लागेल.

आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये एफएफसी अनुदान जून आणि आक्टो. महिन्यात दोन हप्त्यामध्ये दिले जाईल.केंद्र सरकारकडून त्यांच्या खात्यात जमा झालेल्या तारखेपासून १० दिवसाच्या आत राज्यांना स्थानिक ग्रामीण संस्थाना ग्रामीण अनुदान द्यावे लागेल. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना देय अनुदानातून कोणत्याही प्रकारची कपात केली जाऊ नये. विलंब झाल्याच्या बाबतीत राज्य सरकारला व्याजासह हप्ता सुरु ठेवावा लागेल, व्याजाचा दर, राज्य, स्वताच्या निधीतून मागील वर्षी राज्याच्या कर्जावर दिलेल्या व्याज दरा प्रमाणे असेल.

## प्रकरण ५

# पंचायत समितीने पंचायत समिती विकास आराखडा तयार करणे

भारतीय राज्य घटना अनुच्छेद 243G अन्वये केंद्र, राज्य आणि पंचायतींच्या भौगोलिक क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे / योजनांचे एकत्रिकरण आणि समाकलन करून आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी पंचायत समिती विकास आराखडा (BDP) तयार करण्यास पंचायत समितींना आदेशीत केलेले आहे. या चौकटीच्या कलम १.२ मध्ये नियोजना संदर्भातील घटनात्मक तरतुदींचा तपशील देण्यात आला आहे. शिवाय, स्थानिक प्रशासन म्हणून स्थानिक नागरिकांना मूलभूत सेवा पोहचविणे आणि त्यांच्या भागातील गरीब व उपेक्षित घटकांच्या सुरक्षिततेकडे लक्ष देणे ही त्या स्थानिक प्रशासन व पंचायत समितींचीही जबाबदारी आहे. उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम आणि जबाबदारीने वापर करून आणि त्यांची गरज भागविण्यासाठी संसाधनांचा विस्तार करून सर्वसमावेशक योजनेच्या अंमलबजावणीद्वारेच हे साध्य केले जाऊ शकते. तसेच हे सुनिश्चित केले पाहिजे की त्यांच्या कामांची नक्कल ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषदा व इतर संबंधित विभागांमार्फत हाती घेतलेल्या / हाती घेणार असलेल्या कामांद्वारे केली जाऊ नये.

मागील अडीच दशकांत राज्य व केंद्र शासनाकडून पंचायत समिती स्तरावर सहभागात्मक नियोजन प्रक्रियेस प्रोत्साहित करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. तथापि, अपुरी संसाधने, कमी लोकसहभाग, कमी क्षमता इ. सारख्या विविध आव्हानांमुळे सर्वसमावेशक आणि दूरदर्शी पंचायत समिती विकास आराखडा (BDP) तयार होण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. तथापि, पंधराव्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या अनुदानाद्वारे भारत सरकार आणि राज्य सरकारांच्या सक्रिय सहभागामुळे पंचायत समिती विकास आराखडाच्या (BDP) नियोजनास निश्चितच चालना मिळेल. म्हणूनच, आता सहभागीय आणि सर्वसमावेशकासह पंचायत समिती आराखडा तयार करण्याची वेळ आली आहे.

पंचायत समिती विकास आराखडा तयार करणे ही निश्चित ठरवून दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करण्याची प्रक्रिया आहे. ती टप्या टप्याने पूर्ण होणाऱ्या साखळी योजनांच्या प्रक्रियेचा एक भाग आहे. तक्ता २ मध्ये नमूद केलेल्या मुदतीनुसार ग्रामपंचायतींनी त्यांच्या क्षेत्रातील ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) पूर्ण केल्यानंतर पंचायत समिती विकास आराखडा तयार होणे अपेक्षित आहे. तथापि पंचायत समित्यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) पूर्ण होईपर्यंत प्रतीक्षा करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी जिल्हा विकास आराखड्यासाठी आवश्यक ती सर्वसमावेशक माहिती आराखड्यासह उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. उपलब्ध स्त्रोतांचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करून, लोकांच्या मुलभूत सेवा, गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून पंचायत समिती विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. हे सहभागी, समावेशक आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे पूर्ण करणे शक्य आहे.

पंचायत समिती विकास आराखडा दीर्घकालीन (दृष्टीकोन योजना) स्वरुपाची (आदर्शपणे पाच वर्षासाठी) आणि परिचालन योजना असावी, की जी एका वर्षामध्ये अंमलबजावणी योग्य असेल व पंचायत समिती सभेने अग्रक्रम ठरविलेल्या बाबींना विचारात घेऊन तयार केलेली असेल.

पंचायत समित्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक क्षमता यांचा विचार करून अश्याच मध्यम प्रकारच्या योजना हाती घ्याव्यात कि ज्यावर योग्य ती अंमलबजावणी करून देखरेख करणे शक्य असेल. याव्यतिरिक्त, पंचायत समितीने अशीच कामे घ्यावीत की, त्यामुळे दोन किंवा त्याहून अधिक ग्रामपंचायतीना लाभ होईल. कारण क्षेत्रीय स्तरावर पंचायत समिती दोन किवा अधिक ग्रामपंचायतीसाठी मंजूर उपक्रमांची योग्य ती आखणी व अंमलबजावणी करू शकते (MOPR, 2020). केवळ अपवादात्मक परिस्थितीत पंचायत समिती एकाच

ग्रामपंचायतीमध्ये काम मंजूर करू शकेल.

### ५.१ पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया

पंचायत समिती विकास आराखडा ग्रामपंचायत स्तर ते पंचायत समिती स्तर अशा निम्नस्तराकडून उर्ध्व स्तराकडे सहभागी, सर्व समावेशक आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे तयार केला जाऊ शकतो. प्रकरण 4.1 मध्ये वर्णन केल्यानुसार मिशन अंत्योदय योजनेच्या उपलब्ध माहितीद्वारे ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) मध्ये असणारी विकासात्मक दरीचा अभ्यास करुन सदर आराखडा तयार करता येऊ शकतो. यामधील ग्रामपंचायतींद्वारे समाविष्ट केलेले मुद्दे तसेच नियोजित केलेले मुद्दे आराखडयातुन वगळता येऊ शकतात. अशा प्रकारे पंचायत समिती विकास आराखडा प्रक्रिया गरजानुरुप नियोजन करुन ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) आराखडयास पूरक भूमिका पार पाडतील. या बरोबरच राष्ट्रीय पातळीवरील वचनबध्दता उदा. शाश्वत विकास ध्येय व प्राथमिकता यांनांही योगदान देण्याचा प्रयत्न करेल. तालुकास्तरावरील क्षेत्रिय कार्यालये आपआपल्या विभागाशी संबंधीत विकास कामे जरी स्वत: राबवू शकत असले तरी त्यांची विकास कामे पंचायत समिती विकास आराखडयामध्ये समाविष्ठ करुन घेणे आवश्यक आहे. शासकीय, शैक्षणिक, तसेच खाजगी क्षेत्रातील तज्ञांच्या कौशल्यांचा वापर आराखडा निर्मितीच्या कार्यात करुन घेण्याचे प्रामाणिक प्रयत्न करावेत.

पंचायत समिती विकास आराखडयाची प्रक्रिया, रचना आणि स्वरूप बहुतांशी जीपीडीपी प्रक्रिये प्रमाणेच राहील. ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) आराखडे ग्रामपंचायत स्तरावर तयार करूनव मंजूर झाल्यानंतर ग्रामपंचायतीनी ते पंचायत समिती कडे पाठवावेत. पंचायत समिती स्तरावरील उच्च संस्थात्मक क्षमता आणि तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता यामुळे पंचायत समितीस प्राप्त सर्व ग्रामपंचायतींच्या जीपीडीपी मध्ये जी कामे एका पेक्षा जास्त ग्रामपंचायतीमध्ये राबविणे आवश्यक आहे, अशा कामांचा समावेश पंचायत समिती विकास आराखडयात करण्यात यावा. गटातील सर्व पंचायत समिती सदस्य, संबंधीत पंचायत समिती कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद सदस्य, गटातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच यांच्या मिळुन असणा-या समितीस “गटसभा” संबोधण्यात येईल. सदर गट सभेमध्ये तालुका विकास आराखडा चर्चेस ठेऊन मंजुर करण्यात येईल. निर्वाचित लोक प्रतिनिधींशिवाय, गट स्तरावरील सर्व विभाग प्रमुख, स्वयंसहाय्यता गटांचे अध्यक्ष, तज्ञ व्यक्ती , व्यावसायीक, डॉक्टर, अर्थतज्ज्ञ इ. यांनाही गट सभेचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात यावे (एमओपीआर, २०२०). उपरोक्त नमुद सदस्यांसह पंचायत समितीचे सभापती 50 ते 80 व्यक्तींना गट सभेचे सदस्य म्हणुन नामनिर्देशित करु शकतील. गट सभेच्या बैठकीचे अध्यक्ष पंचायत समितीचे सभापती असतील व गट विकास अधिकारी हे गट सभेचे संयोजक म्हणून नामनिर्देशित केले जाऊ शकते. असे असले तरीही राज्य सरकारकडून अधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकरणाद्वारे आर्थिक बाबींस मान्यता देण्यात येईल. पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रक्रिया पुढील प्रमाणे असेल :

i. पंचायत समिती विकास आराखडयासाठी परस्पर समन्वय आणि आराखडयांच्या प्रक्रियेची सुलभीकरण यासाठी प्रत्येक पंचायत समितीसाठी पंचायत समितीस्तरीय नियोजन समितीची स्थापना करणे (IPPC).

ii. वातावरण निर्मिती व समुदाय एकत्रीकरण

iii. प्राथमिक आणि दुय्यम माहिती संकलन आणि एकत्रिकरण

iv. परिस्थितीकीचे विश्लेषण, गरजांचे मूल्यांकन व विकासात्मक दरीचा अभ्यास आणि वस्तुस्थिती दर्शक विकास अहवाल तयार करणे

v. दुरदृष्टीचा विचार करुन उदिष्ट निश्चित करणे.

vi. उपलब्ध संसाधने व त्या अनुषंगाने संबंधीत उपक्रम निश्चीत करणे - (विशेष गट सभा)

vii. गरजांच्या प्राधान्य क्रमानुसार आणि नियोजित उपक्रमांच्या आधारे पंचायत समिती विकास आराखड्याचा मसुदा

तयार करणे

viii. पंचायत समिती विकास आराखड्यास मान्यता,  अंमलबजावणी, देखरेख आणि झालेल्या बदलाचे  विश्लेषण.

आकृती 8:   पंचायत समिती विकास आराखडा चक्र



### ५.२ पंचायत समिती स्तरिय नियोजन समिती (IPPC)आणि क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) ची स्थापना

पंचायत समितीने नागरिकांचा व्यापक सहभाग, संसाधनांचा अधिकतम उपयोग आणि जास्तीत जास्त विकासात्मक लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने पंचायत समिती विकास आराखडा तयार करावा. पंचायत समितीस सर्वसमावेशक व दूरदर्शी आराखडा तयार करण्याच्या हेतु मध्ये सहाय्यकारी होवु शकतील अशा कल्याणकारी / परोपकारी / ऐच्छिक मानवी संसाधनांची मोठया प्रमाणात मदत घेतली पाहिजे. यासाठी "पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती" (IPPC) गटाची स्थापना पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्यासाठी केली जाऊ शकते. पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPPC) पंचायत समिती विकास आराखडयाची अंमलबजावणी पंचायत समितीच्या सभापतीच्या अध्यक्षतेखाली करेल. ज्याठिकाणी नियोजन प्रक्रियेला मदत करण्यासाठी प्रख्यात तज्ञ उपलब्ध असेल त्या ठिकाणी सदर व्यक्तीस पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPPC) सह-अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित केले जाऊ शकते. आयपीपीसीची सदस्य संख्या व रचना वेगवेगळी असू शकते. पंचायत समिती स्तरावरावरील विभाग प्रमुख / क्षेत्रिय विभागांचे प्रतिनिधी या समितीचे सदस्य असणे बंधनकारक आहे. त्यांच्या व्यतिरिक्त, गटातील नागरिक जे देशात अन्यत्र किंवा परदेशात काम करत आहेत / स्थाईक आहेत त्यांनाही आयपीपीसीचे सदस्य होण्यासाठी आमंत्रित केले पाहिजे. पंचायत समिती क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी त्यांचे ज्ञान / कौशल्य यांचा उपयोग करुन घेणे हा या मागील उददेश आहे. जिल्हयातील / नजिकच्या इतर जिल्हयामधील / राज्यातील / इतर राज्यांतील गटामधील प्रथितयश लोकप्रतिनिधींचा देखील पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPPC) मध्ये विशेष निमंत्रीत म्हणून आमंत्रित केले जाऊ शकते. या सदस्यांचा मनापासून सहभाग घेता यावा यासाठी राज्य सरकार / जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना दिलेल्या सूचना दयाव्यात. आयपीपीसीची सूचक रचना रकाना २ मध्ये दिली आहे. ही टीम पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्याच्या सर्व कामांची पूर्तता करण्यासाठी आणि योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व देखरेखीसाठी मदत करणारी पंचायत समिती स्तरावरील अग्रगण्य गट असेल. राष्ट्रीय ग्रामिण जिवनोन्नती अभियान (NRLM) चा प्रतिनिधी किंवा कोणत्याही प्रतिष्ठित व्यक्तीस समितीचा फॅसिलीटेटर म्हणून नामनिर्देशित केले जाऊ शकते. फॅसिलीटेटर जीपीडीपी आणि मिशन अंत्योदय डेटा एकत्रित करेल आणि ग्रामपंचायत नियोजन कार्यसंघाच्या फॅसिलीटेटरर्स आणि क्षेत्रीय कार्यकारी गटाचे संयोजक (SWG) यांच्याशी समन्वय साधेल. पंचायत समिती सभापती , गट विकास अधिकारी आणि पंचायत समिती फॅसिलीटेटर यांच्यासह पाच जणांचा कोर गट (फॅसिलीटेशन टिम ) तयार केला जाईल आणि त्यास पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल.

# रकाना २: पंचायत समिती स्तरिय नियोजन समितीची रचना

| क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| 1 | पंचायत समिती सभापती | अध्यक्ष |
| 2 | पंचायत समिती उप सभापती | उपाध्यक्ष |
| 3 | पाच ग्रामपंचायतींचे सरपंच | सदस्य |
| 4 | तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारे जिल्हा परिषदेचे 4 सदस्य | सदस्य |
| 5 | पंचायत समितीच्या स्थायी समित्यांचे अध्यक्ष (लागू असेल तेथे) | सदस्य |
| 6 | गट विकास अधिकारी | सदस्य |
| 7 | वनपरिक्षेत्र अधिकारी | सदस्य |
| 8 | एनआरएलएम चे प्रतिनिधी | सदस्य |
| 9 | कृषी विस्तार अधिकारी | सदस्य |
| 10 | कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष | आमंत्रित |
| 11 | तालुका अग्रणी बॅक व्यवस्थापक | आमंत्रित |
| 12 | एक स्वच्छता तज्ञ | आमंत्रित |
| 13 | अर्थशास्त्रातील एक प्राध्यापक | आमंत्रित |
| 14 | पंचायत समितीचे सचिव किंवा कार्यकारी अधिकारी | सदस्य सचिव |

टीप - समिती आवश्यकते नुसार सदस्यांची निवड करू शकेल. गटातील पाच ग्रामपंचायतींचे सरपंच व इतर आमंत्रित सदस्य यांची निवड पंचायत समिती सभापती यांनी नामनिर्देशनाद्वारे करावी.

**नियोजन समितीची जबाबदारी :**

- पंचायत समिती आणि क्षेत्रीय कार्यकारी गट यांना अनुक्रमे पंचायत समिती विकास आराखडा व विभागीय आराखडा तयार करण्यासाठी मदत करणे.
- क्षेत्रीय विकासासंदर्भात सकारात्मक विचार विनिमयांस प्रोत्साहित करणे.
- उपक्रमांच्या तयारीसाठी क्षेत्रीय कार्यकारी गटांना सहाय्य करणे.
- अतिरिक्त संसाधने एकत्रिकरणाच्या शक्यता पडताळुन पाहणे.
- वेळापत्रकानुसार विविध उपक्रमांची योजना आखतांना योग्य तो समन्वय सुनिश्चित करणे.
- कार्यकारी गटांच्या उपक्रमांमध्ये समन्वय साधणे.
- विविध भागधारक, बँका आणि सहकारी संस्थांच्या बैठकांना तसेच चर्चा सत्रांना मदत करणे.
- पंचायत समिती विकास आराखडा तयार करीत असतांना मदतीसाठी तज्ञ, स्वयंसेवक, तसेच शैक्षणिक - तांत्रिक संस्था यांचा शोध घेणे.

**वरील गोष्टी साध्य करण्यासाठी पंचायत समिती स्तरिय नियोजन समिती (IPPC) वेगवेगळया क्षेत्रीय कार्यकारी गटांकडून (SWG) तांत्रिक आणि व्यवस्थापकीय सहाय्य आवश्यक आहे. क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) पुढील विषयांसाठी स्थापन केले जाऊ शकतात.**

- संसाधन विकास
- आर्थिक विकास व उत्पन्न वाढ, गरिबी निर्मुलन, उपजीविकाव कौशल्य विकास
- शिक्षण
- आरोग्य
- महिला व बाल विकास
- सामाजिक सुरक्षा आणि सामाजिक न्याय
- कृषी आणि कृषी संबंधित विभाग
- जल संसाधने
- पायाभूत सुविधा विकास
- पर्यावरण आणि हवामान बदल

जर उपरोक्त विषयांसाठी पंचायत समिती स्तरावर सद्यस्थितीत कोणत्याही स्वरूपाच्या स्थायी समित्या कार्यरत असल्यास त्यादेखील उपरोक्त क्षेत्रीय कार्यकारी गटांमध्ये (SWG) विलीन करण्यात येतील. भारतीय राज्यघटनेच्या 11 व्या परिशिष्टात समाविष्ट केलेले सर्व विषय क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) मध्ये विभागून दिले जाऊ शकतात. क्षेत्रीय कार्यकारी गटांमध्ये (SWG) पंचायत समिती स्तरावरील सर्व अधिकारी तसेच क्षेत्रीय तज्ज्ञ, तालुका स्तरावरील स्वयंसेवी संस्था आणि समुदाय आधारित संस्था (सीबीओ) चे प्रतिनिधी असतील. क्षेत्रीय कार्यकारी गटाचे (SWG) अध्यक्ष संबंधित विषयाचे तज्ज्ञ असू शकतील आणि पंचायत समितीचे सदस्य सह-अध्यक्ष असू शकतील.

**विभागीय कार्यकारी गट (SWG)** खालील जबाबदाऱ्या पार पाडेल.

- क्षेत्रीय कार्यकारी गटाचे (SWG) नेमून दिलेल्या विषयानुरूप उपक्रमांच्या तयारीसाठी आवश्यकतेनुसार इतर सदस्यांची आणि/किंवा तज्ञांची निवड करेल
- क्षेत्रीय कार्यकारी गटाचे (SWG) आपल्या विषयानुरूप दूरदर्शी कार्यक्रम तयार करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती गोळा करेलआणि पंचायत समिती स्तरावरील विकासाच्या सद्यस्थितीचे मूल्यांकन करेल
- **विभागीय कार्यकारी गट (SWG)** पंचायतसमितीच्या संबंधित स्थायी समित्यांशी चर्चा करतील व त्यांचे अभिप्राय घेतील
- **विभागीय कार्यकारी गट (SWG)** उपलब्ध असलेल्या माहितीचे विश्लेषण करेल व संपूर्ण तालुक्यासाठी सद्यस्थिती विकास अहवाल तयार करेल.सद्यस्थिती विकास अहवालात गोळा केलेल्या आकडेवारीच्या आधारे विषयाशी संबंधित परिस्थिती विश्लेषणाचा समावेश असेल व विकासातील अंतर ओळखून गरजेनुसार पूर्ण तालुक्यासाठी दिशा ठरविली जाईल.
- **विभागीय कार्यकारी गट(SWG)** आपल्या विषयासाठी प्रारूप व्हिजन प्लॅन तयार करेल
- सद्यस्थिती विकास अहवाल विहित कालावधीत पंचायत समिती स्तरीय नियोजन समितीकडे सादर केला जाईल.

## ५.३ पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) आणि क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) यांना अभिमुखता (तोंड ओळख) प्रशिक्षण देणे.

सर्वसमावेशक पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्यासाठी आवश्यकतेनुसार लोकांचा परिपूर्ण सहभाग , विविध भागधारकांनी प्रक्रिया समजून घेणे, दूरदृष्टी, समस्या तसेच प्राधान्यक्रम क्षेत्र ओळखण्यासाठी परिस्थिती विश्लेषण आणि प्रकल्प निर्मिती, अंमलबजावणी इ. गोष्टींची आवश्यकता आहे. ही प्रक्रिया सक्षम करण्यासाठी मुलभूत सुविधांसह क्षमता बांधणी व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पंचायत समिती विकास आराखड्याचे अधिक चांगले नियोजन, अंमलबजावणी व देखरेखीसाठी पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) आणि क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) च्या सर्व सदस्यांचे म्हणजेच लोक प्रतिनिधी, पंचायत समितीचे कार्यकारी अधिकारी, समुदाय नेते, तालुका स्तरावर कार्यरत क्षेत्रीय विभागातील कर्मचारी यांचे व्यावसायिक ज्ञान आणि कौशल्य वाढविण्यासाठी, प्रत्येक राज्याने क्रियाभिमुख प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी आणि काम करताना येणारे अनुभवातून शिकण्यासाठी योग्य रणनीती आणि कृती योजना विकसित केली पाहिजे. म्हणूनच, पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) आणि क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) च्या सदस्यांना त्यांच्या भूमिका आणि जबाबदा-या बद्दल प्राथमिक अभिमुखता (तोंड ओळख) प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायतराज संस्था, हैदराबाद (एनआयआरडी आणि पीआर) यांनी पुढाकार घेऊन राष्ट्रीय संसाधन व्यक्तींसाठी प्रशिक्षण आयोजित करावे. सदर व्यक्तींनी तालुका स्तरावर दोन प्रकारचे प्रशिक्षण घ्यावे.

१. सभापती, सचिव, FACILITATOR, व दोन अन्य सदस्य यांच्या मुळ गटास प्रशिक्षण
२. पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) आणि क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) च्या सर्व सदस्यांना पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्यासाठी तोंडओळख (अभिमुखता) प्रशिक्षण देणे.

## ५.४ पंचायत समिती विकास आराखडा तयार करण्यासाठी वातावरण निर्मिती

समुदाय एकत्रीकरण व सर्व भागधारकांच्या गटांशी चर्चा करण्यासाठी तालुका स्तरावर योग्य वातावरण निर्मिती करणे आवश्यक आहे. लोकनियुक्त प्रतिनिधी , अधिकारी आणि संपूर्ण समुदाय नियोजन प्रक्रियेत सहभागी होतील याची खात्री करण्यासाठी हा महत्वपूर्ण अभ्यास आहे.औपचारिक आराखडा निर्मिती सुरू होण्यापूर्वी, वातावरण निर्मिती आणि सामाजिक एकत्रीकरण आवश्यक आहे. समाज आणि प्रशासकीय यंत्रणेमध्ये मनोवृत्ती बदल, दृष्टीकोन आणि तोंड ओळख होण्यासाठी वातावरण निर्मिती उपक्रमांना अतिशय महत्त्व आहे. म्हणूनच, पंचायत समिती विकास आराखडा प्रक्रियेतील पहिले पाउल म्हणजे ग्रामस्थांमध्ये जनजागृती करून नियोजन प्रक्रियेला सुरुवात करण्यासाठी पंचायत समिती सभा आयोजित करणे. पंचायत समिती सभेला पंचायत समिती विकास आराखड्याची गरज, नियोजन प्रक्रियेत राबविले जाणारे उपक्रम, पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) आणि आणि क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) ची स्थापना आणि त्यांच्या सदस्यांची ओळख याविषयी माहिती दिली जाईल. आयपीपीसीने योग्य वातावरण निर्मिती आणि गट सभेमध्ये महिलांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी पुढाकार घ्यावा. लोकनियुक्त महिला प्रतिनिधी आणि बचत गटांच्या सहकार्याने हे करता येईल. गट सभेमध्ये निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत समाजातील सर्व समूहांना सहभागी करण्यासाठी, मुख्य गट सभेच्या आधी महिला, मुले आणि वृद्ध व्यक्तींसाठी स्वतंत्र सभा आयोजित केली जाऊ शकते, जेणेकरून या घटकांशी संबंधित विषय अंतिम तयार होणा-या पंचायत समिती विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करता येतील..

याबरोबरच प्रभावी आराखडा तयार करण्यासाठी, पंचायत समिती विकास आराखड्याकडून लोकांच्या असणा-या अपेक्षा समजून घेऊन तालुक्याचा एक दृष्टीकोन तयार करण्यासाठी, तसेच सर्व भागधारक, लोकनियुक्त प्रतिनिधी, बचत गट, व क्षेत्रीय अधिकारी यांच्यात उत्साह निर्माण करण्यासाठी अधिक सकारात्मक वातावरण निर्मिती करणे आवश्यक आहे. याशिवाय पंचायत समितीने पंचायत समिती विकास आराखड्याअंतर्गत भविष्यातील दृष्टीकोन ठरविणे व ध्येय निश्चित करणे यासाठी माहिती, शिक्षण व

संप्रेषण (आयईसी) उपक्रम सुरू केले पाहिजेत.प्रभावी वातावरण निर्मितीद्वारे प्रभावी गट सभा, पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) आणि आणि क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) व या सर्वांद्वारे सर्वसमावेशक गट विकास आराखडा तयार करण्यासाठी पंचायत समिती द्वारा राबविल्या जाऊ शकणा-या उपक्रमांची एक स्पष्टीकरणात्मक यादी परिशिष्ट-आठ मध्ये दिली आहेगट विकास आराखडा तयार करताना वातावरण निर्मितीच्या उपक्रमांनी सर्व लोकांमध्ये उत्सवाची भावना निर्माण केली पाहिजे, जेणेकरून सर्व भागधारकांचा ऐच्छिक सहभाग या प्रक्रियेत नोंदविला जाईल.

### ५.५ ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) एकत्रित करणे आणि विकासात्मक प्राधान्यक्रम निश्चित करणे

गेल्या पाच वर्षात ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करताना सर्वसमावेशक प्रक्रियेचा अवलंब करण्यात मोठ्या प्रमाणात यश आले आहे. तालुक्याच्या विकासात्मक गरजा ओळखणे व त्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे उपक्रम निश्चित करणे यासाठी ग्रामपंचायत विकास आराखड्यांचे (GPDP) पंचायत समिती स्तरावर एकत्रीकरण सुनिश्चित करणे हा एक महत्वपूर्ण घटक आहे. कलम १.४.१ मध्ये नमूद केल्यानुसार ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) विकासात्मक गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करते. आणि या हेतूने जनगणना, सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना (एसईसीसी डेटा), मिशन अंत्योदय आणि क्षेत्रीय विभागांद्वारे प्रकाशित डेटा प्लॅनप्लस सॉफ्टवेअरवर (ई-ग्रामस्वराज मध्ये समाविष्ट) पूर्व-प्रख्यात आहे.याद्दष्टीनेमिशन अंत्योदय डेटा घटनेच्या अकराव्या अनुसूचित सूचीबद्ध केलेल्या 29 विषयांच्या अनुषंगाने विकासात्मक दरीचे गांभीर्य लक्षात आणून देत असल्याने अत्यंत महत्वपूर्ण आहे.मिशन अंत्योदय डेटाविषयी तपशील प्रकरण ४.१ मध्ये उपलब्ध आहे. 29 विषयांच्या संदर्भात गरजा शोधण्यासाठी तालुका स्तरावर मिशन अंत्योदय डेटा एकत्रित केला जाऊ शकतो.छत्तीसगडच्या बालोद जिल्ह्यातील दोंडी ब्लॉकमधील शेतीसाठी आकृती 6 मध्ये हे दर्शविले गेले आहे. कलम २२ मध्ये वर्णन केल्यानुसार ई-ग्राम स्वराजच्या मदतीने ग्राम पंचायतीनी हाती घेतलेल्या सर्व कामांचे एकत्रिकरण केले जाऊ शकते आणि ग्रामपंचायत विकास आराखड्यात समाविष्ट करता येऊ शकत नाहीत अशा कामांचा समावेश पंचायत समिती विकास आराखड्यात करता येऊ शकेल. असे सर्व उपक्रम निश्चित केल्या नंतर विकासात्मक गरजा भागविण्याच्या प्रक्रियेत यापैकी कोणत्या उपक्रमांचा अधिकाधिक उपयोग होऊ शकेल या आधारावर त्यांचा प्राधान्य क्रम निश्चित करता येईल. याबरोबरच एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या गरजा भागवू शकणा-या उपक्रमांना प्राधान्य देता येईल.

**आकृती 9: तालुकास्तरावर विकासात्मक उणीवा दर्शविण्यासाठी मिशन अंत्योदय डेटाचा वापर**







विकासात्मक गरजा संबंधित डेटा GIS प्लॅटफॉर्मवर अपलोड केला जाऊ शकतो, व त्यामुळे आच्छादन विश्लेषणाची कार्यक्षमता वापरुन अवकाशीय आणि ऐहिक विश्लेषण सुलभ होते.यामुळे कोठे आणि कोणत्या भागात समस्या अस्तित्वात आहे आणि कोणत्या उपक्रमामुळे समस्या सोडविण्यास मदत होऊ शकते हे अचूकपणे ओळखण्यास मदत होईल.यामुळे फायदा

होणारी गावे आणि लोकांची संख्या शोधण्यात देखील मदत होईल.त्याचप्रमाणे ऐहिक विश्लेषण काही वर्षांमध्ये/महिन्यांमध्ये केलेल्या प्रगतीस मदत करेल.कलम 11.3 मध्ये दिलेल्या विवरणाप्रमाणे जीआयएस आधारित नियोजनास प्राधान्य दिले जाऊ शकते.तालुका- अंबाला 1 मधील पाईपद्वारे नळ जोडणी योजनेसाठी जीआयएस चा वापर आकृती 10 मध्ये दर्शविला गेला आहे.यामध्ये पाईपद्वारे नळ पाणीपुरवठा मिळणाऱ्या लोकांची कमीत कमी टक्केवारी असणा-या व त्याकारणास्तव लाल रंगाने दर्शविलेल्या गावांना प्राधान्य दिले जाऊ शकते.

**आकृती 10: तालुका-अंबाला 1 मधील पाईपद्वारे नळ पाणीपुरवठा निश्चित करताना जीआयएसचा वापर**

## ५.६ परिस्थिती विश्लेषण आणि सद्यस्थिती विकास अहवाल

परिस्थिती विश्लेषण या प्रक्रियेद्वारे ज्यात हस्तक्षेप आवश्यक आहे अशा समुदायाच्या समस्या आणि विकासात्मक दरीचे अंतर ओळखणे सोपे होते. हे विश्लेषण तालुका स्तरावर विकासाच्या सद्यस्थितीचे मूल्यांकन विचारात घेते. प्राथमिकत: विकासाच्या विविध मुद्द्यांवरील विद्यमान परिस्थितीचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. यामुळे सद्यस्थितीत उपलब्ध पायाभूत सुविधा, सुखसोई आणि सेवांमध्ये असलेल्या विकासात्मक दरीबद्दल तसेच भविष्यकालीन विकासासाठी आवश्यक असलेल्या किमान उपक्रमांबद्दल मुलभूत माहिती मिळते. हे विश्लेषण पंचायत समिती विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याच्या कामांच्या प्राधान्यक्रम निश्चितीसाठी आधार म्हणून काम करू शकते. गेल्या पाच वर्षात वेगवेगळ्या क्षेत्रांत झालेल्या विकासाबाबत प्रमाणित माहिती उपलब्ध असल्यास परिस्थिती विश्लेषण प्रभावी ठरू शकते. असे विश्लेषण पंचायत समिती विकास आराखड्यासाठी भविष्यातील उद्दीष्टे व लक्ष्य निश्चित करण्यासाठी मानदंड म्हणून काम करेल. उपलब्ध माहितीची समुदायाच्या अभिप्रायासह फेर तपासणी देखील आवश्यक आहे.

परिस्थिती विश्लेषण करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम माहिती संकलित करणे आणि त्यांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.विश्लेषण माहिती वर आधारित असले पाहिजे आणि लोकांच्या ज्ञानाद्वारे पडताळणी केलेले असावे. इंटरनेट आणि मोबाइल फोन आधारित अनुप्रयोगांसह तंत्रज्ञानाचा समर्थनीय वापर रिअल-टाइम माहिती संकलन आणि देखरेखीसाठी करणे आवश्यक आहे. माहित झालेल्या समस्यांसाठी परिस्थिती विश्लेषण आणि संबंधित विकासात्मक पर्यायांचे तपशीलवार वर्णन परिशिष्ट ९ मध्ये केले गेले आहे. पंचायत समितीने नमुना स्वरुपात माहिती तज्ञांकडे द्यावी आणि त्यांची क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचा भाग म्हणून तसेच क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) साठी इनपुट म्हणून तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विश्लेषण करून घ्यावे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) ने परिस्थिती विश्लेषण समाविष्ट असलेला एक क्षेत्रीय अहवाल तयार करावा. या क्षेत्रीय अहवालांमध्ये मागील तीन ते पाच वर्षात केलेल्या प्रगतीचा समावेश असावा. या अहवालात वाटप केलेला आणि वापरल्या गेलेल्या निधी, खर्च आणि भौतिक कामगिरीविषयी तपशील असणे आवश्यक आहे. या कालावधीतील वास्तविक कामगिरीच्या आधारे, यशस्वी प्रकल्प तसेच प्रत्येक क्षेत्रातील यश आणि अपयशामागील कारणे स्पष्ट केली जाऊ शकतात. सदर अहवालात केंद्र शासन पुरस्कृत, राज्य शासन पुरस्कृत तसेच विविध विभाग व यंत्रणांमार्फत संबंधित कार्यक्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या विकास कामांची सविस्तर माहिती समाविष्ट करून अधिक परिपूर्ण केला जाऊ शकतो. परिस्थिती विश्लेषण पूर्ण झाल्यावर, क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG) नी त्यांचे प्रारूप अहवाल तयार करणे आवश्यक आहे, हे सर्व अहवाल परिशिष्ट १० मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे पंचायत समितीच्या प्रारूप विकास स्थिती अहवालात (डीएसआर) समाविष्ट केले जातील. लोकांना संबंधित कार्यकारी क्षेत्रातील समुदायाच्या नेमक्या आणि सद्यस्थितीतील परिस्थितीबाबत अवगत करून देण्यासाठी हा प्रारूप विकास स्थिती अहवाल (डीएसआर) गट सभेपुढे ठेवण्यात यावा. विशेष ब्लॉक सभेत विचारविनिमयानंतर क्षेत्रीय कार्यकारी गट (SWG)

प्रारूप अहवाल आणि प्रारूप विकास स्थिती अहवालाचा (डीएसआर) मसुदा अंतिम होईल. डीएसआर पंचायत समिती सभेस पुढील बाबींवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करेल.

१.विविध विषयांसंबंधीची कामगिरी, मर्यादा व विकासात्मक प्रयत्नांमधील अंतराच्या अनुषंगाने पंचायत समित्यांच्या विकासाची सद्यस्थिती.

२.विकासात्मक ध्येये साध्य करण्यासाठी अभिसरण रणनीतीचा अवलंब करणे.

३. वार्षिक आधारावर पुढील ५ वर्षांसाठी विकासात्मक अजेंड्याचा प्राधान्यक्रम निश्चित करणे.

४.पंचायत समितीसह विविध प्राधिकरणे व संस्था यांनी लक्ष देण्या सारखे मुद्दे.

**५.७ दूरदृष्टीकोनात्मक अभ्यास**

पंचायत समिती स्तरावरील दूरदृष्टीकोनात्मक अभ्यासामध्ये पंचायत समितीचा तालुका स्तरावरील आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय या विषयांबाबत काम करण्याच्या उद्देशाने दृष्टीकोनांचे एकत्रीकरण करणे आवश्यक आहे.गेल्या पाच वर्षात झालेल्या विकासाच्या आधारे तसेच भविष्यातील विकासासाठी समुदायाच्या गरजा व मागण्यांच्या आधारे पंचायत समित्यांनी पुढील पाच वर्षांसाठी दृष्टीकोन ठरविला पाहिजे.समुदायाला पुरविल्या जाणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेत असलेल्या तक्रारींचे निराकरण करण्याव्यतिरिक्त दूरदृष्टीकोनात्मक अभ्यास स्थानिक गरजा आणि समुदायाच्या व भागधारकांच्या मागण्या ओळखण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देते.जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमांतर्गत पंचायत समितीस देण्यात आलेल्या अनिवार्य कर्तव्ये व जबाबदार्यांशी संबंधित मुद्दे ओळखून त्यांच्याकडे लक्ष देण्याची संधीही याद्वारे उपलब्ध होते.

परिस्थिती विश्लेषण आणि सद्यस्थिती विकास अहवाल एकदा पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) द्वारे अंतिम झाल्यावर ते क्षेत्रीय कार्यकारी समित्या (SWGs), तज्ञ, तालुक्यातील विविध संस्था तसेच लोकनियुक्त प्रतिनिधी या सर्व घटकांच्या एका मोठ्या समितीसमोर सादर केले जावे. पंचायत समिती स्तरीय नियोजन समिती (IPCC) द्वारे तयार केलेला प्रारूप दृष्टीकोनात्मक अहवाल देखील या समिती समोर ठेवता येऊ शकेल. जेणेकरून याबाबत मिळणाऱ्या टिप्पण्या व सूचना विचारात घेऊन दृष्टीकोन निश्चिती अंतिम करता येईल.

**५.८ पंचायत समित्यांनी नियोजन करण्यासाठी संसाधने**

ग्रामपंचायती व जिल्हा परिषदा यामधील महत्वाचा दुवा म्हणुन पंचायत समित्या काम करतात व प्रभावी नियोजनाची अंमलबजावणी करण्यासाठी मानव संसाधनाच्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात पंचायत समित्या सुसज्ज असतात. तथापि, या अंमलबजावणीच्या दृष्टीने पंचायत समितीस्तरावर उपलब्ध असलेली विविध संसाधने शोधण्याची आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे ही संसाधने पुढील चार प्रकारांमध्ये वर्गीकृत करता येते.

- सामाजिक संसाधने – संस्थात्मक सामर्थ्य, शांतता, सामाजिक सौहार्द / सामाजिक एकता
- नैसर्गिक संसाधने - जमीन, जंगल, पाणी, हवा आणि सर्व नैसर्गिकरित्या उपलब्ध संसाधने
- मानव संसाधने – तालुक्यात राहणारे नागरिक तसेच बचत गटातील महिला, स्वयंसेवी संस्था, आणि समुदाय आधारित संस्था (CBO) यांसारख्या कोणत्याही क्षेत्रातील व्यक्ती.
- आर्थिक संसाधने - केंद्र आणि राज्य सरकारांकडून उपलब्ध निधी, स्वउत्पनाच्या बाबी (ओएसआर), लोकसहभागाद्वारे मिळणारे अनुदान. इ.

ब-याच राज्यांमधील पंचायत समित्यांची संसाधन क्षमता राज्य सरकारच्या अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे तसेच पंधराव्या वित्त आयोगाच्या अनुदानाद्वारे निश्चीत करण्यात आलेली आहे. पंचायत समितींचे स्वउत्पन्न अत्यंल्प आहे. व हे मुख्यत: पंचायत समितीच्या अखत्यारितील इमारती आणि इतर मालमत्तांकडून मिळणा-या भाडे शुल्काद्वारे प्राप्त होते. पंचायत

समितीच्या उत्पन्नाच्या बाबींमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होऊ शकतो.

- 15 वा वित्त आयोग अनुदान
- राज्य वित्त आयोग अनुदान
- स्वउत्पन्नाच्या बाबी (ओएसआर)
- केंद्र पुरस्कृत योजना आणि पंचायत समित्यांना राज्य शासनाद्वारे वर्ग करण्यात आलेल्या योजना.
- क्षेत्रिय विभागांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांतर्गत उपलब्ध होत असलेला निधी.
- लोक सहभाग (रोख, श्रमदान,इ.)
- उपलब्ध झाल्यास सीएसआर फंड
- पंचायत समिती सेस निधी

पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रांतर्गत असणा-या ग्रामपंचायती मार्फत काही विकास कामे केली जातात. तसेच जिल्हा परिषदे अंतर्गतही काही विकास कामे पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रांतर्गत केली जातात. सर्वसाधारणपणे पंचायत समितीच्या संसाधन क्षमतांमध्ये या सर्व संसाधनांचाही समावेश केला पाहिजे तालुका स्तरावर या संसाधनांचा हिशेब कसा केला जातो आणि लेखा परिक्षण कसे केले जाते हे राज्यांनी निश्चित केले पाहिजे. देशातील बऱ्याच राज्यांच्या अंदाजपत्रकामध्ये पंचायत समिती स्तरापर्यंतच्या अंदाजपत्रकांचा समावेश केला जातो. या अंदाजपत्रकामध्ये क्षेत्रिय विभागांना देण्यात येणा-या योजना आणि निधी यांचा समावेश करुन विस्तारित करण्यास वाव आहे.

### ५.९ तालुका स्तरावरील नियोजनाची महत्वकांक्षी क्षेत्रे

सर्वसमावेशी आणि सहभागी योजनेच्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या विकासासह आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी आपल्या क्षेत्रात विकासाची कार्ये हाती घेण्याची जबाबदारीही पंचायत समिती वर आहे. तसेच, घटनेच्या अकराव्या परिशिष्टामध्ये सूचीबद्ध केलेल्या २९ विषयांतर्गत हाती घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांबाबत विविध क्षेत्रीय विभागांशी समन्वय साधणे आणि त्यांस सहकार्य करणे पंचायत समितीला आवश्यक असते. विकासाची फळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, मुले आणि इतर दुर्बल आणि उपेक्षित गटांपर्यंत पोहोचतील याची खात्री पंचायत समितीने करणे आवश्यक आहे. तथापि, अशा महत्वकांक्षी क्षेत्रात तालुकास्तरावर केली जाऊ शकणारी कार्ये शोधण्याची आवश्यकता आहे. प्रकरण ४ मध्ये पंचायत समिती विकास आराखड्यामध्ये एकत्रिकरणासाठी आवश्यक क्षेत्रे, केंद्र विषय आणि मुद्दे विस्तृतपणे वर्णन केले आहेत. अभिसरण आणि सामूहिक कृतीसाठी संबंधित मंत्रालयांच्या महत्त्वपूर्ण योजनांचेही यात वर्णन केले आहे. पंचायत समितीची महत्वकांक्षी क्षेत्रे खालील मुद्द्यांमध्ये विस्तृतपणे वर्णन केली आहेत(एमओपीआर, २०२०).

५.९.१ आर्थिक विकास आणि उत्पन्न निर्मिती

सकारात्मक धोरणात्मक वातावरणाद्वारे साकार करता येऊ शकणारा आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय यासाठीचे नियोजन पंचायत समित्या व जिल्हा परिषदांकडे असलेल्या पुरेश्या संसाधन घटकांच्या सहाय्याने करण्याची संवैधानिक जबाबदारी पंचायतींवर आहे.त्याचप्रमाणे ग्रामपंचायती कडून संदर्भित कार्यांव्यतिरिक्त, जी उच्चस्तरीय संस्थात्मक आणि तांत्रिक कार्यक्षमतेमुळे तालुका स्तरावर राबवली जाणार आहेत. पंचायत समितीने संपूर्ण तालुक्याचा आर्थिक विकास होईल अशा कार्यांवर भर दिला पाहिजे आणि आपल्या कार्यक्षेत्रातील लोकांसाठी रोजगार निर्मिती केली पाहिजे. ग्रामपंचायतीची आर्थिक विकासाची आणि उत्पन्न निर्मितीची क्षमता मर्यादित असल्याने पंचायत समितीने या क्षेत्रास उच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. आर्थिक विकास आणि उत्पन्न निर्मितीचे काही उपक्रम खालीलप्रमाणे आहेत (एमओपीआर, २०२०):

### ५.९.१.१ कृषी -संबद्ध आणि कृषी-प्रक्रिया युनिट्स

कृषी आणि संबंधित क्षेत्रे कृषी-प्रक्रिया युनिटला लागणारा कच्चा माल शहरी भागातील युनिट्स च्या तुलनेत फायद्यात पुरवतात. पंचायत समितीने इतर संबंधित मंत्रालये जसे अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, कृषी मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय, राज्य कृषी विभाग, यांच्या योजनांशी अभिसरणद्वारे तसेच उत्पादक/शेतकऱ्यांचे गट तयार करून आणि प्रक्रिया, उत्पादन आणि विपणन साह्य प्रदान करुन आधुनिक पायाभूत सुविधा, सामूहिक सुविधा आणि क्षमता बांधणी यांचा विकास करून उद्योजकांना कृषी आधारित अन्न प्रक्रिया उद्योग क्लस्टर दृष्टीकोनातून स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करू शकते.

### ५.९.१.२ पुरवठा साखळी व्यवस्थापन मजबूत करणे

पंचायत समित्या ह्या पुरवठा साखळी व्यवस्थापनास बळकटी देऊन द्वितीयक व तृतीयक क्षेत्रात देखील उपजीविका संधींच्या विस्तारासाठी काम करू शकतात. शेती मालास मिळणारे वाढते दर, विकासकांना होणारी जमीन विक्री, पीक पद्धतीत बदल, निर्यातभिमुखता आणि ग्रामीण तरुण / स्थलांतरितांचे गावाकडे परतणे,मनरेगासारख्या शासकीय पथदर्शी योजना आणि शेतमजुरांना मिळणारी चांगली मजुरी यामुळे ग्रामीण भागात खर्च करण्यायोग्य उत्पन्न अधिशेष निर्माण होत आहे. ग्रामीण भागातील पर्यावरणाला अनुकूल पुरवठा साखळ्या विकसित करणे आणि त्या बळकट करणे हे ग्रामीण भागातील लोकांना आकर्षक मोबदला आणि मिळकत सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे. ग्रामीण उत्पादन, वाहतूक आणि प्रक्रियेच्या बाबतीतील नाविन्यपूर्ण बदलांमुळे शाश्वत नोकरी आणि उत्पन्नवाढ घडवू शकते. पंचायत समित्या ह्या ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी विविध शेती संबंधित कार्यांमध्ये नाविन्यपूर्ण पद्धती व तंत्रज्ञानाचा वापरणाऱ्यांस सहाय्य व प्रोत्साहित करू शकतात. उदा: अक्षय ऊर्जेचा वापर, संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर, शीतकरण सुविधा, शीतकरण साठवणूक केंद्रांचा विकास करणे, कमी खर्चिक प्रक्रिया पद्धती, वेष्टन पद्धती इत्यादी

### ५.९.१.३ नाशवंत उत्पादनांसाठी शीतकरण गृह साखळीचा विकास

अन्न आणि कृषी संघटने (एफएओ) च्या अंदाजानुसार भारतातील वार्षिक ८ .3 अब्ज डॉलर्स किंमतीची ४०% ताजी फळे आणि भाजीपाला ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी नष्ट होतो. जगभरात, कोल्ड स्टोरेज ही शेतकऱ्यांना शेवटच्या ग्राहकापर्यंत जोडण्यामध्ये आणि कुपोषणाच्या समस्येस कमी करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. विविध समाजकल्याणकारी पुढाकारांच्या माध्यमातून सरकार कृषी क्षेत्रात उत्पादन, संकलन, साठवण, बाजारपेठ (मंडी) आणि अगदी शेती उत्पादनांच्या विपणनामध्ये मोठा हस्तक्षेप करीत आहे. पायाभूत सुविधा अजूनही बाल्यावस्थेत असल्याने,कोल्ड स्टोरेज इतर भागधारकांशी व्यवहार करताना शेतकरी व उद्योगधंद्यांवरील ओझे कमी करू शकतील. कोल्ड चेन च्या उभारणीसाठी अनेक अल्प खर्चिक मॉडेल्स आहेत. पंचायत समिती संबंधित भागधारकांसोबत समन्वय साधून स्थानिक उत्पादनांसाठी शाश्वत कोल्ड चेन सिस्टम विकसित करण्यास साह्य करू शकते.

### ५.९.१.४ ग्रामीण मार्केट हबसाठी पुढाकार

नवीन उत्पादन किंवा प्रक्रिया केलेल्या उत्पादनांच्या मार्केटिंगमध्ये यशस्वी होण्यासाठी उत्पादकांना आणि ग्रामीण कृषी-प्रक्रीया कारकांना लक्षित बाजारपेठेत यायचं असेल तर त्यांना उत्पादनांच्या वैशिष्ट्यांनुसार बाजारपेठेच्या गरजांची जाणीव असणे आवश्यक आहे. बाजारपेठेतील नवीन संधींबद्दल माहिती नसल्यामुळे लघु उद्योजकांना विवंचेनेत असलेल्या बाजारात व्यवसाय करणे भाग पडत आहे. असे दिसते आहे की उत्पादक आणि प्रक्रीया कारक यांचे कमकुवत एकत्रीकरण यामुळे शेतकरी उत्पादनाच्या दर्जापासून दूर जातात आणि म्हणून ते उत्पादन वाढवण्यावर भर देतात. या संदर्भात स्थानिक/ प्रादेशिक/ वांशिक विशिष्ट मागणीची पूर्तता करण्यासाठी बचत गटांना आणि स्थानिक सहकारी संस्थांना छोट्या परंतु आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य बाजारभिमुख कृषी-प्रक्रिया युनिट्स विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करणे

आवश्यक आहे. यातून स्थानिक रोजगार निर्माण होण्यास आणि स्थानिक उत्पन्न सुधारण्यास मदत होईल. पंचायत समिती ग्रामीण भागात राहणा-या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी ग्रामीण मार्केट हब विकसित करण्यासाठी पुढाकार घेऊ शकते. या संदर्भात शासकीय ई-मार्केट प्लेस (जीइएम) वापरण्याससुद्धा प्रोत्साहित केले जाऊ शकते.

### ५.९.१.५ मजबूत पंचायत-खासगी भागीदारी विकसित करणे

स्थानिक आर्थिक विकास म्हणजे केवळ व्यक्तींच्या मूलभूत गरजांचा विकास करणे नव्हे तर लोकांनी एकत्र येऊन शाश्वत आर्थिक वृद्धी आणि सुधारित जीवनमान प्राप्त करणे हा सुदधा आहे. पंचायतीने देणे आवश्यक असलेल्या काही सेवा विशेषत: शाश्वत रोजगार पुरवणाऱ्या आणि उत्पन्न वाढवणाऱ्या सेवा खासगी संस्थांच्या भागीदारीत अधिक चांगल्या प्रकारे साध्य करता येतील. पंचायत समितीला व्यावसायिक आधारावर सेवा देण्याच्या संदर्भात भागीदारी करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणे आवश्यक आहे.पंचायत समिती देखील या उद्देशाने समुदाय आधारित संस्थेस साह्य देऊ शकते. नागरिकांना सेवा अधिक कार्यक्षमतेने पोचवण्यासाठी व्यावसायिक संस्थांशी भागीदारी करण्यास त्यांना प्रोत्साहित केले जाऊ शकते. शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल मार्गाने लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याच्या क्षेत्रात भागीदारी विकसित करण्यावर आवश्यक भर दिला जाऊ शकतो. अपारंपरिक उर्जेचा वापर करणे, उपलब्ध पाण्याचे चांगले व्यवस्थापन आणि उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी जैव तंत्रज्ञानाचा वापर करणे, उपजीविकांच्या संधींमध्ये वाढ करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे इत्यादी..प्राधान्यक्रमाची क्षेत्रे असू शकतात.

### ५.९.१.६ वेस्ट टू वेल्थ

शहरी, औद्योगिक व शेती कचरा / अवशेषातून उर्जा निर्मितीची भारतामध्ये मोठी क्षमता आहे. बायो-सीएनजी, बायोगॅस आणि वेगवेगळ्या कचऱ्यातून निर्माण केली जाणारी उर्जा, जसे ग्रामीण भागातील गुरांचे शेण किंवा वाया जाणारा भाजीपाला/अन्न ही स्वयंपाक, वीज निर्मिती आणि वाहतुकीसाठी वापरली जाऊ शकते. या हस्तक्षेपांद्वारा नवीन व्यवसाय मॉडेल्स तयार व्हायला हवीत जी संसाधन कार्यक्षम उत्पादने आणि सेवा देऊ आणि अंतिमतः रोजगाराच्या वाढीव संधी निर्माण करु शकतील. वाढती मागणी आणि ग्राहकांची स्वीकृती यामुळे अर्थव्यवस्था तयार होईल, किंमती कमी होतील आणि इच्छित संक्रमण/बदल सुलभ होईल. तसेच, पुर्नवापर केलेल्या सामग्रीचा अनिवार्य वापर निश्चित करणे आणि प्रभावी मॉनिटरिंग नेटवर्क यामुळे वेळेत इच्छित कामगिरीची पातळी गाठण्यास मदत होईल. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी पंचायत समिती संबंधित भागधारकांना पुरेश्या व परवडणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यास पुढाकार घेऊ शकतात. या संदर्भात संसाधनांचा वापर करण्यासाठी संबंधित संस्था आणि विभागांसोबत कृतीसंगम आणि सहयोग निश्चित केले जाऊ शकते.

### ५.९.१.७ द्वितीय आणि तृतीय क्षेत्रातील उपजीविकेच्या संधींचा प्रचार

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील अंदाजे ६९% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. लोकसंख्येचा दबाव, शेतीचे लहान धारणक्षेत्र, एकूण घरगुती उत्पन्नातील शेतीचा कमी होत असणारा वाटा यामुळे ग्रामीण भागातील उदरनिर्वाहाचे मुख्य स्त्रोत म्हणून लागवडीवरील अवलंबन कमी होत आहे. एकूणच आर्थिक वाढीसह उत्तम ग्रामीण पायाभूत सुविधा आणि ग्रामीण व शहरी प्रवासाला लागणारा कमी वेळ यामुळे ग्रामीण भागातील बिगरशेती क्षेत्र वेगाने वाढत आहे. अशाप्रकारे, द्वितीयक आणि तृतीयक क्षेत्र ग्रामीण भारतातील रोजगाराचा एक महत्त्वपूर्ण संभाव्य स्त्रोत म्हणून पुढे येत आहे. प्राथमिक क्षेत्राच्या विकासाव्यतिरिक्त, व्यापक ग्रामीण विकासासाठी दुय्यम आणि तृतीयक क्षेत्राच्या संभाव्यतेचा वापर करणे देखील आवश्यक आहे.पंचायत समित्यांनी द्वितीयक व तृतीयक क्षेत्रातील उदरनिर्वाहाच्या संधींचा विस्तार करण्यासाठी योग्य पायाभूत सुविधा विकसित करून, लोकांसाठी, विशेषकरुन गरीब आणि दुर्बल घटकातील लोकांसाठी कौशल्य प्रशिक्षणांची व्यवस्था करुन काम केले पाहिजे. पंचायत समितीने त्या त्या भागामध्ये तुलनात्मक फायदा असणारे

महत्त्वपूर्ण उद्योग निश्चित केले पाहिजेत. त्यांनी वित्तीय संस्थांशी मध्यस्थी केली पाहिजे उदा. वस्तू आणि सेवांच्या उत्पादनात कुशल कामगार / बचत गटांना तैनात करण्यासाठी त्यांना पत / कर्ज सुविधांची चांगली पोहोच देण्यासाठी बँका / वित्तीय संस्थासोबत करावयाची मध्यस्थी. त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अशा कार्याक्रमांना प्रोत्साहित करणे आणि त्या क्षेत्रातील त्यांच्या योजना आणि कार्यक्रमांच्या चांगल्या अंमलबजावणीसाठी त्यांच्याकडील स्त्रोतांसह तसेच अन्य उपलब्ध संस्थांसह मध्यस्थी करणे आवश्यक आहे. तथापि, प्रत्येक प्रकल्प अहवाल तज्ञांकडून तपासला जाणे आवश्यक आहे जेणेकरून त्यास दृढ आर्थिक आधार असेल.

**५.९.१.८ ग्रामीण उद्योग समूह**

एका अंदाजानुसार, मध्यम व लघु उद्योग क्षेत्राचा (MSME) वाटा भारताच्या एकूण जीडीपीपैकी 31% आहे. अंदाजे 55.80 दशलक्ष एमएसएमई उपक्रम जवळपास १२४ दशलक्ष लोकांना रोजगार देते. यापैकी १४% उपक्रमांचे नेतृत्व महिला करत आहेत तर 59.5% उपक्रम ग्रामीण भागात आहेत. तथापि, कोविडमुळे एमएसएमईना फार फटका बसला आहे.त्याचबरोबर,ग्रामीण भागातील महिलांचे रोजगाराच्या बाबतीत, राष्ट्रीय ग्रामीण जीवनमान मिशनची भव्य रचना असूनही, मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. म्हणूनच ग्रामीण भागातील एमएसएमईंना एकूणच उपजीविका क्षेत्रासाठी विशेषतः महिलांसाठी उपजीविकेच्या व्यवस्थेचे समर्थन करण्यासाठी महिला सहकारी संस्थांना भांडवली सहकार्य देण्याची अधिक गरज आहे. भारत सरकारने २० लाख कोटी रुपयांच्या आर्थिक मदत पॅकेजचे अनावरण केले, त्यातील पहिल्या टप्प्यात लघुउद्योग क्षेत्रांना MSME ना कोविडनंतरच्या परिस्थितीत अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी प्रेरणा म्हणून रु. 3 लाख कोटी रुपये 4 वर्ष मुदतीचे विनातारण कर्ज आणि पहिले १२ महिने परतफेडीतून सूट म्हणून दिले आहेत. सरकारने एमएसएमईमध्ये भांडवल टाकण्यासाठी निधींचा निधी (एफडीएफ) स्थापन करण्याचा प्रस्तावही ठेवला आहे. या निधीचा प्रारंभिक निधी म्हणून सरकार १०,००० कोटी रुपये पुरवणार आहे. स्थानिक संसाधनांवर आधारित एमएसएमईमध्ये आर्थिक विकास आणि उत्पन्न वाढीस हातभार लावण्याची प्रचंड क्षमता आहे. पंचायत समितीने नैसर्गिक संभाव्य ठिकाणी नवीन एमएसएमईच्या स्थापनेस तसेच अस्तित्वात असलेल्या MSME ना क्लस्टर डेव्हलपमेंट मोडमध्ये पाठिंबा देणे आवश्यक आहे आणि खासगी क्षेत्र आणि समुदाय आधारित संस्थांच्या मदतीने क्लस्टर विकसित करणे आवश्यक आहे ज्यायोगे महिला सहकारी संस्थांना विशेष सहकार्य मिळेल.

**५.९.२ नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन**

नैसर्गिक स्त्रोतांच्या विघटनाचा थेट नकारात्मक परिणाम गरीब लोकांच्या रोजीरोटीवर होतो. पंचायत समित्यांनी सर्वसमावेशक, सहभागी, गरीबाभिमुख आणि शाश्वत पद्धतीने जल व वनसंपत्तीचे संवर्धन, व्यवस्थापन आणि वापर करण्यासाठी संबंधित समुदाय संस्थांची क्षमता बळकट करणे आवश्यक आहे. नैसर्गिक स्त्रोतांच्या उपलब्धतेचे मूल्यांकन करण्यासाठी आणि चांगल्या रोजगाराची गरज लक्षात घेऊन जास्तीत जास्त आर्थिक नफा मिळवण्यासाठी, त्याचा उपयोग सुधारण्यासाठी, आणि शाश्वत आधारावर अन्नाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी समुदाय संस्थांची क्षमता वाढविण्याची अधिक आवश्यकता आहे. नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनासाठी पंचायतींना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या व अधिकार पाहता त्या आपापल्या भागातील नैसर्गिक स्त्रोतांचे व्यवस्थापन व संवर्धन करण्यासाठी सर्वात योग्य संस्थात्मक व्यासपीठ म्हणून उदयास आल्या आहेत. समुदाय-आधारित संस्थात्मक चौकटीमध्ये पंचायतींसह कार्य करू शकणारे भिन्न वापरकर्ता गट समाविष्ट करणे देखील आवश्यक आहे. पंचायत समिती त्यांची क्षमता वाढविण्यासाठी संबंधित क्षेत्रीय विभागाशी सहयोग करू शकते. स्वयंसेवी संस्था आणि समुदाय आधारित संस्था प्रयोग आणि नवकल्पना यांना आधार देऊ शकतात आणि पंचायत आणि वापरकर्ता गट मजबूत करण्यास मदत करू शकतात. संशोधन संस्था आणि संबंधित भागधारकांच्या भागीदारीमुळे चांगल्या पर्यावरणास अनुकूल ग्रामीण भागातील शाश्वत

नियोजनास वाव मिळू शकेल (एमओपीआर, २०२०).

### ५.९.३ आपत्ती जोखीम व्यवस्थापन

आपत्तीचे योग्य व्यवस्थापन योग्य तयारीवर अवलंबून असते आणि त्यातील बरेच उपक्रम समुदाय स्तरावर हाती घ्यायचे असतात. प्रत्येक ग्रामपंचायतीला कोणत्याही आपत्तीचा परिणाम कमी करण्यासाठी समुदायाच्या सल्ल्यानुसार आपत्ती व्यवस्थापन योजना विकसित करणे आणि शक्य तितकी पूर्व-कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने स्थानिक संस्था आणि समुदायाची क्षमता विकसित करणे हे एक मोठे आव्हान आहे. पंचायत समितींनी अशा प्रकारच्या क्षमता चक्रीवादळे, पूर इत्यादी काही प्रकारच्या आपत्तीला जास्त धोका असलेल्या क्षेत्रातील पंचायतीमध्ये निर्माण कराव्यात. योजना तयार करताना, पंचायत समितीने पूर निवारा घर बांधण्यासारख्या पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी स्रोत वाटप करणे आवश्यक आहे. पूरग्रस्त भागात नाविन्यपूर्ण डिझाइनसह योग्य शौचालयास प्राधान्य दिले पाहिजे. आपत्कालीन तयारी आणि आपत्ती निवारण दोन्हीमध्ये, तसेच लोकांचे व्यवहार व संघटन तसेच संबंधित सर्व भागधारकांची क्षमता वाढविणे यामध्ये पंचायत समितीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. याव्यतिरिक्त, पंचायत समितीने दीर्घ कालावधीसाठीचा शाश्वत विकास आणि असुरक्षितता कमी करण्याच्या रणनीती (एमओपीआर, २०२०) साठी, हवामान बदल अनुकूलन (सीसीए) हस्तक्षेपांसह, आपत्ती जोखीम कमी करण्याच्या क्रियाकलापांना एकीकृत करण्याची आवश्यकता आहे. भविष्यातील जोखीम कमी करण्याच्या रणनीतीसाठी उत्तम पद्धतींचा अवलंब करणे आणि पर्यावरणीय ताण कमी करणे यांना तालुका विकास योजनेत समाविष्ट करणे आवश्यक आहे.

### ५.९.४ सामाजिक न्यायाची हमी

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 243जी अन्वये ग्रामीण भागात सामाजिक न्याय मिळावा यासाठी पंचायतींना आदेशित केले आहे. याचा अर्थ असा आहे की असमानता दूर करणे आणि विकासाच्या प्रक्रियेत भाग घेण्यासाठी समाजातील सर्व घटकांना समान संधी प्रदान करणे. सामाजिक न्यायामध्ये सकारात्मक कृती, असुरक्षित लोकांना लक्षियत निधीचे वाटप ,गरीबाभिमुख सेवा पुरवठा इत्यादींचा समावेश आहे. बरेच सामाजिक सहाय्य कार्यक्रम आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी पंचायत समिती जबाबदार आहे. या सेवांचे नियोजन व अंमलबजावणी करताना पंचायतींनी प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित केली पाहिजे. तालुका विकास योजनेत समाविष्ट केल्या जाऊ शकणाऱ्या काही प्रमुख बाबी खालीलप्रमाणे आहेत (एमओपीआर, २०२०):

- अपंग लोकांना शिष्यवृत्ती, भत्ता आणि संधी
- अनुसूचित जाती / जमाती आणि इतर उपेक्षित गटांच्या गरजा भागविणे
- सरकारी योजना व कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी
- सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पर्यवेक्षण करणे आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे
- वृद्धाश्रमांची पायाभूत सुविधा आणि वृद्ध व्यक्तींच्या गरजा भागविणे
- उपशामक आणि जेरियाट्रिक काळजी मजबूत करणे
- तणावातून होणारे स्थलांतर तपासणे
- महिला आणि मुलांच्या विभिन्न गरजा भागविणे
-

### ५.९.५ शिक्षण आणि आरोग्य सेवा

प्राथमिक शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी, निरक्षरता निर्मूलन आणि प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण यामध्ये पंचायती महत्वाची भूमिका निभावतात. शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने २०१८ -१९ पासून केंद्र पुरस्कृत योजना म्हणून समग्र

शिक्षा अभियान नामक शालेय शिक्षणासाठीची एकात्मिक योजना सुरू केली आहे. या अभियानात सर्व शिक्षा अभियान (एसएसए), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (आरएमएसए) आणि शिक्षकांचे शिक्षण (टीई) या तीन केंद्र-पुरस्कृत योजनांचा समावेश आहे. यात पंचायत समिती मुख्य भूमिका बजावू शकतात. त्या योजनेच्या जिल्हास्तरीय युनिटसह तालुका स्तरावर आणि जिल्हा पातळीवर कृती करण्यासाठी एकूणच फ्रेमवर्क विकसित करण्यासाठी कार्य करू शकतात. त्या आधारे नियोजन केले जाऊ शकते. जेथे जेथे आवश्यक असेल तेथे, तालुका विकास योजनेमध्ये, रिक्त घटकांच्या पूर्तीसाठी, योजनेच्या आणि जीपीडीपीच्या पुढाकारांना पूरक ठरण्यासाठी किंवा पूरक करण्यासाठी प्रकल्प समाविष्ट केले पाहिजेत.

पंचायती समितीने शैक्षणिक संस्थांवर समुदायाची मालकी सुनिश्चित करण्यासाठी त्यांच्या संबंधित क्षेत्रातील ग्रामपंचायती व ग्राम शिक्षण समिती (व्हीईसी) यांच्यात चांगला समन्वय सुनिश्चित केला पाहिजे कारण ती सामाजिक व्यवस्थेचा एक भाग म्हणून कार्यरत आहे. शाळेच्या आवारात शौचालय व पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी पंचायत समितीने व्हीईसींना शालेय विकास आराखडा तयार करताना आवश्यक ते सहकार्य द्यावे. पंचायत समितीकडून गरजू विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा, शिष्यवृत्ती आणि वसतिगृह सुविधांसाठी देखील सहकार्य केले जाऊ शकते. त्यांना गावपातळीवरील ग्रामपंचायतींच्या माध्यमातून आपापल्या भागात मध्यान्ह भोजन कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करण्याची देखील आवश्यकता आहे.

घटनेच्या अकराव्या परिशिष्टात हे स्पष्ट केले आहे की ग्रामीण भागात रुग्णालये आणि दवाखान्यांसह प्राथमिक आरोग्य सेवेच्या तरतूदीसंबंधीची कामे पंचायत राज संस्थांची जबाबदारी असू शकते. पंचायत समितीने संबंधित विभागातील आरोग्य विभागाच्या सहकार्याने उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएचसी) आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे (सीएचसी) यासह आवश्यक आरोग्य सेवांच्या सुलभ कामकाजासाठी पुरेशी तरतूद सुनिश्चित करणे आवश्यक आहे. पंचायत समिती तिच्या योजनांमध्ये पायाभूत सुविधांशी संबंधित उपक्रमांचा समावेश करू शकते. यामध्ये चाचणी प्रयोगशाळेची तपासणी / निदान केंद्रे उघडणे, सीएचसी आणि उपविभागीय रुग्णालयांजवळ रूग्ण / रूग्णांच्या नातेवाईकांसाठी वसतिगृह सुविधा, रुग्णालय परिसरातील सामुदायिक शौचालयाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने इतर आवश्यक पायाभूत सुविधांचा समावेश असू शकतो. योजनेत समाविष्ट करण्यापूर्वी अशा उपक्रमांबाबत आरोग्य सेवा क्षेत्रांशी संबंधित तज्ञांशी चर्चा करणे आवश्यक आहे. पंचायत समितीने तिच्या क्षेत्रातील मूलभूत आरोग्य सेवेवर देखरेख ठेवून त्यासंबंधी स्वतःला अवगत ठेवले पाहिजे. पंचायत समितीने तिच्या क्षेत्रातील आरोग्य सेवाविषयक परिस्थितीचा योग्य डेटाबेस राखला पाहिजे आणि सुविधांचा सतत विकास आणि उन्नतीकरण सुनिश्चित केले पाहिजे.

### ५.९.६ मूलभूत सेवा

२०२०-२१ च्या पहिल्या अहवालात, पंधराव्या वित्त आयोगाने एकूण रु. ६०,७५० कोटी रु. पंचायतीच्या तिन्ही स्तरांना वाटप केलेला आहे असून त्यापैकी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व स्वच्छतेसाठी निम्मा निधी असून उर्वरित रक्कम लोकांच्या स्थानिक गरजा भागविणे आणि टिकाऊ सामुहिक मालमत्ता निर्माण करणे व त्यांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी दिलेली आहे. तालुका स्तरावर मूलभूत सेवांचे नियोजन करताना इतर क्षेत्रीय विभागांच्या योजने-कार्यक्रमांना त्यादृष्टीने एकत्रित केले जावे आणि स्वच्छता, पाणीपुरवठा, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, रस्ता, पदपथ, पथदिवे, समुदायातील मालमत्ता या विषयांना पुरेशी प्राथमिकता दिली जावी . या सेवांचा घटनेच्या अकराव्या अनुसूचीत सूचीबद्ध 29विषयांमध्ये तसेच २०३० पर्यंत सध्या करावयाच्या शाश्वत विकास लक्ष्य (एसडीजी) मध्ये समावेश आहे.

### ५.९.७ स्वच्छता

भारतात विशेषत: ग्रामीण भागात उघड्यावर शौचास जाण्याची प्रथा दिसते. जवळजवळ ६० टक्के ग्रामीण भागातील लोक

उघड्यावर शौचास जातात ज्यामुळे दुर्लबल गटातील विशेषतः महिला आणि मुलांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत आहे. उघड्यावर शौच प्रथेच्या निर्मूलनासाठी आणि महात्मा गांधीं ज्यांनी "स्वच्छता ही देवभक्ती आहे" अशी शिकवण दिली. त्याच्या 150 व्या जयंतीपर्यंत अर्थात 2 ऑक्टोबर 2019 पर्यत भारत हगणदारी मुक्त करण्यासाठी 2 ऑक्टोबर 2014 रोजी स्वच्छ भारत मिशन (एसबीएम) ची सुरुवात करण्यात आली होती. अंदाजे १.९६ लाख कोटी खर्च करुन ग्रामीण भागातील च्या अंदाजित खर्चावर ९० दशलक्ष शौचालये बांधण्याचा हा एक प्रकल्प होता होता. स्वच्छ भारत मिशन च्या उदिष्टांमध्ये वैयक्तिक कुटूंबस्तरावर शौचालय व सार्वजनिक शौचालये बांधुन उघडयावरील हगणदारीचे निर्मुलन आणि शौचालयाच्या वापराव देखरेख ठेवण्यासाठी जबाबदार यंत्राणा स्थापित करणे यांचा समावेश आहे. स्वच्छ भारत अभियान सुरु झाले पासुन, भारतातील ग्रामीण स्वच्छतेचे प्रमाण कव्हरेज २०१४ मधील ३९% वरून २ ऑक्टोबर २०१९ रोजी १००% पर्यंत वाढले आहे. २०१९ मध्ये भारत उघड्यावर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्ट या कार्यक्रमाने साध्य केले आहे.

भारत सरकारने शासवत स्वच्छतेवर लक्ष केंद्रीत करुन स्वच्छ भारत मिशन - ग्रामीण (एसबीएम-जी) फेज II सुरू केले, ज्यात हगणदारी मुक्त दर्जा कायम टिकविणे आणि घन व कचरा व सांडपणी व्यवस्थापन (सॉलिड अँड लिक्विड वेस्ट मॅनेजमेंट (एसएलडब्ल्यूएम) चा समावेश आहे. २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत स्वच्छ भारत अभियान एसबीएम (जी) फेज -२ ची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करण्यात येत असून यासाठी एकूण रु. १,४०,८८१ कोटी रु. ची तरतूद केली आहे. या योजनेचा तपशील परिशिष्टVII E मध्ये देण्यात आलेला आहे. हे एक अभिसरणाद्वारे विविध क्षेत्राद्वारे वित्तपुरवठा करण्याचे एक नाविण्यापुर्ण प्रतिमान आहे. यापैकी ५२,४९७ कोटी रुपये पेयजल व स्वच्छता विभागाच्या अर्थसंकल्पातून वाटप केले जातील तर उर्वरित रक्कम विशेषत: घन व कचरा व सांडपणी व्यवस्थापनाकरीता १५ वा वित्त आयोग, मग्रारोहयो आणि महसूल निर्मिती मॉडेल अंतर्गत देण्यात येणाऱ्या निधीतून खर्च करण्यात येणार आहे. १५व्या वित्त आयोगा व महसुल उत्पादित प्रतिमानानुसार पंचायत समिती महत्वपुर्ण भागधारक असल्या कारणाने पंचायत समितीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

स्वच्छ भारत मिशन ग्रामिण फेज -२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार १५व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून, कार्यक्रमांतर्गत काही कामांसाठी अनुदानाच्या निकषांपैकी 30% वाटा देण्याचे अनिवार्य केले आहे. या मार्गदर्शकतत्त्वांमध्ये असेही म्हटले आहे की कोणत्याही अतिरिक्त आवश्यकतांसाठी, पंधराव्या वित्त आयोगाच्या अनुदानासह अन्य संसाधनांमधून मिळणारी रक्कम राज्ये वापरू शकतात. अशा प्रकारे, १५व्या वित्त आयोगाच्या बंधित अनुदानाचा उपयोग स्वच्छता व पिण्याच्या पाण्याच्या सुविधांसाठीही स्वतंत्र निधी म्हणून केला जाऊ शकतो. १५व्या वित्त आयोगाने सन २०२० -२१ च्या पहिल्या अहवालात ग्रामीण स्थानिक संस्था म्हणजेच ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना ६०,७५० कोटी रुपये अनुदान देण्याची शिफारस केली आहे. तसेच स्वच्छतेवर २५% आणि पेयजल वर २५% निधी वापरण्याची शिफारस केली आहे. तथापि, जर कोणत्याही स्थानिक संस्थेने एका श्रेणीची गरज पूर्णतः संतुष्ट केली असेल तर ती इतर श्रेणीसाठी निधीचा वापर करू शकते. तसेच, १५व्या वित्त आयोगाच्या अहवालातील कलम ५.3 मध्ये अशी तरतूद केली गेली आहे की राज्यांनी पंचायती राजस्तरामधील आपापसातील वितरण हे नवीनतम राज्य वित्त आयोगाच्या (एसएफसी) मान्यताप्राप्त शिफारशींच्या आधारे केले पाहिजे आणि ते खालीलप्रमाणे ग्रामपंचायतींसाठी ७०-८५%, पंचायत समितीसाठी १०-२५% आणि जिल्हा परिषदेसाठी ५-१५% असेल. म्हणूनच, आपल्या क्षेत्रातील स्वच्छता सुविधा पुरवण्यासाठी पंचायत समितीला महत्त्वाची भूमिका निभावली पाहिजे. एकंदरीत, स्वच्छता हा पंचायत समितीसाठी एक महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे आणि स्वच्छताविषयक उपक्रमांना गट विकास आराखडयामध्ये ठळकपणे समाविष्ट करणे आवश्यक आहे.

### ५.९.८ पिण्याचे पाणी

पुढील पाच वर्षांत खेड्यांमधील प्रत्येक घरातकार्यात्मक घरगुती नळ कनेक्शन (एफएचटीसी) असावे यासाठी रु. ३.६०लाख कोटी अंदाजित खर्चाचे जल-जीवन मिशन (जेजेएम) राज्य सरकारच्या सहकार्याने सुरू करण्यात आले आहे.अशी कल्पना केली गेली आहे की एफएचटीसीद्वारे, प्रत्येक घरात नियमित आणि दीर्घ मुदतीसाठी विहित गुणवत्तेचे पुरेश्या प्रमाणात पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. मिशन अंतर्गत ग्रामपंचायत आणि / किंवा तिच्या उप-समितीने खेड्यातील पाणीपुरवठा यंत्रणेचे नियोजन, अंमलबजावणी, व्यवस्थापन, संचालन आणि देखभाल करणे आवश्यक आहे. वस्तुतः जेजेएम ही सरकारची एक पथदर्शी योजना आहे, जी सर्वांसाठी घरगुती नळ कनेक्शनच उपलब्ध करुन देणार नाही, तर स्थानिक जलसंपत्तीच्या समग्र व्यवस्थापनास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करते. या योजनेत सुद्धा, पंचायतीसाठीच्या १५वा वित्त आयोगाच्या शिफारशी, मनरेगा इत्यादींच्या अभिसरणातून पंचायतीच्या पाठिंब्याने पंचायतीच्या अनुदानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची पूर्तता करुन योजनेची उद्दीष्टे साध्य करण्यासाठीपंचायत राज संस्थांची भूमिका खूप महत्वाची आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होण्याकरिता प्रत्येक ग्रामीण घरातील लोकांना नियमित आणि दीर्घ मुदतीच्या आधारावर परवडणाऱ्या दरात विहीत गुणवत्तेत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे यासाठी हे मिशन आहे.

हा कार्यक्रम पाण्याचा वापर आणि संवर्धनासाठी समुदायावर आधारित पध्दतीसह सांडपाण्याचे व्यवस्थापन, जलसंधारण, रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादीद्वारे पुनर्भरण आणि पुनर्वापर यासारख्या अनिवार्य घटक म्हणून स्त्रोत टिकाव उपाय म्हणून अंमलात आणेल. योजनेचा तपशील परिशिष्ट सातवा ई वर उपलब्ध आहे.

पंचायत समिती च्या महत्वाच्या भूमिकेमध्ये ब्लॉक पाणी आणि स्वच्छता समिती (बीडब्ल्यूएससी) मध्ये ब्लॉक स्तरावरील सहभागाचा समावेश आहे; पिण्याचे पाणीपुरवठा, पाणी गुणवत्तेची चाचणी व घरगुती पातळीवर पाणीपुरवठा देखरेखीची योजना, तसेच पिण्याच्या पाण्यासाठी घरगुती पुरवठा करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाशी समन्वय साधण्याची योजना तयार करणे. अशा प्रकारे दरम्यानच्या पंचायतीने परिसरातील लोकांना पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी शाश्वत पायाभूत सुविधा निर्माण करण्याची योजना आखण्याची गरज आहे.

### ५.१० विशेष गट सभा आणि कार्यान्वयीन विभागांचा सहभाग

उद्दीष्ट, उणिवांचे विश्लेषण, प्राप्त संसाधने, प्राथमिक आणि इतर अनुषंगिक माहिती, अनुषंगिक आवश्यक उपक्रमांची निश्चिती संग्रहित केल्यानंतर सर्वसमावेशक विशेष गट सभा आयोजित करण्यात यावी. या विशेष गट सभेमध्ये सर्व विकासात्मक गरजा व उणीवा यावर चर्चा केली जावी. सर्व क्षेत्रीय कार्यकारी समिती (SWG) यांनी त्यांच्याकडील प्रस्तावित उपक्रम व त्यासाठी आवश्यक अंदाजित पत्रकीय तरतूद यांचे सादरीकरण करतील. पुढे, कार्यान्वयीन विभागांचे प्रतिनिधी त्यांच्या विभागाचे उपक्रमांचे सखोल रचनात्मक सादरीकरण करतील. विभागामार्फत सादर होणारे रचनात्मक सादरीकरण परिशिष्ट ११ मध्ये देण्यात आलेले आहे. कार्यान्वयीन विभागांचे प्रतिनिधित्व करणारे अधिकारी गट सभेपुढे चालू वर्षात विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची प्रगती व त्याकरिता खर्च करण्यात आलेला निधी व पुढील वर्षात (ज्या वर्षाकरिता पंचायत विकास आराखड्याची अंमलबजावणी करावयाची आहे) यामधील प्रस्तावित उपक्रम व त्याकरिता वाटप करण्यात आलेला निधी यांची माहिती सभेसमोर देतील. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (उमेद) विभागाचे प्रतिनिधी हे सुद्धा गटातील त्यांच्या विभागाचे उपक्रम व गटाचा दारिद्र निर्मुलन आराखडा सादर करतील. निवेदनाच्या स्वरुपात जनतेचे जाहीर प्रकटन गट विकास योजनेत समाविष्ट करून मान्यतेसाठी संबंधित पंचायत समितीला सादर करतील. नियुक्त नोडल अधिकारी यांनी विशेष गट सभेच्या वेळी अनुसूचित जाती आणि जमाती महिला यासारख्या असुरक्षित गट हजर राहतील याची खात्री करावी. गट स्तरीय नियोजन समिती विकासाची सद्यस्थिती व

प्रस्तावित उपक्रमा करीता आवश्यक निधी विशेष गट सभेसमोर सादर करेल. गट सभा सादर करण्यात आलेल्या विविध सादरीकरणावर जाणीवपूर्वक विचार करेल व आवश्यक सूचना व सल्ला देईल.

**५.११ क्षेत्रिय विभागांच्या योजना आणि कार्यक्रमांसह अभिसरण**

पंचायत समिती आपली बहुतांश विकास कामे आपल्या अन्य क्षेत्रिय विभागांमार्फत राबविते त्यामुळे विकास योजना व कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांमध्ये परस्पर सामंजस्य व वारंवार संवाद होणे आवश्यक आहे. म्हणूनच पंचायत समितीने आपला स्वतंत्र दृष्टीकोन न ठेवता सर्व समावेशक दृष्टीकोनातून योजना तयार करणे अपेक्षित आहे.

तालुका स्तरावर अभिसरण करण्यासाठी पंचायत समितीने आपले क्षेत्रिय विभाग आणि एजन्सी यांचे समवेत समन्वय साधणेसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. हे सर्व संयुक्त परिस्थितीकीय विश्लेषण, नियोजन आणि हे सर्व उपक्रम गट विकास आराखडयात समाविष्ट करून शक्य होऊ शकते. या संदर्भात पंचायत स्तरावरील आराखडा निर्मितीला अत्यंत महत्व दिलेले आहे. योजनांचा तपशील आणि अभिसरण पद्धतीचा तपशील विभाग 4.4 आणि परिशिष्ट VII A-K मध्ये वर्णन केला आहे.

**५.१२ प्रकल्प विकास**

क्षेत्रीय कार्यकारी गटांच्या (SWG) सल्ल्यानुसार पंचायत समिती स्तरिय नियोजन समितीने (IPPC) प्राधान्य दिलेली कामे एकत्रित केल्यानंतर विविध क्षेत्रिय विभागांचे तांत्रिक अधिकारी व्यवहार्य व कार्यवाही करण्यायोग्य कामांची यादी तयार करतील. ही कामे प्रकल्पांमध्ये रूपांतरित होऊ शकतात. हे प्रकल्प शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण आणि दारिद्र्य निर्मुलन इ. यासारख्या क्षेत्रांमध्ये सेवा वितरणात सुधारणा करण्यासाठी आवश्यक कोणत्याही विषया पर्यंत तसेच उपक्रमांपर्यत विस्तारित केले जाऊ शकतात. परिशिष्ठ 12 मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार प्रत्येक राज्य स्थानिक स्वराज्य संस्थाच्या वेगवेगळ्या स्तराद्वारे करावयाची कामे निश्चित करण्यासाठी कृती मॅपींग विकसित करु शकते. पंचायत समितीकडे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांशी संबंधित निधीसह उपलब्ध असलेल्या स्त्रोतांसोबत जुळवणी करण्यासाठी सर्व निश्चीत केलेली कामे मॅप केली जाऊ शकतात. यामध्ये क्षेत्रिय विभाग, लोकसहभाग आणि देणगीदारांच्या योगदानाचा समावेश केला जाऊ शकतो. सर्व कामांचे परिणाम आणि निकाल स्पष्टपणे माहित असणे देखिल आवश्यक आहे. या सर्व उपक्रमांचा गट विकास आराखडयांमध्ये समावेश करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरविला जाऊ शकतो. कार्यवाहीस्तव हाती घेतलेल्या प्रत्येक उपक्रमास प्रभावी अंमलबजावणी आणि निकालासाठी प्रक्षेपित करण्यात यावे. परिशिष्ठ 13 मध्ये प्रकल्पाचा एक मॉडेल नमुना देण्यात आलेला आहे.

**५.१३ आराखडा निर्मिती व पंचायत समिती विकास आराखड्यास मंजुरी**

ग्रामपंचायत विकास आराखड्यांचे पंचायत समिती स्तरावर एकत्रीकरण केल्यानंतर, विशेष गट सभेमध्ये सविस्तर विचार विनिमय करून हाती घ्यावयाची कामे निश्चित केल्यानंतर आणि प्रत्येक क्षेत्रीय कार्यकारी गटाद्वारे (SWG) प्रकल्प विकास केल्यानंतर प्रारूप पंचायत समिती आराखडा तयार केला जाईल. हा प्रारूप आराखडा लक्ष्य केलेल्या क्षेत्रांसाठी गटस्तरीय नियोजन समितीद्वारे तयार केला जाईल व यामध्ये क्षेत्रीय कार्यकारी गटाद्वारे (SWG) तयार करण्यात येऊन प्रकल्प समाविष्ट केले जातील. या आराखड्यामध्ये क्षेत्रनिहाय योजना आणि क्षेत्रीय विभागांच्या योजनांसह अभिसरण असावे. तयार केलेल्या प्रारूप आराखड्यामध्ये संसाधने उपलब्ध असलेबाबत खात्री करणे तसेच समाजाच्या सर्व वर्गातील सीमांत आणि असुरक्षित गटाच्या उन्नतीसाठी योजनांचा समावेश असल्याचे सुनिश्चित करण्याची आवश्यकता आहे. यामुळे क्षेत्रनिहाय आराखडा व संबंधित क्षेत्रीय विभागांचे अभिसरण सुनिश्चित होईल. परिशिष्ट १४ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे गटविकास आराखड्याची रचना आणि अंदाज पत्रक तपशील असू शकतात. प्रारूप

आराखडा अंतिम झाल्यानंतर तो गट सभेसमोर मान्यतेसाठी ठेवला पाहिजे. गट सभा उपरोक्त एकात्मिक आराखड्यास अंतिम मान्यता देईल गट सभेदरम्यान गट विकास आराखड्या विषयी विस्तृत सादरीकरण आणि उपक्रम निहाय तपशील देण्यात यावेत आणि  प्रस्तावित आराखड्यावर चर्चा करावी.  या समितीचे इतिवृत्त योग्य प्रकारे नोंदविले जावे गट सभेमध्ये घेतलेले निर्णय पंचायत समितीच्या सूचना फलकावर तसेच इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावेत. प्रत्येक पंचायत समितीत महत्वाच्या दर्शनी भागात १०X २० फुट आकाराचा सार्वजनिक माहिती फलक असावा आणि मंजूर आराखडा परिशिष्ट १५ मध्ये दिलेल्या नमुन्यात यासुचना फलकावर लिहिण्यात यावा.

**५.१४ योजना अंमलबजावणी**

मंजूर आराखड्याची अंमलबजावणी करणे ही पंचायत समितीची जबाबदारी आहे.  आराखड्याची वेळेत व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कालबद्ध वेळापत्रक काटेकोरपणे पाळले गेले पाहिजे. पर्यवेक्षण व देखरेखीसाठी यंत्रणा ठेवण्याचीही गरज आहे. अंमलबजावणी संदर्भातील तपशील अध्याय १० मध्ये नमुद केला गेला आहे. अंमलबजावणी संदर्भातील माहिती  ई-ग्राम स्वराज पोर्टलमध्ये अपलोड केली जाऊ शकते आणि अध्याय ११ मध्ये नमुद केल्यानुसार सर्व देयके पीएफएमएस पोर्टलमार्फत झाली पाहिजेत. पंचायत समिती विकास कामामधील दिरंगाई टाळून कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पुरेपूर काळजी घेऊ शकते तसेच मंजूर आराखड्यामधील अनावश्यक विचलन टाळण्यासाठी यंत्रणा ठेऊ शकते. विकासकामांच्या परिणाम आणि निकालांच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता आराखडा अंमलबजावणीचा एक भाग म्हणून स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगाराची संधी निर्माण करणे देखील सुनिश्चित केले जाऊ शकते.

**५.१५ देखरेख यंत्रणा, अभ्यासक्रम सुधारणा व गट विकास योजनेत बदल**

पंचायत समितीने मंजूर गट विकास आराखड्याची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करणेसाठी तसेच सातत्याने प्रगतीची देखरेख करण्यासाठी पर्यवेक्षण यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी आणि संघटनां असलेल्या प्रतिनिधींसह विस्तारित देखरेख आणि मूल्यांकन समितीची स्थापना केली जाऊ शकते. पंचायत समितीच्या मासिक बैठकीत नियमितपणे प्रगतीचा आढावा घेण्यात येईल आणि योजनांच्या अंमलबजावणीत आढळलेल्या कोणत्याही अडचणी पुढील कार्यवाहीसाठी परत गट स्तरीय नियोजन समिती आणि विभागीय कार्यकारी गटांकडे पाठविल्या जातील. गट विकास आराखड्या अंतर्गत घेतलेल्या विविध प्रकल्पांचे विस्तृत मुल्यांकन करण्यासाठीच्या गटात क्षेत्रीय विभागांचे प्रतिनिधी, तांत्रिक तज्ञ, बचत गट महासंघातील सदस्य, शैक्षणिक / तांत्रिक संस्थांचे तज्ञ, पंचायत समितीचे पदाधिकारी इत्यादींचा समावेश करता येईल. अंमलबजावणी मधील पारदर्शकता, सहभाग, व्यापक सल्लामसलत आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी समुदाय देखरेखीसाठी विशिष्ट यंत्रणा ठेवली पाहिजे. विभागीय कार्यकारी गटांच्या सल्ल्यानुसार गट स्तरीय नियोजन समितीने समोर आलेल्या अडचणी जाणूनघेऊन मंजूर गट विकास आराखड्यामध्ये सुधारणा, बदल अथवा नवीन बाबींचा समावेश पंचायत समितीस सुचविले पाहिजे.

रकाना ३: पंचायत समिती नेदुमानगड, जिल्हा तिरुअनंतपुरम,केरळ येथील  उत्तम उपक्रम

**महत्वाची वैशिष्टे:**

पंचायत समिती स्तराची भूमिका ओळखणे आणि त्याची जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत स्तराशी सांगड घालणे.

तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रातील पाच ग्रामपंचायतींसोबत काम करण्यासाठी केलेले सातत्यपूर्ण व अविरत प्रयत्न.

कृषी, उद्योग, ग्रामीण विकास, मत्स्यव्यवसाय, अनुसूचित जाती / जमाती विकास, महिला व बालविकास यांसारख्या विकास आणि कल्याण विभागांशी समन्वय आणि अभिसरण सुनिश्चित केले गेले.

२०१८ पर्यंत पंचायत समितीने यशस्वीरित्या आयएसओ २००० प्रमाणपत्र प्राप्त केले.

त्यांच्या नियोजन प्रक्रियेचा भाग म्हणून काही उपक्रमः

'समृद्धी' म्हणून ओळखली जाणारी नामांकित, मूल्यवर्धित कृषी-औद्योगिक उबवण प्रक्रिया - कृषी , पशुसंवर्धन, दुग्धशाळा, अंडी उबवणी संदर्भातील उपक्रम यांच्या अभिसरणातून प्राथमिक क्षेत्रातील उत्पादन देणाऱ्या या संस्थेद्वारे रोजगारनिर्मिती व रोजीरोटीचे कार्य केले गेले.

परिसरातील जैविक कचऱ्याची प्रक्रिया आणि पुनर्वापर

पाचहीग्रामपंचायतींचा समावेश असलेल्या अविघटनशील कचऱ्याचे संसाधन पुनर्प्राप्ती सुविधा (आरआरएफ) आणि साहित्य संग्रह सुविधा याद्वारे (एमसीएफ) व्यवस्थापन. ग्रामपंचायती साहित्य संग्रह सुविधेचा वापर करतात ज्यामध्ये प्लास्टिक व इतर अविघटनशील कचरा गोळा केला जातो व   पंचायत समिती थेट संसाधन पुनर्प्राप्ती सुविधा चालवते जिथे प्लास्टिकचे तुकडे करून पुनर्प्रक्रिया   केली जाते.

मानके निश्चित करून तिसऱ्या पिढीच्या अंगणवाड्यांचा विकास – यास ग्रामपंचायतीं देखील  पाठिंबा देतात

ग्रामपंचायती, तिरुअनंतपुरम जिल्हा परिषद, नेडुमानगड नगरपालिका, हरित केरळ अभियान तसेच पाटबंधारे, मृदा संवर्धन, केरळ राज्य भूमी वापर मंडळ हे शासकीय विभाग आणि म.ग्रा.रो.ह.यो. यांच्या एकत्रीकरणातून किल्लियार नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे मा.ना.श्री. सुनीलकुमार कृषिमंत्री  केरळ राज्य यांच्या हस्ते उद्घाटन.



**छायाचित्र: किल्लियार नदी पुनरुज्जीवन प्रकल्प**

सर्वात शेवटी पंचायत समितीद्वारे कामकाज संदर्भात घेण्यात आलेला उपक्रम म्हणजे सर्व प्रक्रियेचे संपूर्ण सामाजिक अंकेक्षण-१० क्षेत्रांमधील ३५ पेक्षा अधिक उपक्रमांसाठी पद्धतशीर व वैज्ञानिक प्रक्रियेद्वारे सामाजिक अकेक्षण करण्यात आले.

## प्रकरण - ६

# जिल्हा परिषद मार्फत ग्रामीण भागासाठी जिल्हा ग्राम विकास आराखडा तयार करणे

**प्रस्तावना :** अलिकडच्या काळात पंचायती राज संस्थांमार्फत सहभागी विकेंद्रित नियोजनाला वेग आला आहे. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) मधील नवकल्पना, २०१८ आणि २०१९ मध्ये व्यापक जीपीडीपी साठी लागोपाठ दोन पीपल्स प्लॅन मोहिमेद्वारे देशभरात विकेंद्रित योजना प्रभावीपणे राबविणे शक्य झाले. ग्राम पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत पंचायतांच्या तीन स्तरांवर विकेंद्रित सहभागात्मक नियोजनाच्या रचनेसाठी ही वेळ योग्य आहे. भारतीय राज्यघटनेचा कलम २४३G नुसार जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रात पंचायत, राज्य व केंद्राचे असे सर्व कार्यक्रम / योजना एकत्रित करून आर्थिक विकास व सामाजिक न्यायासाठी जिल्हा विकास योजना तयार व अमलात आणण्याबाबत निर्देश आहेत. या संदर्भातील घटनात्मक तरतुदीचा प्रकरण १.२ मध्ये तपशीलवार वर्णन करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, स्थानिक सरकार म्हणून जिल्हा पंचायत देखील स्थानिक नागरिकांना मूलभूत सेवा पोहचविणे आणि लोकसंख्येतील गरीब आणि उपेक्षित घटकांच्या असुरक्षिततेची पूर्तता करण्याची जबाबदारी स्वीकारते. उपलब्ध संसाधनांच्या कार्यक्षम आणि जबाबदार वापराद्वारे आणि त्यांची प्राथमिकता पूर्ण करण्यासाठी संसाधनांचा विस्तार करून केवळ गरजांवर केंद्रित योजनांच्या अंमलबजावणीद्वारे हे साध्य केले जाऊ शकते. याची खात्री देखील करणे आवश्यक आहे की ग्रामपंचायत, पंचायत समिती जि.प. व राज्य शासनाच्या अन्य विभागांमार्फत हाती घेतलेल्या कामांबाबत दुबार केली जाऊ नये.

गेल्या अडीच दशकांमध्ये जिल्हा पंचायत पातळीवर सहभागात्मक नियोजन प्रक्रियेस प्रोत्साहित करण्यासाठी राज्य व केंद्र सरकार नेहमीच पुढाकार घेत आहेत. मात्र अपुरी संसाधने, लोकांचा सहभाग, क्षमता वाढ आणि यासारख्या विविध आव्हानांमुळे ग्रामीण भागासाठी व्यापक आणि दूरदर्शी जिल्हा विकास योजना (डीडीपी) तयार होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. मात्र आता जिल्हा विकास योजनाकरिता पंधराव्या वित्त आयोगाच्या अनुदानाद्वारे भारत सरकार आणि राज्य सरकारच्या सक्रिय सहभागामुळे मोहिमेला चालना मिळाली आहे. म्हणूनच, जिल्हा विकास आराखडा व्यापक पद्धतीने तयार करण्याची आणि समानता व समावेशकतेसह त्यांची गुणवत्ता वाढविण्याची वेळ आली आहे. शिवाय, जिल्हास्तरावर केंद्र व राज्य सरकारची अंमलबजावणी करणाऱ्या विविध योजना व बहुतांश संस्था, योजना आहेत. म्हणूनच जिल्हा स्तरावर नियोजनात अभिसरणांना मोठी संधी आहे. ग्रामीण भागासाठी जिल्हा विकास योजना तयार करणे ही कालबद्ध प्रक्रिया आहे. ग्रामपंचायत व पंचायत समीतीकडून जीपीडीपी पूर्ण झाल्यानंतर जिल्हा नियोजन आराखडा तयार केला जावा.

पंचायत समितीचे विकास आराखडे हे जिल्हा विकास आराखडा तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीस मुलभुत घटक म्हणुन उपयुक्त असतील. जिल्हा विकास योजना उपलब्ध स्त्रोतांनुसार प्राधान्याने लोकांच्या

गरजा, मूलभूत सेवा आणि त्यांच्या आकांक्षा यांच्याशी समरस असावी. हा आराखडा दूरदृष्टीकोन ठेवून आदर्शवत व अंमलबजावणी योग्य दीर्घकालीन असावा, सर्वसाधारपणे तो पूर्ण करायला पाहिजे. ही योंजना पंचवार्षीक स्वरुपाची असावी आणि अंमलबजावणीसाठी वार्षीक स्वरुपात जिल्हा सभेमध्ये ठरविलेल्या विषयानुरुप प्राधान्याने अमलात आणावी.

हा आराखडा दूर दृष्टीकोन ठेवून आदर्शवत व अंमलबजावणी योग्य दीर्घकालीन असावा. जिल्हा सभेच्या आलेल्या प्राथमिकतांच्या आधारे. मानवी संसाधने, पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक क्षमता वापरून मोठ्या प्रमाणात उपक्रमांची योजना आखून अंमलबजावणी करू शकते जिल्हा परिषद कडून योजना, अंमलबजावणी व देखरेख करणे शक्य आहे. या व्यतिरिक्त, प्रत्येक जिल्हा परिषदेने त्या योजना उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करणे आवश्यक असू शकते ज्यामध्ये दोन किंवा त्यापेक्षा जास्त गट समाविष्ट आहेत कारण अशा परिस्थितीत जिल्हा परिषद अशा उपक्रमांची जबाबदारी स्वीकारण्याची अधिक चांगली स्थिती असेल. तथापि ती फक्त एका पंचायत समितीमध्ये देखिल अंमलबजावणी करू शकते. **सर्वसाधारणपणे जिल्हा विकास योजना सर्व ग्रामपंचायतींनी आणि पंचायत समितींनी आपली विकास योंजना पुर्ण केल्यानंतर करावयास पाहीजे.**

## ६.१ जिल्हा विकास योजनेची प्रक्रिया :

जिल्हा विकास आराखडा सुधारित पद्धतीसह सहभागी समावेशक आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे तयार केला जाऊ शकतो. कलम ४.१ मिशन अंत्योदयच्या सर्वेक्षणात निदर्शनास आलेल्या विकासातील त्रृटी चे संकलन करून जिल्हा नियोजनाचे आराखडयात उपाययोजना समाविष्ट कराव्यात यामध्ये ग्रामपंचायत आणी पंचायत समिती स्तरावर समाविष्ट बाबीची पुनरावृती होउ नये. अशा प्रकारे जिल्हा नियोजन आराखडा गरज आधारीतआणि ग्राम व तालुक्यास पुरक होईल तसेच राष्ट्रीय लक्षांकउदा. शाश्वत विकास ध्येय आणि प्राधान्यआणि अनुक्रम पुर्ततेसाठी जिल्हा विकास आराखडे महत्वपुर्ण ठरतील.

तालुका आराखडयामध्ये आणि जे प्रकल्प व उपक्रम एकापेक्षा जास्त तालुका क्षेत्रात राबवायचे आहेत परंतु तांत्रिक कार्यक्षमतेच्या किंवा संसाधनांच्या अभावामुळे तालुका आराखडयात समाविष्ट होऊ शकत नाहीत, असे उपक्रम जिल्हा पंचायत नियोजन समिती कडून समावेश करण्याबाबत विचार केला जाईल. जिल्हा विकास योजना त्याशिवाय जिल्हा विकास आराखड्यात उपक्रम अनुदानाच्या तत्वाचे पालन करून जिल्हा पंचायतीने राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा समावेश असेल. जिल्हा परिषद आराखडयाला जिल्हा सभेद्वारे मान्यता देण्यात येईल व जिल्हा सभेमध्ये सर्व जिल्हा परीषद सदस्य, गट पंचायत समिती सभापती व उपसभापती , संबंधित जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक सरपंच प्रतिनिधी यांचा समावेश असुन जिल्हा सभेद्धारे मान्यता देण्यात येईल व ही बैठक जिल्हा म्हणून विचारात घ्यावी लागेल. सभेकरीता निवडलेल्या प्रतिनिधीं शिवाय राज्य शासनाचे इतर विभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी, शैक्षणिक, डॉक्टर, स्वयंसेवी संस्था, महिला गटातील प्रतिनिधी यांनाही जिल्हा सभेचे सदस्य म्हणून नामनिर्देशन केले जावे. जिल्हा सभेचे अध्यक्ष जिल्हा परीषद अध्यक्ष असतील आणि जिल्हा पंचायत अधिकारी जिल्हा सभेचे संयोजक म्हणून नामनिर्देशित होऊ शकतात. तथापि, राज्य सरकारच्या मान्येतेने आर्थिक बाबी सक्षम प्राधिकरणाद्वारे मंजूर केल्या जातील.

जिल्हा परिषदेच्या बाबतीत. जिल्ह्याच्या स्वरुपावर आणि नियोजनाची व्याप्ती लक्षात घेऊन एकूण ६०-१०० सभासदांना जिल्हा सभेसाठी नामनिर्देशितकेले जाऊ शकते. जिल्हा पंचायतीचे अध्यक्ष एखाद्या एनआरएलएम तज्ञ अधिकाऱ्यास किंवा जिल्हा नियोजन समितीचे जिल्हा सदस्यास जिल्हापंचायतनियोजन समितीचे (डीपीपीसी) सभासद म्हणून नियोजनास प्रख्यात तज्ज्ञ व्यक्तीकडून नामनिर्देशित करू शकेल.

**जिल्हा विकास योजनेची प्रक्रिया खालीलप्रमाणे असू शकते.**

i .ग्रामीण भागासाठी जिल्हा विकास आराखड्याची संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी संपूर्ण नियोजन प्रक्रियेचा समन्वय व सोयीसाठी जिल्हा विकास नियोजन समितीची (डीडीपीसी) स्थापना.

ii. वातावरण निर्मिती आणि समुदाय एकत्रीकरण

iii. प्राथमिक आणि दुय्यम महत्वाची माहीती संकलन .

iv. परिस्थिती विश्लेषणगरजा निश्चितीआणि कमतरताओळखणे आवश्यक आहे.

v. विकास स्थिती अहवाल

vi. उद्धिष्ट निश्चित करण्यासाठी प्राधान्यक्रमाची निवड.

vii. संसाधन निश्चितीकरीता संकलन प्रकीया अनुसरणे-विशेष जिल्हा सभा.

viii. योजना विकास, प्राथमिकता आणि प्रकल्प निश्चिती.

ix. जिल्हा विकास योजना मान्यता अंमलबजावणी, देखरेख आणि परिणाम विश्लेषणास मान्यता

**जिल्हा विकास आराखड्याचे आराखडा रेखाचित्र ११ च्या माध्यमातून दर्शविले जाऊ शकते.**

**Diagram 11: Plan Cycle of District Development Plan**



## ६.२ जिल्हा पंचायत नियोजन समितीची स्थापना व क्षेत्रीय कार्य गट :

प्रत्येक जिल्हा पंचायतीने वार्षिक जिल्हा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे व्यापक सहभाग सक्षम करणे, संसाधनांचा इष्टतम उपयोग आणि अपेक्षित कमाल विकासात्मक फायदे मोठ्या संख्येने घेणे. सुप्रसिद्ध, परोपकारी, ऐच्छिक, जिल्हा पंचायतीला कोण मदत करू शकेल अशा व्यक्तीची मदत घेऊन समग्र व दूरदर्शी योजनेचे नियोजन करणे. यासाठी समिती स्थापन केली जाऊ शकते. उदा. जिल्हा विकास योजना तयार करण्यासाठी जिल्हा पंचायत नियोजन समिती (डीपीपीसी) जिल्ह्याच्या तयारीचा सराव घेईल. जिल्हा पंचायत अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली विकास समितीचा आकार आणि रचना वेगवेगळी असू शकते. शासनाच्या विविध विभागातील प्रतिनिधी, जिल्हा परिषद स्तरावरील राज्य शासनाचे कर्मचारी कायम सदस्य असले पाहीजेत. ग्रामीण क्षेत्रात ज्यांचे ज्ञान , कौशल्य याचा उपयोग होईल अशा व्यक्तींना समितीमध्ये घेतले जावे. इतर जिल्हामधील, राज्यामधील अथवा समितीमधील सदस्य अथवा लौकीक प्राप्त नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीना देखिल जिल्हा पंचायत नियोजन समितीमध्ये घेण्यात यावे. शासनाने दिलेल्या सुचना निर्देशान्वये सर्व यंत्रणाचे शासकिय व जिल्हास्तरीय अधिकारी कार्य करतील याची खात्री करणे.

जिल्हा विकास आराखडा तयार करणे व अमलात आणणे यासाठी हा गट प्राधान्याने काम करील. हा गट प्राधान्याने ग्रामपंचायत नियोजनाचा (GPDP) व अंत्योदय सर्वेक्षणाची माहीती गोळा करील आणि ग्रामपंचायत व पंचायत समितीला सुविधा देणाऱ्या सर्व संबधितांशी समन्वय राहील तसेच विविध विभागाचे कार्यकारी गटाशी समन्वय ठेवेल.जिल्हा पंचायत नियोजन समितीची सूचक रचना पुढील तक्त्यात दिली आहे.

**जिल्हा पंचायत नियोजन समितीची रचना पुढील प्रमाणे**

| अ. क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | जिल्हा परिषद उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | जिल्हा परिषदने निवडलेले प्रतिनिधी | सभासद |
| ४ | जिल्ह्यातील पंचायत समितीचे सभापती | सभासद |
| ५ | जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे सरपंच प्रतिनिधी | सभासद |
| ६ | जिल्हा नियोजन अधिकारी | सभासद |
| ७ | विभागीय वन अधिकारी | सभासद |
| ८ | एनआरएलएमचे प्रतिनिधी | सभासद |
| ९ | जिल्हा कृषी अधिकारी | सभासद |
| १० | कृषी उत्पन्न पणन समितीचे अध्यक्ष | आमंत्रित |

| | | |
|---|---|---|
| ११ | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | आमंत्रित |
| १२ | एक स्वच्छता तज्ञ | आमंत्रित |
| १३ | एक अर्थशास्त्रचे प्राध्यापक | आमंत्रित |
| १४ | जिल्हा परिषद उप -मुख्य कार्यकारी अधिकारी (सा./ प.) | सदस्य सचिव |

नियोजनला पाठिंबा देण्यासाठी जिल्ह्यात एखादा प्रख्यात तज्ञ उपलब्ध असल्यास त्याला किंवा तिला जिल्हा परिषद नियोजन समितीमध्ये नियुक्त केले जाऊ शकते. नियोजन समितीचा कार्यकाळ जिल्हा परीषदेच्या कालावधी इतका असेल. समितीत रिक्त पदे असल्यास ती तात्काळ भरली जावी.

**जिल्हा परिषद नियोजन समितीचे कामे खालीलप्रमाणे आहेत.**

- जिल्ह्यातील दीर्घकालीन विकासाचा दृष्टीकोन विकसित करण्यासाठी जिल्हा परीषद आणि क्षेत्रीय कार्यकारी गटांना सहाय्य करणे.
- जिल्हा विकास योजना तयार करणे.
- विकास क्षेत्राच्या विकासासंदर्भात निरोगी विचार विनिमयास प्रोत्साहित करणे.
- प्रकल्प तयार करण्यासाठी क्षेत्रीय कार्य गटांना सहाय्य करणे.
- अतिरिक्त संसाधन जमा करण्याच्या शक्यतांचा शोध घेणे.
- वेळापत्रकानुसार उपक्रमाची अमंलबजावणी होईल यासाठी योग्य समन्वय राखणे.
- कार्यरत गट उपक्रमांचे संयोजन करण्यासाठी जिल्हा परीषदला सहाय्य करणे.
- प्रकल्प नियोजनासाठी योग्य अभ्यास करणे व जिल्हा परीषदला अहवाल देणे.
- भागधारकांना बँक आणि सहकारी संस्थांशी चर्चा करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
- जिल्हा परीषदेच्या नियोजन प्रक्रियेस सहाय्य करण्यासाठी तज्ञ, स्वयंसेवक, शैक्षणिक-तांत्रिक संस्था शोधणे.

**जिल्हा परिषदेमध्ये क्षेत्रीय कार्य गट स्थापन करणे अत्यावश्यक आहे.** क्षेत्रीय कार्य गटांची सूचक यादी उपरोक्त प्रमाणे आहे. तसेच जिल्हा परिषदेने कोणत्याही विशिष्ट विकास क्षेत्राचा विचार करण्याचा निर्णय घेतल्यास, अधिक कार्यरत गट स्थापन केले जाऊ शकतात. योजनेच्या उद्देशाने संबंधित विषय समिती महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम ७८ व ७९ अ नुसार इतर विषय समित्याची स्थापना कलम ८० खाली करण्यात येते. समित्या खालील प्रमाणे

१. विषय समिती
२. बांधकाम समिती
३. कृषी समिती
४. शिक्षण समिती
५. समाज कल्याण समिती
६. आरोग्य समिती

७. महिला व बाल कल्याण समिती

८. जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती (कलम ७९ अ )

सदरील समित्या कार्य गटामध्ये समाविष्ट होऊ शकतात.

**जिल्हा पंचायत मधील क्षेत्रीय कार्य गटांची सूचक यादी**

| अ. क्र. | कार्य गट |
|---|---|
| १ | लोकप्रशासन आणि वित्त (आकडेवारी आणि नोंदी तयार करणे, कारभार सुधारणे इ.) |
| २ | कृषी (उत्पादनांचा साठा, प्रक्रिया व विपणन), मत्स्यपालन, रोजगार हमी योजना, मृदा जलसंधारण, पर्यावरण संरक्षण |
| 3 | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यपालन |
| ४ | आर्थिक विकास आणि उत्पन्न निर्मिती (लहान व्यवसाय संस्था, सूक्ष्म उद्योगांसह) आणि सहकार्य |
| ५ | गरीबी निर्मूलन (गृहनिर्माण समावेश) आणि कौशल्य विकास |
| ६ | सामाजिक न्याय (दिव्यांग, वृद्ध लोक, मुले, ट्रान्सजेंडर इत्यादी) |
| ७ | महिला विकास |
| ८ | अनुसूचित जाती व जमातींचा विकास |
| ९ | आरोग्य आणि पोषण |
| १० | पिण्याचे पाणी आणि स्वच्छता |
| ११ | शिक्षण, कला आणि विकास आणि युवा कल्याण |
| १२ | सार्वजनिक कामे (वीज आणि उर्जेसह) |

**कार्य गटाची रचना (एसडब्ल्यूजी) ची रचना खालीलप्रमाणे -**

i. विशिष्ट कार्यगटासाठी क्षेत्रातील तज्ञास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांद्वारे कार्यगटाचे अध्यक्ष म्हणून नेमणुंक नामनिर्देशित केली जाऊ शकते.

ii. कार्यगटाचे सह-अध्यक्ष म्हणून संबंधित विषय समितीचे सभापती राहतील.

iii. क्षेत्रातील वरिष्ठ जिल्हास्तरीय अधिका-यांना कार्यगट संयोजक म्हणून नियुक्त केले जावे. संयोजक व्यतिरिक्त, दुसरा अधिकारी कार्यगटाचे सदस्य असणे आवश्यक आहे.

iv. महिला व बालविकास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचा विकास यावरील कार्यरत गटांचे अध्यक्ष अनुक्रमे महिला, अनुसूचित जाती व जमातीचे निवडलेले प्रतिनिधी असावेत.

v. प्रत्येक कार्यगटत १० ते १५ सदस्य असू शकतात. त्यांमध्ये संबंधित क्षेत्रातील तज्ञांचा समावेश केला पाहिजे.

vi. आवश्यक असल्यास जिल्हा पंचायत किंवा स्वतः विभागीय कार्यकारी गट या कार्य गटांसाठी उप समित्या गठित करू शकते.

vii. कार्यगटाच्या जबाबदाऱ्या उपसमित्यांनाही लागू आहेत. जिल्हा समिती /कार्यगटाने ठरविल्यानुसार उपसमितीचेअध्यक्ष, संयोजक आणि सदस्य असतील.
viii. प्रत्येक कार्यरत गटात महिला, अनुसूचित जाती आणि जमातीचे प्रतिनिधी वएका पंचायत समितीच्या प्रतिनिधीयांचा समावेश असावा.
ix. कार्यरत गटासाठी कोरम एकूण सदस्यांपैकी एक तृतीयांश असावा. कार्यरत गट बैठकीत संयोजकांची उपस्थिती अनिवार्य आहे.
x. जिल्हा पंचायतीच्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली कार्यगटानी कार्य केले पाहिजे.

**क्षेत्रीय कार्य गटांची कार्ये खालीलप्रमाणे असू शकतात:**

- प्रकल्प नियोजनात लोकसहभाग घेणे.
- लाभार्थी गटाच्या बैठका, बँका किंवा सहकारी संस्थाशी चर्चा, आणि विकास चर्चासत्र अशा चर्चा करण्यासाठी तांत्रिक सहाय्य आणि नेतृत्व प्रदान करणे.
- कार्यरत गटांच्या विषय क्षेत्राशी संबंधित माहिती एकत्रित करणे, संग्रह करणे आणि त्यांचे विश्लेषण करणे.
- प्राथमिक आणि दुय्यम माहिती एकत्रित करून परिस्थितीचे विश्लेषण करणे
- संबंधित विकास क्षेत्राच्या संदर्भात परिस्थितीचे विश्लेषण करून समस्या आणि संधी ओळखणे आणि समस्या सोडवण्याचे प्रस्ताव तयार करणे.
- परिस्थितीच्या विश्लेषणाच्या आधारे, कालबद्ध रीतीने वस्तुस्थितीदर्शक अहवाल तयार करुन तो जिल्हा पंचायत नियोजन समितीकडे सादर करणे, प्रत्येक विकास क्षेत्रासमोरील मोठ्या आव्हानांची, विकासामधील विद्यमान तफावत, विकासात सुधारणेच्या शक्यता आणि कार्यनीतीची रूपरेषा त्यासाठी आराखडा तयार करणे.
- जिल्हा सभेसाठी अहवाल तयार करणे आणि आराखडयास आवश्यक माहिती तयार करणे.
- केंद्र सरकार पुरस्कृत विविध योजना, प्रमुख कार्यक्रम, राज्य योजना आणि इतर योजनांसह स्थानिक विकास प्रकल्पांच्या समन्वयासाठी सल्ला देणे.
- क्षेत्रांमधील आर्थिक आणि तांत्रिकदृष्ट्या शक्य आणि व्यवहार्य प्रकल्पांची तयारी करणे.
- जिल्हा सभेने मंजूर केलेल्या वार्षिक योजनेचे प्रकल्प तयार करणे.
- प्रकल्प अंमलबजावणीवर प्रभावीपणे लक्ष ठेवणे.

## ६.३ जिल्हा नियोजन विकास समिती आणि कार्यगट यांचे प्रशिक्षण :

जिल्हा नियोजन विकास समिती स्थापना झाल्यानंतर, जिल्हा परीषद समितीद्वारे बैठकीचे आयोजन केल्या जावे ज्या बैठकीत जिल्हा नियोजन विकास समिती सदस्य व जिल्हा परीषद सदस्य व अधिकाऱ्यासमवेत विचार विनिमयात सहभागी होतील. त्यांना जिल्हा नियोजन विकास समितीच्या भूमिका व जबाबदारी बाबत सर्वसाधारण कल्पना देण्यात येईल. त्या आधारे, त्यांच्या कामकाजाची एक रणनीती आणि कृती आराखडा तयार करावा लागेल. कृती गट व कार्य गट यांची एक सर्वसाधारण सभा घ्यावी. जेथे त्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येतील. जिल्हा पंचायतीच्या एकूण योजनांची रणनीती व प्राथमिकता सविस्तरपणे जाणून घेण्यात येईल. विविध कार्यगट एकमेकांशी समन्वय ठेवुन त्याची सर्वसाधारण सभेतिल भुमीका निश्चित करतील.

जिल्हा विकास आराखडा तयार होणेकरीता लोकांचा स्वंयस्फूर्त सहभाग नियोजनाची प्रक्रिया विविध लाभधारक गटाने समजून घेणे, परिस्थितीचे विश्लेषण करून समस्यांची निश्चिती आणि प्राधान्य क्रम निश्चित करने, अपेक्षित फल निश्चितीचे आकलन, योग्य अंमलबजावणी इ. बाबी आवश्यक आहे. यासाठी प्रशिक्षण आणि क्षमता वृध्दीसाठी विविध पध्दतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

जिल्हा नियोजन विकास समिती सदस्य कार्यगट सदस्य शासनाचे विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी, विविध पदाधिकारी, तालुकास्तरीय पदाधीकारी, स्थानीक लोकप्रतिनिधी, विविध कार्यगटांचे समन्वयक यांचे व्यावसायीक ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी शासनाने कृतीशिल प्रशिक्षण, स्थळभेटी व व्यावहारीक प्रशिक्षणासाठी आराखडा तयार करावा.

राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था आणि पंचायती राज, हैदराबाद (एनआयआरडी व पीआर) ने जिल्हा परीषद अध्यक्ष, सचिव आणि डीपीपीसीचे सहाय्यक याचे प्रशिक्षण घेण्यासाठी राष्ट्रीय संसाधन व्यक्तींना प्रत्येकी दोन प्रकारच्या प्रशिक्षणांसाठी प्रशिक्षण घ्यावे. अपेक्षित कृती कार्यक्रम प्रकरण ७ मध्ये दिला आहे.

## ६.४. जिल्हा विकास योजनेसाठी वातावरण निर्मिती :

जिल्हा परीषदात विविध माध्यमांचा वापर करुन जिल्हा पंचायत नियोजन प्रक्रियेची प्रसिद्धी करावी. जिल्हा पंचायतीने सर्व जिल्हास्तरीय अधिकारी, जिल्ह्यातील विविध संस्था जसे विद्यापीठे, महाविद्यालये, पॉलिटेक्निक इत्यादी सभा बोलावून या योजना तयार करण्यास सहकार्य करावे अशी विनंती करावी. तसेच जिल्हा पंचायतींनी सेवानिवृत्त व सेवा देणाऱ्या तज्ज्ञांना जिल्हा विकास योजनांना पाठिंबा देण्यासाठी स्वयंसेवा करण्याकरीताआवाहनकरावे. जिल्हा पंचायत स्वयंसेवक तज्ञ आणि संस्थांसह एक आभासी संसाधन केंद्र देखील तयार करू शकते जे डीपीपीसी आणि एसडब्ल्यूजीला तांत्रिक आधार देऊ शकतात. जिल्हा नियोजन आराखडयाची आवशकयता,नियोजन प्रक्रियेसाठी करावयाची कालबदध् कार्यवाही, जिल्हा परीषद विकास समिती आणि कार्यगटाची स्थापना आणि त्यांचा सदस्याची ओळख याबाबत जिल्हा सभेला माहीती देण्यात यावी. जिल्हा परिषद नियोजन समितीने योग्य वातावरण निर्मिती आणि जिल्हा सभेमध्ये

महिलांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी पुढाकार घ्यावा. महिला प्रभाग सदस्य आणि बचत गटांच्या सहकार्याने हे घेता येईल. जिल्हा सभेमध्ये निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सर्व गटातील लोकांना सामील करण्यासाठी, जिल्हा विकास आराखड्यात त्यांच्या प्रश्नांची अधिक चांगली दखल घेण्यात यावी.

समाज आणि प्रशासन यंत्रणेच्या मनोवृत्तीमध्ये बदल, घडवुन आणण्यासाठी, योग्य दृष्टीकोन देण्यासाठी वातावरण निर्मीती प्रक्रियेला खूप महत्त्व आहे. म्हणूनच, डीडीपी प्रक्रियेतील प्रथम क्रिया म्हणजे मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून नियोजन प्रक्रिया सुरू करण्यासाठी तालुका सभा आयोजित करणे. उपरोक्त उपाययोजना व्यतिरिक्त, प्रभावी योजना तयार करण्यासाठी, जिल्हा परिषद नियोजन समितीकडुन लोकांच्या आकांक्षा निश्चित समजन्याकरीता आणि जिल्ह्याच्या आराखड्यात या अपेक्षा प्रवर्तित होण्याकरीता सर्व भागधारक, निवडलेले प्रतिनिधी, बचत गट यांच्यात सकारात्मक वातावरण निर्मिती करण्यात यावी. अशा प्रकारे सर्वसमावेशक जिल्हा नियोजन आराखडा बनविण्यासाठी प्रभावी वातावरण निर्मितीसाठी जिल्हा परिषद नियोजन समिती घेवू शकतील अशा उपक्रमांची एक स्पष्ट यादी परिशिष्ट ८ मध्ये दिली आहे.

## ६.५ ग्रामपंचायत विकास आराखडा व तालुका आराखडा याचे एकत्रीकरण करून विकासाच्या गरजा व प्राधन्यक्रम ठरविणे :

गेल्या पाच वर्षात ग्रामपंचायत विकास आराखड्याच्या (जीपीडीपी) व्यापक प्रक्रियेचा अवलंब करून मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. पंचायत समिती स्तरीय आराखडा (बीडीपी) २०२०-२१ पासून पंचायत समीत्या तयार करीत आहे. ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या नियोजित कृती आराखडयात विकासाच्या गरजा आणि नियोजित उपक्रमांच्या आधारे जिल्हा पातळीवर (जीपीडीपी) आणि बीडीपी एकत्रित केला पाहिजेत हे जिल्हा पंचायत पातळीवरील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. प्रकरण १.४.१ मध्ये नमूद केल्यानुसार ग्रामपंचायत विकासात्मक गरजांवर लक्ष केंद्रित करते . जिल्हा स्तरावरील विकासाच्या गरजा लक्षात घेता ग्रामपंचायत स्तरीय आराखडा जिल्हा स्तरावर एकत्रित करणे जेणेकरून ग्रामस्तरीय व तालुकास्तरीय समस्या यातुन सोडविल्या जाव्यात. या हेतूसाठी जनगणना, एसईसीसी माहीती , मिशन अंत्योदय सर्वेक्षणची माहीती , राज्य शासनाचे ईतर विभागांद्वारे प्रकाशित केलेली माहीती आणि मागील जीपीडीपी सर्वेक्षण इत्यादींचा माहिती प्लॅन प्लस सॉफ्टवेअरमध्ये अपलोड आहे (ई-ग्राम स्वराज्यात समाविष्ट आहे). घटनेच्या अकराव्या परीशिष्टात नमुद केलेल्या एकोणतीस विषयांच्या बाबतीत जिल्हात सदर विषयाचे अनुषंगाने असलेल्या त्रृटी शोधण्यासाठी मिशन अंत्योदय सर्वेक्षणाची माहीती अतिशय उपयुक्त आहे.

प्रकरण १.४ आणि ४.१ वर मिशन अंत्योदय माहिती विषयी तपशील उपलब्ध आहे. २९ विषयांच्या संदर्भात गरजा निश्चित करण्यासाठी जिल्हा पातळीवर मिशन अंत्योदय सर्वे माहीती एकत्रित केला जाऊ शकतो. छत्तीसगडच्या बालोद जिल्ह्यातील कृषी क्षेत्रासाठी उदाहरण 9 मध्ये हे दर्शविले गेले आहे. या आकृती वरून स्पस्ट होते की शासकिय बियाणे केंद्र चे पाठोपाठ पाणलोट क्षेत्रात आणि सर्वाधिक अकृषककामे करणाऱ्या गटामध्ये मोठया प्रमाणावर विकासाचे संदर्भात त्रृटी आहेत. प्रकरण ४.२२ मध्ये स्पस्ट केल्याप्रमाणे E-gram Swarajचे मदतिने ग्रामपंचायत द्वारे प्रारूप राबविण्याच्या विविध विकास प्रकल्पाचे

एकत्रिकरण जिल्हा विकास आराखडयामध्ये करून विकासातील त्रूटी दूर केल्या जातील. यामध्ये प्राधान्याने अशा प्रकल्पाचे एकत्रीकरण करून प्राधान्यक्रम ठरविणे, जे प्रकल्प ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर राबवले जाणे अडचणीचे आहेत.

ग्रामपंचायत विकास आराखड्यातील असे प्रकल्प निश्चित करून त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा प्राधान्यक्रम निश्चित करताना एकापेक्षा अधिक तालुक्यांना होणारा फायदा व विकासाच्या गरजा भागविण्यात या प्रकल्पाची भूमिका या पद्धतीने प्राधान्यक्रम निश्चित करावा.

**आकृती 12: मिशन अंत्योदय - गॅप्स जिल्हा स्तर**

**Diagram 12: Mission Antyodaya – Gaps at District Level**




❖ **No. of GPs in the each parameter and Gap category may be used for planning at District level**
❖ **Similarly, this data is available for all the 29 development sectors and authorised users of MA have access to it**

प्रत्येक क्षेत्रात माहीती संकलनासाठी प्रारुप तयार केले आहेत. अंत्योदय सर्वेक्षण मिशनसाठी वापरली जाणारी पद्धत वापरली जाऊ शकते. जिल्हास्तरीय प्रत्येक विभागीय उपसमित्यांना संबंधित दुय्यम माहीती प्रदान करेल. राज्यांच्या परिस्थितीनुसार, माहीती संकलन व व्यवस्थापन सोपविण्याबाबत एजन्सींचा निर्णय राज्य घेऊ शकेल. याव्यतिरिक्त, ग्रामपंचायतने आणी पंचायत समितीने तयार केलेले प्रकल्पाचे कार्यगटाद्वारे विश्लेषण करावे लागेल आणि त्यानंतर जिल्हा परीषद नियोजन समिती. एकत्रीकरणासाठी सूचक स्वरूप खाली दिले आहे.

| Consolidation of Development Plans of other tiers | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| # | Development Sectors | Own Plan of LSGIs | Integrated Projects of LSGs | | | | | |
| | | | CSS | SSS | External Aid | CFC | SFC | Grand Total |
| | Consolidated Plan of Gram Panchayats | | | | | | | |
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| . | | | | | | | | |
| N | | | | | | | | |
| | Consolidated Plan of Intermediate Panchayats | | | | | | | |
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| . | | | | | | | | |
| N | | | | | | | | |

| Consolidation of Sectoral Plans and Schemes | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| # | Development Sectors | Schemes | | | | | Grand Total |
| | | 1 | 2 | . | . | N | |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| N | | | | | | | |

विकासात्मक गरजा संबंधित माहिती जीआयएस प्लॅटफॉर्मवर अपलोड केला जाऊ शकतो, ज्यामुळे विश्लेषण सुलभ होते. हे कोठे आणि कोणत्या क्षेत्रात समस्या आहे हे निश्चितपणे ओळखण्यास आणि कोणत्या गतिविधीमुळे किती गावे आणि लोकांना मदत होईल. त्याचप्रमाणे अस्थायी विश्लेषण वर्षानुवर्षे महिन्यांच्या प्रगतीस मदत करेल. आकृती 10 च्या माध्यमातून हे दर्शविले गेले आहे की तालुका स्तरावर पाईप वॉटर कनेक्टिव्हिटीसाठी प्राधान्य क्षेत्र ठरविण्यात जीआयएस चांगली मदत करते. त्याचप्रमाणे जीआयएस समस्येचे विश्लेषण आणि स्थान ओळखण्यासाठी उपयुक्त ठरेल, ज्यास जिल्हास्तरीय नियोजनात प्राधान्य दिले जावे. प्रकरण ११.३ मध्ये तपशीलवार म्हणून जीआयएस आधारित नियोजनास प्राधान्य दिले जाऊ शकते.पंचायतराज विभागाने यापूर्वीच प्रत्येक ग्रामपंचायतीला नकाशाचे माहीती देणारी ग्राममानचित्र सुरू केली आहे.अधिक विकासाची क्षेत्रे आणि निर्देशक तसेच पायाभूत सुविधांचा समावेश करण्यासाठी हे वाढविले जाऊ शकते. भुवन पोर्टलचा वापर करता येईल .

## ६.६ परिस्थिती विश्लेषण आणि विकास स्थिती अहवाल (DSR) :

परिस्थिती विश्लेषण म्हणजे जिल्ह्याच्या विकासाच्या स्थितीचे मूल्यांकन होय. मुख्यतः जिल्ह्याच्या विविध विकासाच्या मुद्द्यांवर जिल्ह्यातील परिस्थितीचे परीक्षण करणे आवश्यक आहे. हे पायाभूत सुविधांमधील अंतर, सोयी सुविधा आणि अस्तित्त्वात असलेल्या सेवा तसेच भविष्यातील विकासाच्या संभाव्यतेबद्दल मूलभूत माहिती प्रदान करते. हे विश्लेषण जिल्हा विकास योजनेत समाविष्ट केलेल्या मुद्द्यांसाठी प्राथमिकता निश्चित करण्यासाठी आधार म्हणून काम करू शकते. परिस्थिती विश्लेषण ही एक प्रक्रिया देखील आहे ज्याद्वारे समुदायाच्या समस्या आणि हस्तक्षेप आवश्यक असलेल्या अंतरांची ओळख दिली जाते. बहुतेक क्षेत्रीय माहिती जिल्हा पातळीवर उपलब्ध आहेत. तसेच, ग्रामपंचायत आणि पंचायत समिती कडून आलेल्या सूचनांचा उपयोग करता येईल.

प्रसंगनिष्ठ परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी, दुय्यम माहिती संकलित करणे, त्याचे विश्लेषण करणे आणि दस्तऐवजीकरण करणे आवश्यक आहे. जिल्ह्याच्या अस्तित्वातील परिस्थिती व विकासाच्या स्थितीचे विश्लेषण करावे लागेल. या विश्लेषणामध्ये भौतिक आणि पर्यावरणीय वैशिष्ठ्ये, मानवी-नैसर्गिक संसाधने, सामान्य सामाजिक-आर्थिक स्थिती, प्रत्येक क्षेत्राची स्थिती आणि विद्यमान विकासाचे प्रश्न आणि आव्हाने यांचा थोडक्यात समावेश केला जाईल. अस्तित्त्वात असलेल्या संस्थांविषयी माहिती, पायाभूत सुविधा आणि सेवांची गुणवत्ता गोळा केली पाहिजे. जिल्ह्यात अस्तित्त्वात असलेल्या मूलभूत सेवा, पायाभूत सुविधा (उदा. पिण्याचे पाणी, स्वच्छता, गटार, रस्त्यांची परिस्थिती, स्वच्छता इ.) मधील उणीवा आणि तफावती बद्दल माहिती गोळा केली जाणे आवश्यक आहे.

प्रत्येक कार्यगट एक स्थिती अहवाल तयार केला पाहिजे ज्यामध्ये परिस्थितीत्मक विश्लेषणाचा समावेश असावा. या क्षेत्रीय अहवालांमध्ये मागील तीन ते पाच वर्षांच्या प्रगतीचा समावेश असावा. या अहवालात वाटप आणि वापरल्या गेलेल्या निधी, खर्च आणि भौतिक कामगिरीविषयी तपशील असणे आवश्यक आहे. या कालावधीतील वास्तविक कामगिरीवर आधारित, यशस्वी प्रकल्प आणि यशमागील कारणे आणि प्रत्येक

क्षेत्रातील अपयशाचे स्पष्टीकरण देण्यात येईल. योजनेच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थेत राज्य व केंद्र पुरस्कृत कार्यक्रम, राज्याच्या योजना व इतर विभागांच्या अंमलबजावणीच्या विकास कामांचा तपशील समाविष्ट करून हा भाग परिष्कृत केला जाईल.

सामाजिक विकासाच्या बाबतीत आदिवासी जमातीला भूमीपासून विरक्ती, निष्क्रीय दर्जाची जमीन, कौशल्यांचा अभाव, नोकरीच्या संधींचा अभाव आणि सार्वजनिक सेवा आणि सुविधांचा अभाव यासारख्या अडचणींची यादी करुन त्यावर चर्चा केली जाऊ शकते. आर्थिक विकासाच्या बाबतीत, वाजवी आणि टिकाऊ साध्य करतायेणाऱ्याआर्थिक क्षमतेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. उदाहरणार्थ, शेती उत्पादन आणि उत्पादकता वाढविणे, मूल्ये वाढवू शकतील अशा बाजाराशी जोडणे इत्यादी मर्यादा मोजता येतील. आर्थिक क्रियाशिलतेचा विस्तार आणि वाढती उत्पन्न ही अशा विश्लेषणाचा मुख्य मुद्दा असावा. मानवी विकासाच्या बाबतीत, उणीवांचे मूल्यांकन करणे आणि त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ शिक्षणाची किमान पातळी न गाठण्याची कारणे, शिक्षण सोडण्याचे कारण, कुपोषणाची कारणे इ. ओळखणे आवश्यक आहे.

परिस्थिती विश्लेषणानंतर प्रत्येक कार्यगट त्यांच्या क्षेत्रासाठी विकास स्थिती आराखडा व अहवाल तयार करावा लागेल. मसुद्याचा अहवाल पुढे क्षेत्रीय कार्य गट आणि नियोजन समितीसमोर तसेच निवडलेल्या प्रतिनिधींसोबत संबंधित क्षेत्रातील तज्ञांशी मोठ्या बैठका मध्ये ठेवण्यात याव्यात. कार्यगट उपलब्ध असलेल्या नकाशेच्या विश्लेषणाच्या आधारे स्थानिक परिस्थितीचा विचार करावा लागेल. वर नमूद केलेल्या सभांमध्ये, सांख्यिकी विभागातील तंज्ञाना देखील आमंत्रित केले जाऊ शकते. हे करण्यासाठी, प्रत्येक कार्यगटासाठी एका समर्पित चमूची जागा असणे आवश्यक आहे जे स्थिती विश्लेषण, पाहणी, माहिती आवश्यकता, दुय्यम माहिती एकत्र करणे इत्यादी तांत्रिक सहाय्य प्रदान करेल.

प्रत्येक कार्यकर्ता चे कार्य गटनिहाय विकास प्रारूप आराखडे यांचे एकत्रीकरण करून जिल्ह्याच्या विकास प्रारूप आराखडा तयार करणे हा आराखडा जिल्हा सभेसमोर सादर करणे जेणेकरून लोकांना जिल्ह्याच्या विविध क्षेत्रातील विकास स्थितीचे चित्र स्पष्ट होईल .डीएसआर जिल्हा सभेला खालील बाबी निश्चित करण्यास मदत करेल:

- जिल्ह्याचे विविध क्षेत्रातील विकासाचीसद्यस्थिती विकासाचे उद्दिष्टे साधण्यासाठी असलेल्या मर्यादा राबवित असलेल्या उपायोजना मधील त्रुटी इत्यादी
- जिल्ह्याच्या विकासासाठी लक्षांक गाठण्यासाठी अमलात आणायची कृती संगमसंदर्भात रणनीती
- पुढील पाच वर्षात वार्षिक आधारावर विकासाच्या अजेंडाचे प्राधान्यक्रम
- जिल्हा पंचायतसमवेत विविध प्राधिकरण आणि संस्थांकडून करावयाच्या कार्यवाही संबंधातील मुद्दे

डीएसआरची सूचक बाह्यरेखा परिशिष्ट-एक्स मध्ये देण्यात आली आहे. विशेष जिल्हा पंचायत नियोजन सभेत विचार विनिमयानंतर कार्यगट प्रारूप आराखडा आणि डीएसआरचा मसुदा अंतिम होईल. ज्या आधारे भारताच्या महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील निर्देशकांसंदर्भात तयार केलेला माहिती विचारात घेणे उपयुक्त ठरेल, तसेच मुद्द्यांना अधिक विषयाचे ज्ञान स्वरूप सुस्पष्ट होण्यास मदत होईल आणि विविध विषय जिल्हा विकास आराखडयाद्वारे हाताळण्यास मदत होईल.

## ६.७ कृती आयाम (Visioning Exercise)

आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायाची उद्दिष्टे ठरवण्यासाठी व त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेचा दृष्टिकोण विकास होण्यासाठी_व्हीजनिंग महत्त्वाची प्रक्रिया आहे. जिल्हा परिषदेला विविध क्षेत्रात पुढील पाच वर्षे आणि त्यापेक्षा दीर्घ कालावधीसाठी परिस्थिती दृष्टिक्षेपात येण्यासाठी व्हीजनिंग करणे आवश्यक आहे .या प्रक्रियेद्वारे नियोजनात वस्तुनिष्ठता येणे आणि लोकांमध्ये मालकीची (सामाजिक दायित्वाची) भूमिका निर्माण करण्यास मदत होते. दृष्टी दस्तऐवजद्वारे (**Visioning Document**)जिल्हा परिषदेची जिल्ह्यातील विकासासंदर्भात सेवेची गुणवत्ता वाढविण्याबाबत प्रतिबद्धता दिसून येते. दृष्टी दस्तऐवजाद्वारे जिल्हा परिषदेला तिचे अग्रक्रम निश्चित करणे आणि येणाऱ्या वर्षात गाठावयाचे प्रगतीचे लक्षांक निश्चित करण्यास मदत होते.

जिल्हा पंचायत नियोजन समितीने परिस्थितीनुरूप प्रारूप व प्रारूप विकास स्थिती अहवाल तयार केला की एसडब्ल्यूजी, तज्ञ, जिल्ह्यातील विविध संस्था आणि निवडलेल्या प्रतिनिधींसोबत मोठ्या बैठकीत हा अहवाल सादर करावा. निवडक ग्रामपंचायतींचे सरपंच, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हास्तरीय अधिकारी, बचत गट फेडरेशनचे प्रतिनिधी, इतर भागधारक, व्यावसायिक, तज्ञ, स्वयंसेवक इत्यादी जिल्हा पंचायतच्या दृष्टीकोनातून आमंत्रित होऊ शकतात. या बैठकीसमोर डीपीपीसीने तयार केलेला आणि जिल्हा पंचायत निवड समितीने मंजूर केलेला प्रारूप व्हिजन डॉक्युमेंट ठेवला जाईल, जेणेकरून टिप्पण्या व सूचना प्राप्त होतील व त्यास अंतिम स्वरूप मिळेल.

## ६.८ जिल्हा परिषद स्तरावर नियोजनासाठी स्त्रोत :

जिल्हा पंचायत स्त्रावर डीडीपी मार्फत उपक्रम राबविण्यासाठी आपल्या सर्व संसाधनांचा वापर करावा. म्हणूनच, या मुख्य स्त्रोतांची ओळख पटविणे नियोजन प्रक्रियेचा एक आवश्यक भाग आहे. आकृती 3 मध्ये योजनाबद्धपणे वर्णन केल्यानुसार या स्त्रोतांचे पुढील चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते.

**आकृती १०: नियोजनासाठी स्त्रोत**

**Diagram 10: Resource for Planning**



**अ) सामाजिक संसाधने**- संस्थात्मक शक्ती, शांतता, सामाजिक समरसता / सामाजीक एकता समुदाय

**बी) नैसर्गिक संसाधने** - जमीन, वने, पाणी, हवा आणि सर्व नैसर्गिकरित्या उपलब्ध स्त्रोत संसाधने

**सी) मानव संसाधन**- जिल्ह्यात राहणारे लोक, परिसरातील लोक, विविध क्षमताची सलग्न कार्यक्षम लोक, महिला बचत गट एकत्रित इ.

**ड) आर्थिक संसाधने** -

**जिल्हा परिषद स्तरावर नियोजनासाठी उत्पनाच्या बाबी**

१. १५ वा वित्त आयोग अनुदान

२. राज्य वित्त आयोग अनुदान

३. जिल्हा परिषदेचा स्वनिधी

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम कलम १३० अन्वये ---

१. सामान्य उपकार – कलम १४४

२. वाढीव उपकार अनुदान कलम १५५

२/१ स्थानिक उपकार संक्षिप्त अनुदान कलम १८५

३ मुद्रांक शुल्क कलम १५८

४ पाणी पट्टीवरील उपकार कलम १४६

५ अभिकरण शुल्क कलम १२३

६ व्याज

७ कर व फी आकारणी कलम – १५७

८ वन महसूल अनुदान कलम १८१-क

४ . केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध होणारा निधी

५ . सी आर फंड

६. लोकसहभाग – (रोख, श्रमदान, देणगी )

एकदा सर्व क्षेत्रांची माहिती गोळा केली की पुढील महत्त्वाचा टप्पा वित्तीय स्त्रोतांची निश्चिती करणे उपलब्ध आर्थिक संसाधनाची निश्चिती करताना जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या विविध स्त्रोतांची उपलब्धता गृहीत धरावे. म्हणूनच जिल्हा पंचायत संसाधनाच्या नियोजनात पुढील गोष्टींचा समावेश आहे.

- स्थानिकासह समुदायाच्या योगदानाद्वारे वित्तपुरवठा करण्याचे अभिनव माध्यम परोपकारी, दानशूर व्यक्ती एनआरआय, स्वयंसेवी संस्था, औद्योगिक क्षेत्र आणि बँक लिंक प्रकल्प.
- राज्य शासनाच्या विविध विभागांकडून विविध योंजनां करीता प्राप्त् होणारा निधी माहिती मिळवणे.
- जिल्हा परिषद ला प्रत्यक्ष मिळणारा निधी व अनुदान केंद्र व राज्य शासनाच्या विविध महत्वाकांक्षी योजनाचे अभिसरनाद्वारे प्राप्त होणारा निधी. ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या जिल्हा परिषदेशी कृती संगम करून विविध योजना साठी प्राप्त होणारा निधी. प्रमुख स्त्रोत हा १५ व्या वित्त आयोगाचा असेल परंतु पंधराव्या वित्त आयोगाकरीता बंधनकारक बाबी जसे पाणी स्वच्छता यासाठी तो प्राधान्याने

वापरावा. जिल्ह्यात ग्रामपंचायत आणि पंचायत समितीद्वारे कार्य केले जातात. पुढे, भारतीय राज्यघटनेच्या अकराव्या अनुसुचिमध्ये सूचीबद्ध २९ विषयांवर काम करणारे राज्य शासनाचे विभाग जिल्ह्यात अनेक उपक्रम राबवित आहेत. आदर्शपणे जिल्हा पंचायतने ग्रामीण भागासाठी ही सर्व संसाधने नियोजनासाठी समाविष्ट करणे आवश्यक आहे. अनेक राज्यामध्ये राज्य शासनाद्धारे स्थानीक स्वराज्य संस्थासाठी अर्थसंकल्पीत केलेल्या अनुदान योजनांची अंदाजपत्रकीय प्रणाली, जिल्हा परिषद स्तरापर्यत उपल्बध आह. अशाच प्रकारे राज्य शासनाच्या विविध विभागांना मिळणाऱ्या अंदाजपत्रकीय अनुदान योजनांची माहिती जिल्हा परिषदापर्यत पोहचविणे आवश्यक आहे.

## ६.९ जिल्हा पातळीवर नियोजन करताना लक्ष केंद्रित करावयाचे क्षेत्र :

नियोजित दस्तऐवजाला अंतिम रूप दिल्यानंतर जिल्हा परीषदने लक्ष केंद्रित केलेल्या क्षेत्राला प्राधान्य दिले पाहिजे. पंधराव्या वित्त आयोगाने नमूद केलेल्या अनिवार्य बाबींचा देखील विचार केला पाहिजे. या व्यतिरिक्त, जिल्हा परीषदने घटनेच्या कलम 243 जी अंतर्गत अकराव्या सुचिमध्ये सूचीबद्ध २९ विषयांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अद्याप काही राज्याने ही कामे पूर्णपणे जिल्हा परीषदकडे वळविली नाहीत. तरीही या क्षेत्रांमधील समन्वय साधून त्यांना विविध उपक्रम सुलभ करता येतील. पंधराव्या वित्त आयोगाने प्राधान्यक्रम म्हणून ठरविलेल्या स्वच्छता व पाणी व्यतिरिक्त, जिल्हा पंचायतींनी आर्थिक विकास, मानव विकास, सामाजिक न्याय, कृषी, शिक्षण, आरोग्य, महिलांशी संबंधित बाबी, दीव्यांग व असुरक्षित घटक आणि वृद्ध व दुर्बल यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मुलांचे आणि जे लोक वेगळ्या प्रकारे सक्षम आहेत त्यांचे कल्याण करण्याला प्राधान्य दिले पाहिजे.

प्रकरण ५.९ मध्ये "तालुका स्तरावर नियोजन क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याबाबत" विस्तृतपणे वर्णन केले गेले आहे. हे क्षेत्र जिल्हा पातळीवर देखील केंद्रस्थानी आहेत. परंतु, जिल्हास्तरावर मोठे प्रकल्प हाती घेतले जाऊ शकतात. विकेंद्रित नियोजन ग्रामपंचायती पासून जिल्हा पंचायत पर्यंतचा प्रवास केल्याने आर्थिक विकासाचे कार्य प्रसिध्दीस येतील. केंद्र व राज्य सरकारची अंमलबजावणी करणाऱ्या बऱ्याच यंत्रणा जिल्हा परीषद मुख्यालयाच्या ठिकाणी आहेत म्हणूनच अभिसरण आणि सामूहिक कृती आणि लघु व मध्यम उद्योगास आधार देण्याच्या तसेच विकास आराखड्याच्या मध्यवर्ती टप्प्यावर आणण्यास मदत होईल. ज्या ठिकाणी नैसर्गिक संभाव्यता आहे अशा ठिकाणी ग्रामीण उद्योगाचे केंद्र उभारणे आवश्यक आहे यासाठी खाजगी क्षेत्राच्या आणि सामाजिक संस्थांची मदत घ्यावी. औद्योगिक केंद्र विशेषतः महिलांना साहाय्यभूत असावे .पाणी पुरवठ्यासाठी मोठ्या. धरणाचे जलाशयाचे बांधकाम स्वच्छतेसाठी यंत्राचा वापर आधुनिक पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन इत्यादी बाबी जिल्हा विकास आराखड्यात समाविष्ट करता येतील.

## ६.१० विशेष जिल्हा सभा व राज्य शासनाच्या इतर विभागाचा सहभाग :

जिल्हा विकास आराखड्यास सहभागात्मक पद्धतीने आकार देण्यासाठी विशेष जिल्हा सभा ही सर्वात महत्वाची बैठक आहे. प्राथमिक व आनुषंगिक माहिती गोळा केल्यानंतर विविध क्षेत्राच्या विकासातील

त्रुटी संदर्भात विश्लेषण केल्यावर अर्थ स्त्रोताचा अंदाज निश्चित केल्यावर व्हीजनिंग तसेच इतर आनुषंगिक प्रक्रिया निश्चित केल्यावर बैठकांचे आयोजन करण्यात येईल. या विशेष जिल्हा सभेमध्ये सर्व विकासात्मक गरजा व त्रृटी यावर चर्चा केली जाईल. जिल्हा विकास नियोजन समिती सर्व सदस्याना प्रारूप विकास स्थिती अहवालावर सादरीकरण करेल. सर्व कार्यगट अंदाजित बजेटच्या आवश्यकतेसह त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण करतील. तसेच, विभागातील जिल्हास्तरीय अधिकारी देखील चालू वर्षात राबविण्यात येणाऱ्या योजनाच्या कामांच्या प्रगती व त्याचबरोबर पुढील वर्षाच्या काळात राबविण्याच्या प्रस्तावित उपक्रमांबाबत जिल्हा सभेसमोर सादरीकरण करतील. त्यासाठी निधीचे वाटप करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या इतर विभागाच्या सादरीकरणाची प्रारुप रचना प्रकरण ११ मध्ये दिली आहे. जिल्हा सभे द्वारा जिल्हा विकास आराखडा मान्यता देण्यात आल्यावर जनतेच्या विकासाबाबत प्रकटीकरणाचे निवेदन हे आराखड्यात समाविष्ट केले जाईल. नियोजन कार्यात समन्वय साधण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यानी अनुसूचित जाती व जमाती महिलां सारख्या असुरक्षित भागासह समुदायाचे प्रतिनिधिचा जिल्हा सभेमध्ये सक्रीय सहभाग निश्चित करेल. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एनआरएलएमचा प्रतिनिधी आपले उपक्रम आणि गरीबी निवारण योजना सादर करू शकतात. सभेतील विचारविनिमयातून कार्यगटाचा अहवाल अंतिम करण्यास मदत होईल आणि जिल्हा परीषद विकास समिती विकास स्थिती अहवाल पूर्ण करेल आणिराज्य शासनाच्या इतर विभागांसमवेत अभिसरण आणि सामूहिक कार्यक्रमास सुरुवात करेल. शिवाय जिल्हा विकास आराखड्याची ढोबळ चौकटही निश्चित होईल.

## ६.११ जिल्हाविकास योजनेसाठी राज्य शासनाच्या इतर विभागाच्या योजना व कार्यक्रमाचा कृतीसंगम :

अभिसरण म्हणजे विविध यंत्रणांची कृति कार्यक्रम परिस्थितीचे विश्लेषण करून अपेक्षित परिणामासाठी आवश्यकतेनुसार एकत्रितरीत्या राबविणे. शासनाच्या इतर विभागाचे योजना आणि कृती कार्यक्रम यांची जिल्हास्तरावर नियोजन केलेले असते. जिल्हा परिषदेने सक्रियपणे या विविध विभागाची समन्वय साधून जिल्हास्तरावर अभिसरण घडवून आणावे संयुक्तपणे केलेले विश्लेषण नियोजन आणि जिल्हा विकास आराखड्यात या प्रकल्पाचे समावेश करून हे शक्य होईल. यासाठी विविध यंत्रणा सोबत वारंवार होणारे सुसंवाद आणि समन्वयातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी शक्य होईल.

याचप्रकारे पंचायत समित्यांनी त्यांचे विकास आराखडे सर्वसमावेशक बनवावे पंचायत समितीचे आराखडे व विविध विकास योजनांचा करावयाच्या कृती संघ याचा एकत्रित विचार केल्यास लक्षात येईल की जिल्हा विकास आराखडा चे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योजनांचा तपशील आणि अभिसरण पद्धतीचा तपशील प्रकरण ४.४ मध्ये वर्णन केला आहे.

## ६.१२ प्रकल्प विकास :

प्राधान्यक्रमाने घ्यावयाच्या उपक्रमाचे एकत्रिकरण केल्यानंतर विविध कार्यक्रम शासनाचे इतर विभागाचे तांत्रिक अधिकारी यांच्याशी चर्चा करून जिल्हा नियोजन विकास समिती करण्यायोग्य व अमलात आणण्याच्या कामाची यादी तयार करेल. कार्यान्वित करण्यायोग्य कामे प्रकल्प कार्यगटाने करावेत. जे जिल्हा परीषद विकास समिती द्धारे सत्यापित केले जावेत. आणि शेवटी जिल्हा पंचायतीने मंजूर केलेले असावेत. प्रकल्प प्रचलित अधिनियम शासनाच्या आदेश आणि मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे तयार केले जातात. प्रकल्प, शिक्षण, आरोग्य, कल्याण आणि दारिद्र्य कमी करणे यासारख्या सेवा पुरवठ्यात सुधारणा करणाऱ्या कोणत्याही विषयाचा व उपक्रमाचा या प्रकल्पांत विस्तार केला जाऊ शकतो. प्रत्येक राज्य पंचायतच्या वेगवेगळ्या स्तरावरील सूचनेच्या स्वरुपात हाती घेतलेली कामे विकसित करण्यासाठी प्रक्रिया दर्शवेल. या बाबतप रिशिष्ट १२ मध्ये नमुद आहे . केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांच्या निधीसह जिल्हा पंचायतकडे उपलब्ध असलेल्या संसाधनांशी जुळण्याकरीता ओळखल्या गेलेल्या सर्व कामांचे नकाशे तयार केले जातील. राज्य शासनाच्या इतर विभागाच्या सार्वजनिक आणि देणगीदारांच्या योगदानाची जुळणी करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला जाऊ शकतो. सर्व कामांसाठी येणारे परीणाम स्पष्टपणे व्यक्त करणे देखील आवश्यक आहे. या उपक्रमाना जिल्हा विकास योजनेत समाविष्ट करण्यासाठी प्राधान्य दिले जाऊ शकते. हाती घेण्यात येणाऱ्या प्रत्येक कामकाजाची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी. प्रकल्पाचे मॉडेल स्वरूपन परिशिष्ट १३ मध्ये दिले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था इतर स्थानिक स्तरासोबत संयुक्त प्रकल्प करू शकतो. संयुक्त प्रकल्प म्हणजे त्यासाठी अनेक स्थानिक स्वराज्य संस्था निधी गुंतवणूक करतील व त्या पैकी एक स्थानिक स्वराज्य संस्था हा प्रकल्प मुख्य भागीदार म्हणून राबवेल. प्रकल्पाची निश्चित करण्याचे वेळी संयुक्त प्रकल्पासाठी सहभागी स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारा निधीचे निवेदन बनवण्यात येईल. प्रकल्प राबविणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावा संयुक्त प्रकल्प अहवाल तयार करण्यापूर्वी जिल्हास्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात यावे त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष/सभापती व सचिव यांची जिल्हा परिषद अध्यक्षाने बैठकी आयोजीत करावी. प्रकल्पासाठी निश्चित केलेली कामे आणि जिल्हा परिषदेकडे उपलब्ध निधी यांची सांगड घातली जावी यामध्ये केंद्र व राज्यस्तरीय योजनांच्या निधीच्या देखील विचार करण्यात यावा. शासनाच्या इतर विभागाचा निधी समुदायाचा निधी वर्गणीदारांच्या निधी याची देखील सांगड घातली जावी. जिल्हा विकास योजनेत परिशिष्ट - XVI मध्ये वर्णन केल्यानुसार रचना व अंदाजपत्रक तपशील असू शकतात.

## ६.१३ आराखडा तयार करणे व जिल्हा विकास आराखड्यास मान्यता :

जिल्ह्यातील जीपीडीपी आणि बीडीपीच्या एकत्रीकरणा नंतर जिल्हा पंचायत आराखड्याचा मसुदा तयार केला जाईल. विशेष जिल्हा सभेतील सविस्तर विचारविनिमय करुन प्रत्येक एसडब्ल्यूजी द्धारे उपक्रम राबविण्यात येतील आणि प्रकल्प तयार होईल. जिल्हा परीषद विकास समिती ने त्यांच्या कार्यगटानी तयार केलेल्या प्रकल्पांचा समावेश करुन निश्चित केलेल्या क्षेत्रासाठी मसुदा योजना तयार केली जाईल. योजनेत क्षेत्रनिहाय योजना आणि राज्य शासनाच्या इतर विभागासह अभिसरण असावे. आराखड्याचा संसाधनांची

उपलब्धता आणि सर्व सामाजिक वर्गाच्या सीमांत आणि असुरक्षित गटांच्या उन्नतीसाठी योजनांचा विचार केला जाईल याची खात्री करण्याची गरज आहे. यामुळे सेक्टर आधारित योजना आणि संबंधित राज्य शासनाच्या इतर विभागांसह अभिसरण याची खात्री होईल. आराखडा अंतिम झाल्यानंतर जिल्हासभेसमोर मंजुरीसाठी ठेवली जाईल. जिल्हा एकात्मिक जिल्हा विकासास जिल्हा सभासभेची मान्यता देण्यात येईल.

बैठकी दरम्यान जिल्हा विकास आराखडा आणि प्रकल्पनिहाय बाबीवर सादरीकरण करण्यात यावे आणि प्रस्तावित योजनांवर चर्चा करण्यात यावी जिल्हा सभेने घेतलेल्या निर्णयाचे जाहीर प्रकटन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सूचना फलकावर करण्यात यावेत. प्रत्येक जिल्हा परीषद मधील सार्वजनिक ठिकाणी 10 'X 20' आकाराचे एक सार्वजनिक माहिती फलक **परिशिष्ट** - XVII मध्ये दिलेल्या स्वरुपात लावणे आवश्यक आहे.

## ६.१४ योजना अंमलबजावणी

योजनेच्या संपूर्ण अंमलबजावणी व देखरेखीसाठी जिल्हा पंचायत नियोजन समिती जिल्हा पंचायतीला सहाय्य करणार आहे. जिल्हा पंचायतीने मंजूर योजनेची काळजीपूर्वक अंमलबजावणी केली पाहिजे. योजनेची वेळेत व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी काटेकोरपणे वेळापत्रक पाळल्या गेल्या पाहिजेत. देखरेख आणि देखभालीसाठी यंत्रणा ठेवण्याचीही गरज आहे. ई-ग्राम स्वराज पोर्टलमध्ये ही अंमलबजावणी अपलोड केली जाणे आवश्यक आहे आणि सर्व पेमेंट्स पीएफएमएस पोर्टलमार्फतच केल्या पाहिजेत. प्रकरण ११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्याच्या अंमलबजावणीच्या भाग म्हणून स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगाराची संधी निर्माण करणे देखील सुनिश्चित केले जाऊ शकते.गुणवत्ता  व फलनिष्पत्ती बाबत कोणतीही तडजोड न करता योजना बनविण्याची खात्री करायला हवी.

ज्या राज्यांत जिल्हा पंचायतींना संबंधित क्षेत्रातील कर्मचारी व अधिकारी पुरवले जातात, त्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित क्षेत्राच्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर सोपविण्यात यावी. ज्या राज्यातअशा कर्मचार्‍यांची बदली झालेली नाही अशा ठिकाणी जिल्हा पंचायतीने डीडीपी मध्ये सूचीबद्धव मंजूर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांचा पाठिंबा घ्यावा.

## ६.१५ देखरेख प्रणाली, अनुभवाधारीत बदल करणे व जिल्हा विकास योजना व आराखड्यामध्ये बदल

जिल्हा पंचायतीने मंजूर जिल्हा नियोजन आराखडा कार्यान्वित होईल व प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवले पाहिजे यासाठी यंत्रणा तयार करण्याची गरज आहे. विविध पार्श्वभूमी आणि संघटनांच्या प्रतिनिधींसह विस्तारित देखरेख आणि मूल्यांकन समितीची स्थापना केली जाऊ शकते. मध्यंतरी पंचायत समितीच्या मासिक बैठकीत नियमितपणे होणाऱ्या प्रगतीचा आढावा घेण्यात येईल आणि योजनांच्या अंमलबजावणीत आढळलेल्या कोणत्याही अडचणी पुढील कार्यवाहीसाठी परत डीपीपीसी आणि कार्यगटाकडे पाठविल्या जातील. जिल्हा विकास आराखड्यात राबविल्या गेलेल्या प्रकल्पांचे विस्तृत व मूल्यमापन करण्यासाठी वेगवेगळ्या मंत्रालयांचे प्रतिनिधी, तांत्रिक तज्ञ, बचत गट महासंघातील सदस्य, शैक्षणिक /तांत्रिक संस्थांचे तज्ञ,

माध्यम विभागातील प्रतिनिधींचा समावेश असू शकतो. पारदर्शकता, सहभाग आणि सविस्तर सल्लामसलत करण्यासाठी सुनिश्चित समुदायाच्या देखरेखीसाठी विशिष्ट यंत्रणा बसविली पाहिजे. कार्यगटाच्या सल्ल्यानुसार किंवा स्वतःच डीपीपीसीने उद्‌भवलेल्या अडचणी जाणून मंजूर जिल्हा विकास योजनेत बदल सुचवावेत. तथापि, क्षेत्रनिहाय प्रकल्प अंमलबजावणीचे काम स्वत: कार्यगटाद्वारे केले जाऊ शकते. कार्यगट आणि नियोजन समितीच्या देखरेख अहवालाच्या आधारे योग्यता अमंलबजावणी दरम्यान सुधारणा करण्यासाठी तरतुद करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रकल्प व जिल्हा विकास आराखड्यात बदल, व भर घालण्यासाठी जिल्हा पंचायतीने मान्यता द्यावी लागेल.

**बॉक्स ६: सामान्य कचरा प्लॅस्टिक रीसायकलिंग सुविधा - उत्तराखंडमधील प्लास्टिक व कचरा व्यवस्थापनासाठी यशस्वी पुढाकार**

प्लॅस्टिक प्रदूषण हा देशातील पर्यावरणीय समस्यांपैकी एक बनला आहे. प्लास्टिक उत्पादनांचे वेगवान उत्पादन त्यांच्याशी सामोरे जाण्याची क्षमता देशाला व्यापून टाकते. अंदाधुंदअनियंत्रितबाजार-आधारित वाढ आणि ग्राहकवादी संस्कृतीचे अनुसरण करणारे लोक 'अपरिवर्तनीय कचरा' निर्माण करतात. शिवाय, उत्तराखंड राज्यातील पर्यटनस्थळ म्हणून दरवर्षी पर्यटकांची संख्या कमी होते आणि अशा प्रकारे अविघटनशील कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी नेहमीच एक मोठे संकट येते. पुर्नप्रक्रियेमुळे कचऱ्यामुळे होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होते आणि कच्च्या मालाची गरज कमी होते जेणेकरून पावसाचे जंगल टिकवून ठेवले जाऊ शकते. म्हणून बाटल्या, पॅकेजिंग आणि इतर प्लास्टिक नवीन वस्तूंमध्ये बदल करून, पुन:प्रक्रिया पर्यावरणाला मदत करते आणि नवीन आर्थिक संधी निर्माण करते. प्लॅस्टिक रीसायकलिंग अजूनही उपयुक्त सामग्री लँडफिलच्या बाहेर ठेवते आणि व्यवसायांना त्यांच्याकडून बनवलेल्या नवीन आणि नाविन्यपूर्ण उत्पादनांचा विकास करण्यास प्रोत्साहित करते. सामान्य कचरा व्यवस्थापित करण्याच्या उद्देशाने आणि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, पंचायत राज विभाग भारत सरकार यांना उत्तराखंडमध्ये कॉमन वेस्ट प्लॅस्टिक रीसायकलिंग सुविधा स्थापन करण्याचा प्रस्तावप्राप्त झालेला आहे. रु. २.९५ कोटी आर्थिक विकास व उत्पन्न वर्धित घटकांच्या अंतर्गत, आर.जी.एस.ए. योजने अंतर्गत, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार या प्रस्तावाचे उद्दीष्ट म्हणजे प्लास्टिक कचऱ्यासाठी टिकाऊ विल्हेवाट सुविधा. यामुळे स्थानिक लोकांसाठी प्लास्टिक कचऱ्याचे पुनर्चक्रण करण्याच्या उत्पन्नाची संधीही निर्माण होईल. या प्रकल्पात जिल्हा पंचायत व ग्रामपंचायती विविध क्षमतांमध्ये गुंतलेल्या आहेत. प्रकल्प मूलभूत पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी जमीन आणि भांडवलाच्या गुंतवणूकीच्या बाबतीत जिल्हा पंचायतींनी पुरविल्या गेलेल्या संसाधनांसह देखील जोडला गेला आहे. अलिपूर गावात, भद्राबाद, हरिद्वार येथे स्थापित मिश्रित प्लास्टिक कचऱ्याला टिकाऊ प्लास्टिक वडमध्ये रूपांतरित करण्यासाठी ही संयंत्र पुनर्नवीनीकरण सुविधा आहे. श्री नरेंद्र सिंह तोमर, माननीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री, ग्रामविकास व पंचायती राज, सरकार. भारताचे आणि श्री त्रिवेन्द्रसिंग रावत, माननीय मुख्यमंत्री उत्तराखंड, यांनी फेब्रुवारी २०२० रोजी प्रकल्पातील स्टोन बिछाने फाउंडेशन प्रोग्राम (शिलान्यास व भूमिपूजन) समारंभ केला.

सिडकुल हरिद्धारमधील कॉमन वेस्ट प्लास्टिक रिसायकलिंग सुविधेचा कार्यक्रम-

**बॉक्स ७ : मुर्शिदाबाद जिल्हा पंचायतने, पश्चिम बंगाल हागणदारी मुक्तीसाठी केलेले प्रयत्न**

उघडयावर शौचास जाणेबाबत लोकांचे वागणे व मनस्थिती बदलणे हे जिल्हा प्रशासनासाठी मोठे आव्हान आहे. वर्षानुवर्षे लोक आणि समाजाच्या पूर्वीच्या पद्धतींमुळे खेड्यांचा नकाशा हागणदारी मुक्तीच्या मार्गावर ठेवणे

कठीण होते. जिल्हा प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर हागणदारीमुक्ती आणि त्याच्याशी संबंधित उपक्रम तळागाळातून योजना आखल्या. सामुदायिक जमवाजमव करण्याच्या दृष्टीने समाजातील विविध भागधारकांचा सहभाग, घरगुती शौचालयाची कार्यात्मक स्थिती तपासणे, पूर्वीचे सर्वसाधारण खुले शौच क्षेत्राची तपासणी करणे, लोकांना भेटणे आणि शिवार फेरीद्वारे क्षेत्र समजून घेणे याकरीता 80 लाखापेक्षा जास्त लोकसंख्याचा आढावा घेण्यात आला आणि लोकांच्या वागणुकीत बदल नोंदविला. पंचायतच्या मार्गदर्शनाखाली बचत-गट (एसएचजी) सदस्यांनी नझरदारी आणि गांधीगिरी टीम तयार केली होती. त्यांनी पहाटे व संध्याकाळी हागणदारी प्रवण भागाचे निरीक्षण व तपासणी केली. प्रत्येक घरातील लोकांना भेटावे या उद्देशाने समुदायाच्या सुविधाकर्त्यांनी अभियान सुरू केले आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्याने शौचालयाचा वापर व स्वच्छता पद्धती राखण्याचे महत्त्व यावर चर्चा केली. जिल्हा शाखेच्या कक्षाने सुमारे 8 लाख विद्यार्थ्यांच्या सहकार्याने मिशनचे समर्थन केले आणि प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांच्या पालकांना त्यांच्या घराकडे शौचालयाची विनंती करून त्यांच्या पत्राद्वारे प्रार्थना केली. मुरशिदाबड जिल्हा भागीरथी, जलंगी आणि गंगा व पद्माच्या इतर शाखा नद्यांच्या काठाजवळ आहे. नदीकाठाजवळील खेड्यांमध्ये जिल्ह्याला पूर आला. पूर दरम्यान ग्रामस्थांनी शाळा व सामुदायिक हॉलच्या आवारात आश्रय घेतला. जिल्हा पंचायतीच्या योजनेत आपत्ती व्यवस्थापन योजनेत जिल्हा पंचायतीने पूर निवारा परिसरातील शौचालयांचे युनिट तयार केले.



## प्रकरण - ७

# पंचायत समिती व जिल्हा पंचायत विकास आराखडा निर्मिती करिता प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन

पंचायत समिती व जिल्हा पंचायत आराखडा BPDP/DPDP च्या चांगले नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीकरिता पंचायत समिती व जिल्हा पंचायत स्तरावर असलेले कार्यरत अधिकारी व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची क्षमता बांधणी करणे तथा त्यांचे प्रशिक्षण आयोजन करून त्यांना प्रवर्त करणे हे अंत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक राज्याने BPDP/DPDP करिता क्षमता बांधणी व प्रशिक्षण यासाठी एक योग्य प्रकारचे नियोजन व कृती कार्यक्रम तयार केला पाहिजे. राष्ट्रीय ग्रामीण विकास व पंचायती राज (NIRD&PR) हैद्राबाद संस्था व ग्रामीण विकास आणि पंचायती राज (MOPR) यांनी राज्य स्तरावर प्रवीण प्रशिक्षक तयार करण्यासाठी, पुरेसे प्रशिक्षण सत्राचे आयोजन करावे. BPDP/DPDP तयारीसाठी पदाधिकारी व अधिकारी यांच्या करिता प्रवीण प्रशिक्षक तयार करावेत.

### ७.१ क्षमता निर्माण फ्रेमवर्कची उद्धिष्ट

BPDP/DPDP आराखडा तयार करण्यासाठी क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण याकरिता एक कृतीशील कालबद्ध कार्यक्रमाचे नियोजन करून त्यामध्ये सर्व बाबी प्रशिक्षण संस्था, नियोजन समित्या, क्षेत्रीय कार्यगट, भागीदारी संस्था आणि भागधारक इत्यादी करिता क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन केल्याची खात्री करावी.याकरिता व क्षमता बांधणी कृती कार्यक्रम उद्धेश राज्य पंचायती राज विभाग (SPRD), एसआयआरडी & पीआर आणि इतर संस्थाना व्यापक विकास योजना तयार करण्यासाठी जिल्हे आणि गटांना सक्षम करण्यासाठी योग्य कृती योजनाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत

**क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण कार्यक्रम कृती आराखड्याचे प्रमुख उद्धिष्ट**

१. राज्यस्तरीय संसाधन व्यक्तींना प्रशिक्षण घेण्याकरिता प्रशिक्षण देणे आणि मुल्यांकन आवश्यक आहे.

२. BPDP/DPDP ची तयारी अंमलबजावणी आणि देखरेखीवर निवडलेल्या व्यक्तीकरिता क्षमता बांधणी आणि प्रशिक्षणा करिता मॉडेल ट्रेनिंग डिझाईन तयार करणे.

३. BPDP/DPDP ची तयारी अंमलबजावणी आणि देखरेखीवर संबधित सर्वाची क्षमता बांधणी आणि प्रशिक्षणा करिता योग्य शिक्षण सामुग्री तयार करणे.

४. नियोजन उपक्रम प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने सुरु करण्यासाठी आणि अमलात आणण्यासाठी प्रमुख भागधारकाच्या क्षमता विकसित करण्यासाठी राज्य आणि जिल्हा पातळीवर प्रशिक्षकाची मजबूत टीम विकसित करणे

५. पंचायत समिती व जिल्हा परिषदेची कार्यकारिणी व त्यांच्या नियोजन समितीचे सदस्य आणि क्षेत्रीय गट यांच्यासाठी एक दिवशीय प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

६. पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या नियोजन समितीच्या अंदाजे पाच ते आठ सदस्याना त्यांच्या योजना तयार करण्यासाठी पात्रतेवर आधारित प्रशिक्षणाचे नियोजन करून ते त्यांना देणे.

७. शाश्वत विकासा वर (SDG) आधारित स्थानिक नियोजन करून प्राधान्य क्षेत्र ओळखून टिकाऊ व चिरस्थाई ग्रामीण विकास साध्य करणे.

८. ग्रामीण विकास योजनेचे चांगले परिणाम मिळविण्यासाठी सर्व निवडलेले प्रतिनिधी, अधिकारी आणि समाज नेते यांच्या मनोवृत्ती मध्ये बदल घडविणे

९. पंचायत राज संस्था अधिक बळकट करण्यासाठी पंचायत समिती व जिल्हा परिषद आराखडा सक्षम करणे, तसेच पर्यावरणा मध्ये होणाऱ्या बदलाना समजून घेऊन नवीन आव्हानांना सामोरे जाणे, आपत्ती जोखीम कमी करणे, सामाजिक, आर्थिक व मानव विकास साध्य करणे.

१०. पंचायत राज आणि ग्रामीण विकासातील सर्वोत्कृष्ट पद्धती / याशोगाथाच्या कागदपत्राबाबत राज्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण घेताना या उत्तम पद्धतीचा वापर करणे.

### ७.२ प्रशिक्षणासाठी मुख्य सहभागी व्यक्ती आणि प्रशिक्षण संस्था निवड

बहुतेक वेळेस पंचायत मधील क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये निवडलेले लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनाच सहभागी करून घेतले जाते. तथापि राष्ट्रीय, राज्य, जिल्हा व उपजिल्हा पातळीवरील क्षमता बांधणी आणि प्रशिक्षणा मध्ये विकास कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणीसह प्रशासनाच्या मुलभूत कार्यक्रमामध्ये विविध प्रकारच्या संस्था आणि मानव संसाधने देखील सामील आहेत. गट आणि जिल्हा विकास नियोजनात निवडलेले प्रतिनिधी, पंचायत अधिकारी, नियोजन समितीचे सदस्य, क्षेत्रीय कार्यकारी गट सदस्य, लाईन विभाग अधिकारी, समुदाय नेते, नागरी समाज संस्था, आणि चांगल्या अर्थाने कार्यरत संस्था यांचा सहभाग घेणे आवश्यक आहे. क्षमता बांधणी व प्रशिक्षण या सर्व व्यक्तींना आणि संस्थाना संबोधित केले पाहिजे. संबधित नोडल प्रशिक्षण संस्थेमार्फत राज्य सरकारने वरील प्रमाणे सर्वाची क्षमता वाढविली पाहिजे.

#### ७.२.१ संस्थात्मक समर्थन

पंचायत समिती व जिल्हा परिषदेना १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचे वाटप करण्यात आले असल्याने तेथील निवडलेले सर्व प्रतिनिधी आणि पदाधिकारी व इतर भागधारकांना, व्यापक BPDP/DPDP चे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी क्षमता मिळणे आवश्यक आहे. म्हणूनच प्रशिक्षण संस्थागत पद्धीतीने केले जावे, जेणेकरून पंचायत समिती व जिल्हा परिषदा योजनाबद्ध पद्धतीने नियोजन प्रक्रिया हाती घेतील.

#### ७.२.२ राष्ट्रीय नोडल तथा प्रमुख संस्था

राष्ट्रीय ग्रामीण विकास व पंचायती राज संस्था (NIRD&PR) हैद्राबाद हि पंचायत राज कार्य विकेंद्रीकरण, नियोजन आणि ई–पंचायत आणि राष्ट्रीय, राज्य व उपजिल्हा स्तरावरील ई–पंचायाती मधील इतर सर्व भागधारकाची क्षमता वाढविण्यासाठी नियोजन करणारी सर्वज्ञ संस्था आहे, त्यासाठी SIRD&PR इतर संस्थाचीही मदत घेतली जाते.

**क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण नियोजनामध्ये NIRD&PR चे कार्य खालील प्रमाणे असेल.**

१ राज्य संसाधन व्यक्तींना प्रशिक्षण घेण्याकरिता त्यांना प्रशिक्षण देणे व मुल्यांकन करणे आवश्यक आहे.

२ BPDP/ DPDP ची तयारी अंमलबजावणी व देखरेखीसाठी निवडलेल्या व्यक्तीसाठी क्षमता बांधणी आणि प्रशिक्षणाकरिता मॉडेल डिझाईन तयार करणे.

३ BPDP/ DPDP ची तयारी अंमलबजावणी व देखरेखीवर संबधित सर्वाची क्षमता बांधणी व प्रशिक्षण याकरिता योग्य शिक्षण सामुग्री तयार करणे.

४ पंचायत राज भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार क्षमता बांधणी व प्रशिक्षण याचा योग्य आराखडा तयार करण्यासाठी SIRD यांचे सहकार्य घेऊन संसाधन व्यक्तीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

५ विकेंद्रित नियोजन आणि ई-ग्रामस्वराज इत्यादीसह विविध विषयावर मास्टर ट्रेनर व्यक्तीकरिता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन.

६ प्रमाणित मॉडेल, शिक्षण सामुग्री / प्रशिक्षण मोड्यूल, आईसी सामुग्री विकसित करणे आणि त्यांना मधून मधून अद्यान्वित करणे.

७ पंचायत राज आणि ग्रामीण विकासातील सर्वोत्कृष्ट पद्धती / यशोगाथा नोंदवा आणि प्रशिक्षणाच्यावेळी या सर्वोतम पद्धतीचा वापर करा.

८ प्रत्येक राज्यातील SIRD&PR व इतर संस्थाना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण घेण्याकरिता मार्गदर्शन करणे.

९ पंचायत राज अंतर्गत काम करणा-या व्यक्तीकडून चांगल्या प्रकारे कामगिरी पार पाडण्यासाठी स्पर्धा आधारित प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्रेरित करणे.

### ७.२.३ राज्य प्रमुख (नोडल) संस्था

प्रत्येक राज्यामध्ये राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD&PR) क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण देण्याकरिता नोडल तथा प्रमुख संस्था म्हणून कार्य करते. या राज्य नोडल संस्थाचे मुख्य उद्धिष्ट म्हणजे ज्ञानाची क्षमता वाढविणे, व्यवस्थापकीय कौशल्य विकसित करणे, संघटनात्मक क्षमता विकसित करणे, नेतृत्व गुण आणि निर्णय घेण्याचे कौशल्य, प्रशिक्षणार्थी तथा पंचायत राज व्यवस्थेमधील लोक प्रतिनिधी, अधिकारी व इतर भागधारक यांचे मध्ये क्षमता विकसित करणे. राष्ट्रीय  बाबीमध्ये मार्गदर्शन केले जाईल. राज्य नोडल एजन्सी या कृती कार्यक्रमाची उद्धिष्ट साध्य करण्यासाठी NIRD&PR बरोबर काम करेल, आणि पंचायत समिती व जिल्हा परिषदेमधील निवडलेल्या प्रतिनिधी आणि सदस्यासाठी प्रशिक्षण आवश्यकतेचे मुल्यांकन, प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष आणि नियोजन समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्यासह प्रशिक्षण आयोजित करेल.

### ७.२.४ पंचायत समिती व जिल्हा विकास योजनेसाठी स्थानिक स्तरीय प्रशिक्षण संस्था

१. स्वंयसेवी संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये, आणि विविध विभागातील प्रशिक्षण संस्था यांच्या सहकार्याने त्यांच्या प्रशिक्षणाचा वापर वाढविण्यासाठी प्रशिक्षण दिले जाऊ शकते.

२. अशा स्थानिक प्रशिक्षण संस्था सह भागीदारी संस्थात्मक क्षमता आणि मानवी संसाधन कौशल्य, अनुभव आणि कल्पनाच्या स्वरुपात एकत्र आणले जाऊ शकते

३. ज्यामुळे एकाच संस्थाच्या क्षमतेच्या पलीकडे सामान्य समस्या सोडविण्यासाठी त्यांचा उपयोग होऊ शकतो.

स्थानिक स्तरावर उपलब्ध समर्पित संस्थाचे खालील नेटवर्क कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी वापरले जाऊ शकते.

१ प्रादेशिक ग्रामीण विकास संस्था – SIRD

२ जिल्हा ग्रामीण विकास संस्था - DRDA

३ पंचायती राज प्रशिक्षण संस्था – PRTI

४ विस्तार प्रशिक्षण केंद्र – ETC

५ कृषी विज्ञान केंद्र - KVK

**७.२.५ राष्ट्रीय व राज्य स्तरावरील महत्वाच्या संस्थाची भागीदारी करणे**

पंचायत राज संस्थेची क्षमता बांधणी व प्रशिक्षण यांना वेगवेगळ्या प्रकारचे दृष्टीकोन असून, त्याचे नियोजन करणे तसेच आर्थिक सामाजिक तसेच आर्थीक व सामाजिक विकासा अंतर्गतच्या नागरिकांना द्यावयाच्या विविध सेवा यांचाही समावेश होतो .

NIRD&PR च्या मदतीने, पंचायती राज भारत सरकार, पंचायती राज मधील निवडून आलेले पदाधिकारी व अधिकारी यांची क्षमता बांधणी व प्रशिक्षण यांचे स्वरुपात नियोजन व आखणी करीत आहे.
अधिक चांगल्या प्रकारचे सक्षम नियोजन करण्याकरिता देशांतर्गत व राज्यांतर्गत नावाजलेल्या शासकीय व निमशासकीय संस्थाची निवड करण्याकरिता NIRD/PR पुढाकार घेत आहे ज्यामुळे SIRD/PR आणि राज्यांना लोकाचा सहभाग घेऊन विकेंद्रित नियोजन करण्यास मदत होऊ शकेल.

सदरील संस्थेच्या सेवा NIRD/SIRD द्वारे घेऊन राज्यांना तेथील साधन व्यक्तीच्या टीमला मदत करण्याकरिता देऊ शकतील.

**७.३ पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडा तयार करण्यास सहकार्य करण्यासाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण याकरिता प्रशिक्षणार्थी साधन व्यक्तीची संघ टीम तयार करणे**

पंचायत समिती व जिल्हापरिषदेच्या विकास आराखडयाची १००% क्षमता बांधणी व प्रशिक्षण कव्हरेज तेंव्हाच पूर्ण होईल, जेंव्हा मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी व साधन व्यक्तीची उपलब्धता होऊन प्रशिक्षणाचे काम होऊ शकेल. खऱ्या अर्थाने पंचायत राज मधील व्यक्तीचे क्षमता बांधणी व प्रशिक्षण देण्याचे मोठे आव्हान पूर्ण होऊ शकेल जेंव्हा गुणवतापूर्वक व दर्जेदार प्रशिक्षणार्थी उपलब्ध होऊ शकतील. त्यासाठी विविध स्तरावर द्यावयाचे प्रशिक्षणाचे बहुस्तरीय संस्थान कार्यसंघ रचना सक्षम विभागामध्ये विस्तृतपणे सांगितल्यानुसार स्थापित करणे आवश्यक आहे.

**७.३.१ राज्यस्तरीय मास्टर ट्रेनरची टीम**

जिल्हा स्तरावरील मास्टर ट्रेनरस, साधन समूह, विविध प्रशिक्षण संस्थातील प्राध्यापक तथा फ्कलटीज, तसेच पंचायत राज संस्थातील अधिकारी, लाईन डिपार टमेंटचे अधिकारी, तसेच आराखडा तयार करण्यास मदत करणारे साधन व्यक्ती

यांना प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करण्यासाठी सर्व राज्यांनी राज्य स्तरीय मास्टर ट्रेनरचे ( SLMTT ) चे पथक स्थापन करावे.

**हे करताना राज्यांनी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक राहील**

१. संसाधन व्यक्तीची निवड करण्यासाठी परिभाषित निकष / अटी शर्थी ठरविणे

२. निवृत शासकीय अधिकारी तसेच पंचायत राज व्यवस्थेअंतर्गत काम करण्याचा अनुभव असलेल्या व्यक्तीला संसाधन व्यक्ती म्हणून काम करण्यास प्रोत्साहित करणे.

३. विस्तृत प्रशिक्षणा द्धारे सर्मपित संसाधन व्यक्तीसाठी विस्तृत प्रशिक्षण मोड्यूल विकसित करणे.

४. साधन व्यक्तीच्या कामाचे सनियंत्रण व मुल्तांकन करणे.

५. सतत शिकण्यासाठी विकसित प्रणालीचा विकास

**७.३.२ पंचायतसमिती व जिल्हापरिषद विकास आराखडा करण्याकरिता जिल्हा स्तरीय साधन व्यक्तीच्या ग्रुपची स्थापना**

राज्य पंचायत राज विभाग यांनी पंचायत समिती व जिल्हापरिषद विकास आराखडा तयार करण्यासाठी क्षमता बांधणी व प्रशिक्षण याकरिता प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा संसाधन व्यक्तीचा गट स्थापन करावा

**सदरील जिल्हा संसाधन गटाची कार्य खालील प्रमाणे राहतील**

अ) पंचायत समिती व जिल्हापरिषद मधील व्यक्तीची प्रशिक्षणाच्या व बिगर प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमता बांधणी करणे

आ) पंचायत राज संस्थाना, सातत्याने Hand होल्डिंग सपोर्ट करून, नियोजन आराखड्याच्या प्रत्येक स्टेजवर मार्गदर्शन करणे. जिल्हा संसाधन गटाचे बहुतेक सदस्य वेगवेगळया विभागामधून असल्यामुळे त्यांच्या नियुक्तीसाठी राज्याच्या मुख्य सचिवानी त्या संदर्भाने आदेश निर्गमित केल्यास ते सर्व स्तरावर उपयोगी ठरू शकेल.

जिल्हा संसाधन गटाचे सनियंत्रण व देखरेख करण्यासाठी राज्य शासनाकडून एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

**७.३.३ प्रमाणित संसाधन व्यक्ती**

स्थानिक संसाधन व्यक्तीचा समूह विकसित करून पंचायती राज मधील व्यक्तीचे गुणवता पूर्वक प्रशिक्षणाचे आयोजन करणे हे नेहमीच आव्हानात्मक कार्य आहे.

संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रभाव व सकारात्मक परिणाम हा प्रशिक्षण देण्याच्या कार्य पद्धतीवर अवलंबून आहे त्यामुळे पंचायत राज भारत सरकारच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातून प्रमाणित संसाधन व्यक्ती विकसित करण्यावर भर देण्यात दिलेला आहे. RGSA प्रकल्पांतर्गत गेल्या तीन वर्षापासून NIRD/PR द्धारा “ पंचायत आणि ई-सक्षमते द्धारे भारताचे रुपांतर “ या योजने अंतर्गत आतापर्यंत राज्यभरातील सुमारे ४३०० मास्टर

(११ )

रिसोर्स व्यक्तींना चाचणी व मान्यता देण्याची पद्धतशीर प्रक्रिया पार पाडत त्यांना मार्गदर्शन व प्रमाणपत्रे दिली आहेत. प्रमाणित मास्टर रिसोर्स व्यक्तीची यादी यापूर्वीच राज्यांना आणि SIRD यांना देण्यात आलेली आहे.

NIRD/PR व SIRD/PR राज्याच्या विनंतीनुसार अधिक व्यक्ती प्रमाणित करणे चालू ठेवू शकतात.

प्रशिक्षण संस्थाना, BPDP/DPDP च्या क्षमता बांधणी व प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी, या संसाधन व्यक्तीच्या सेवा घेता येऊ शकतील.

## ७.४ पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडा क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचा दृष्टीकोन

विकेंद्रित नियोजनामध्ये, गट व जिल्हा विकास आराखडे तयार करताना, मुख्यत्वे स्थानिक विकास कामाचे प्राधान्यक्रम व उपलब्ध संसाधनाचा वापर करावयाचा आहे. तालुका व जिल्हा नियोजन आराखडे हि प्रक्रिया समजून घेऊन अनेक टप्प्याद्वारे आराखडे तयार करावयाची आहेत. त्यामध्ये पारंपारिक ज्ञान प्रशिक्षणा ऐवजी, यात बदल करून, कृतीशील व कौशल्यपूर्ण क्लास रूम आधारित प्रशिक्षण घ्यावयाचे आहे. म्हणून हे करताना प्रशिक्षण व बिगर प्रशिक्षण विषयक गरजाचा मेळ घालून, एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करण्यासाठी परिणामकारक क्षमता बांधणी व प्रशिक्षण द्यावयाचे कार्य करावयाचे आहे.

### ७.४.१ प्रशिक्षण व बिगर प्रशिक्षण गरजासाठी संयुक्त प्रयत्न

प्रशिक्षण संबधित घटकाच्या क्षमताचा विकास प्रामुख्याने प्रशिक्षण व बिगर प्रशिक्षण गरजाचा एकत्रित परिणाम असतो, म्हणून प्रशिक्षण व बिगर प्रशिक्षण गरजाच्या संयुक्त बाबीचा परिणाम असतो.

**प्रशिक्षण गरजामध्ये खालील बाबीचा समावेश असेल**

१. संस्था आधारित सामोरा समोरील (Face to Face) प्रशिक्षण
२. आनलाईन प्रशिक्षण
३. सुविधा आणि Hand होल्डिंग सपोर्ट
४. संवेदन शिबिरे व विविध स्तरावर जनजागृती
५. दृष्टी शिक्षण व ई- लर्निंग

**बिगर प्रशिक्षण विषयक गरजा मध्ये खालील बाबीचा समावेश असेल**

१. वैधानिक समस्या आणि धोरणात्मक आधार व सुधारणात्मक उपाय
२. IEC संसाधनाचा वापर
३. अभ्यास दौरे
४. मुल्यांकन व सुसंवाद
५. Write-shop & mock planing Exercise
६. हेल्प लाईन

**७.४.२ पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडा तयार करण्यासाठी क्षमता बांधणी व प्रशिक्षण कृती आराखडा प्रशिक्षण विषयक गरजा समजून घेण्यासाठी प्रशिक्षण :-**

प्रशिक्षण सविस्तर आराखडा तयार करण्यापूर्वी NIRD/PR मार्फत SIRD मधील वरिष्ठ अधिका-याना गरजेवर आधारित प्रशिक्षण मोड्यूल तयार करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येईल.

**१. जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधीना तोंड ओळख प्रशिक्षण :-**

राज्य ग्रामीण विकास संस्थेच्या नोडल अधिका-या मार्फत जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधीचे प्रशिक्षण आयोजित करून त्यामध्ये जिल्हा विकास आराखडा याची सर्वसाधारण माहिती, पार्श्वभूमी, गरज, उद्ध्येश, जिल्हा विकास आराखड्याचे महत्व, टप्पे व कालमर्यादा याबाबत प्रशिक्षण आयोजित करून माहिती देण्यात येईल.

२. **नियोजन समितीस अवगत करणे :-** जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधी प्रमाणेच नियोजन समिती सदस्यास तोंड ओळख वजा माहिती असणे आवश्यक असून त्यामध्ये खालील बाबीचा समावेश असावा

१ नियोजन समितीची भूमिका व जबाबदारी यांचा समावेश असावा, कारण विकास कृती आराखडा करणे व कालमर्यादा निश्चित करण्यात याचा उपयोग होऊ शकेल. हे काम नोडल अधिका-यांनी करावयाचे आहे, ते नसतील तर राज्य ग्रामीण विकास संस्थामधील (SIRD) वरिष्ठ प्राध्यापकांनी करावयाचे आहे.

३. **क्षेत्रीय कार्य गट तोंड ओळख प्रशिक्षण :-** क्षेत्र निहाय कार्य गटातील सदस्याची सर्वसाधारण सभा प्रारंभिक घेणे अपेक्षित आहे.त्यापैकी

४. स्वंयसहाय्यता गटातील सदस्यासाठी न चुकता सभा घेण्यात यावी या सभामध्ये क्र १ मध्ये नमूद केलेल्या विषया खेरीज

स्वंयसहाय्यता गटाची भूमिका व जबाबदारी सविस्तरपणे विषद करण्यात यावी. हे काम देखील नियुक्त नोडल अधिका-यानेच किंवा वरील प्राध्यापकांने करावयाचे आहे.

**५. जिल्हा विकास व तालुका विकास आराखडा तयार करण्यासाठी क्षमता आधारित प्रशिक्षण :-**

जिल्हा विकास व तालुका विकास आराखडा तयार करताना त्यांचे महत्व, महत्वाचे टप्पे हे नियोजन समिती व स्वंयसहाय्यता गटाना याबाबत माहिती द्यावयाची आहे. त्याचबरोबर त्यांच्या क्षमता वृद्धीसाठी अंतर्मुखता व नियोजन कसे करावे याबाबतचे कौशल्य विकसित करणे अपेक्षित आहे. त्याबरोबर प्रशिक्षण देताना, नियोजन आराखडे कसे करावे व त्यासाठी वापरावयाची आकडेवारी व इतर माहिती, विविध योजनाचे एकत्रीकरण, कृती संगम, विविध योजनाचा अंदाजित खर्च, स्थानिक पातळीवर होणारा परिणाम, याचा समावेश असावा. तसेच उपलब्ध आकडेवारीचा वापर, नकाशे व GIS माहितीचा समावेश असावा.

**७.५ तालुका व जिल्हा विकास आराखड्यासाठी प्रमाणित शिक्षण सामुग्री**

NIRD/PR व संबधित राज्याचे SIRD/PR व संबधित नोडल अधिका-यांनी तयार केलेले प्रशिक्षण साहित्य प्रशासकीय विभाग स्तरावर आधारित असून ते सर्वसाधारपणे राज्य धोरणाशी सुसंगत

असे असेल, व त्यामध्ये नियोजन व अंमलबजावणीचे विविध टप्पे, कल्याण कार्यक्रम व १५ व्या आयोगाचा निधी वापराबाबत सूचना

असतील. त्यामध्ये प्रामुख्याने पंचायत राज संस्थाची कार्यात्मक जबाबदारी, विविध विभागाच्या योजना, अंमलबजावणीची अचूक पद्धती, खर्चाचे अंदाज, लेखांकन व लेखापारीक्षण पद्धती इत्यादीचा समावेश असावा. तसेच त्यामध्ये प्रामुख्याने नियोजनाचे विविध टप्पे, कार्यक्रम अंमलबजावणी, सनियंत्रण आणि विविध घटकाची विविध टप्प्यावर भूमिका व जबाबदारी याचा उल्लेख असावा.

**७.६ विविध स्तरावरील प्रशिक्षण (caccading mode of training) :-** जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यरत अधिकारी / पदाधिकारी व सहभागी लाभार्थी यांची क्षमता बांधणी करण्यासाठी विविध स्तरावर प्रशिक्षण द्यावे लागणार आहे, म्हणून प्रशिक्षणाच्या गुणवतेमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड न करता प्रशिक्षणाचे विविध स्तरावर आयोजनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षक लागणार आहेत. त्यासाठी NIRD/PR प्रमाणपत्र प्राप्त प्रवीण प्रशिक्षकाला सहभागी करावे. असे करताना प्रशिक्षण संसाधनाची गुणवत्ता, कौशल्य व दृष्टीकोन बदल याचा विचार नियोजन पद्धती मध्ये करावा. यासाठी राज्य शासनाने पंचायत समिती आराखडा व जिल्हा विकास आराखड्याचे प्रशिक्षण, अंमलबजावणी आणि सनियंत्रण करण्यासाठी नोडल अधिका-याची नियुक्ती करावयाची आहे.

**७. ७ आन लाईन प्रशिक्षण**

सर्वसाधारणपणे पारंपारिक प्रशिक्षण हे आमने सामने बसून बंद वर्गामध्ये आयोजित केले जाते. परंतु कोविड –१९ आप्तीच्या पार्श्वभूमीवर पाळावयाचे सामाजिक अंतर, प्रवासावर आलेले निर्बंध पाहता असे प्रशिक्षण आयोजित करणे अवघड /कठीण आहे. अशा परिस्थितीमध्ये संपूर्ण देशात प्रशिक्षण आयोजित करणे एक आव्हानात्मक काम असून त्यासाठी अन्य पर्यायाचा देखील विचार करावा लागेल. Internet व Smart Phone वापरावयाच्या तंत्र ज्ञानाचा वाढलेला विस्तार पाहता On Line प्रशिक्षण हे किफायतशीर तंत्रज्ञान असून वेब बेसड व्हिडीओ कान्फरसिंग (Confercing), ( मायक्रो साफ्ट टीम, गुगल मिट, सिस्को वेबेक्स), व्हर्चुअल क्लास रूम्स लर्निंग, मनेजमेंट पद्धती,(ग्राम स्वराज, स्वयम इ.) इत्यादीमुळे कोणत्याही व्यक्ती कोणत्याही वेळा प्रशिक्षण घेणे शक्य आहे. म्हणून प्रशिक्षण संस्थाना व प्रशिक्षकांना पारंपारिक प्रशिक्षणामध्ये बदल करून On line प्रशिक्षणाकडे जाणे हि काळाची गरज आहे. On line प्रशिक्षण आयोजित करताना प्रशिक्षण कल्पक विषयाशी सुसंगत व प्रशिक्षणार्थी केंद्रित असावे. तसेच प्रशिक्षणामध्ये प्रवीण प्रशिक्षकांनी degital pedagogical issues वर भर देऊन विषयाची संकल्पना स्पष्ट करून विषयाचे सखोल ज्ञान व्हावे, आणि प्रश्न विचारून मागोवा घ्यावयाचा आहे.

**७. ८ क्रास लर्निंग साठी पंचायतचे कार्यरत पदाधिकारी व अधिकारी यांच्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन**

लोकप्रतिनिधीच्या दौऱ्याचे आयोजन करून सर्वोत्कृष्ठ कार्य केलेल्या पंचायती दाखविण्यात याव्यात. हे दौरे केवळ एकमेकांनी केलेल्या कामाची पाहणी करण्यासाठी नव्हे तर यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढू शकेल. तसेच असे काम आम्हीपण करू शकतो असा दृष्टीकोन वाढण्यास मदत होईल. राज्य ग्रामविकास संस्थेने सर्वोत्कृष्ठ काम केलेल्या ग्रामपंचायतीची माहिती संकलित करून राष्ट्रीय ग्रामविकास संस्थेस NIRD हैद्राबाद यांना उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच राज्य, पंचायत राज व ग्रामविकास विभागाने अशा प्रकारे संकलित केलेल्या माहितीची छाननी करून लोकप्रतिनिधीच्या अंतर राज्य दौऱ्यासाठी उपलब्ध करून द्यावी. त्याचप्रमाणे क्षमता बांधणी व प्रशिक्षण यामध्ये (CB&T) पंचायत समिती व जिल्हा परिषद अंतर्गत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करावयाचे आहे.

**७.९ लाईन विभागाशी अभिसरण (सांगड) (convergence with line Department)**

पंचायत विकास आराखडा व जिल्हा विकास आराखड्याची यशस्वीता, प्रामुख्याने पंचायत स्तरावरील नेतृत्वाची क्षमता व देण्यात आलेल्या चांगल्या प्रतीच्या प्रशिक्षणावर अवलंबून असेल. यासाठी सर्व मानवी संसाधने, तसेच पंचायत समिती व जिल्हा स्तरावरील उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाचा चांगल्या प्रकारे उपयोग करणे आवश्यक आहे. तसेच समांतर विभागाचे आराखडे तयार करणे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्रशिक्षणाद्धारे त्यांच्या मध्ये जागृती निर्माण करण्याचे काम हाती घेणे महत्वाचे आहे.

**७.१० पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखड्याच्या यशाची बेटे तयार करणे**

स्थानिक नियोजन करताना, नाविन्य पूर्णतेची ओळख व नवीन संकल्पना महत्वाच्या तर आहेत. त्याचबरोबर क्षमता बांधणी व प्रशिक्षण हि महत्वाची रणनीती असेल. BDP व DDP च्या संदर्भात स्थानिक पातळीवर नियोजनासाठी सक्षम मनुष्यबळ प्रशिक्षणाद्धारे तयार करावे लागणार, तसेच यशस्वी मॉडेलस गण स्तरावर तयार करणे, राज्यांनी अशा प्रकारे जास्तीत जास्त स्थळे (बेटे) तयार करून त्याचा उपयोग अभ्यास केंद्र तथा कार्यात्मक प्रयोगाचा भाग म्हणून इतर संस्थासाठी त्याचा उपयोग करावयाचा आहे. तसेच सध्या उपलब्ध असलेल्या यशस्वी मॉडेलचा देखील नेतृत्वास प्रोत्साहन देण्यासाठी उपयोग करता येईल.

**७.११ पंचायत समिती आणि जिल्हा परिषद विकास आराखड्याची क्षमता बांधणी व प्रशिक्षण सनियंत्रण**

क्षमता बांधणी व प्रशिक्षण आणि त्याच्या सनियंत्रण टप्प्याचे तसेच मंजूर केलेले आराखडे अपलोड करण्यासाठी सध्या उपलब्ध असलेले On line plat form त्यामध्ये ई-ग्रामस्वराज Training management portal (TMP) चा दैनदिन सनियंत्रण करण्यासाठी उपयोग करावयाचा आहे. सनियंत्रण करताना प्रशिक्षणाचे विविध टप्पे व त्यानुसार प्रगती, प्रशिक्षण वेळापत्रक, नियोजन आराखडे तयार करणे व त्याचे ई-ग्रामस्वराज पोर्टलवर व राज्याचे पोर्टल असतील तर त्यावर अपलोड करणे इत्यादी बाबी करावयाच्या आहेत.

# प्रकरण ८ वे

## नॉन-पार्ट IX क्षेत्रात तालुका आणि जिल्हा विकास नियोजन आराखडा तयार करणे

### ८.१ नॉन-पार्ट IX क्षेत्रात गटविकास आराखडा तयार करणे

सर्वसाधारणपणे गटविकास आराखडा तयार करण्याचे वर्णन ५ व्या प्रकरणामध्ये केले आहे. ४ थ्या प्रकरणात पंचायत समिती आणि जिल्हा परिषद विकास आराखड्यामध्ये समाविष्ठ करण्यासाठी महत्वाच्या योजना, सेक्टर, थीम्स आणि मुद्दयांचे तपशिलवार वर्णन केलेले आहे. जरी ग्रामविकास योजना सन २०१८ मध्ये नॉन-पार्ट IX क्षेत्रात सुरुवात केली आहे, तरी तालुकास्तरावर तालुका नियोजन प्रणाली स्थापन करण्याची आवश्यकता आहे. अनेक राज्यात गटस्तरीय उपक्रम वेगवेगळया विभागातील अधिका-यां मार्फ़त गटविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली राबविले जातात. तसेच तालुकास्तरावर बरेच विभाग स्वतंत्रपणे काम करतात. तेथे कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्थेचे निवडून आलेले सदस्य नसतात, उदा. तालुकास्तरीय पंचायत. तथापि काही राज्यांमध्ये व्यक्ती नियोजन उपक्रमांना समर्थन देतात.

गट स्तरावरील नियोजनाच्या फायद्याचे कौतुक करण्याची गरज आहे कारण यामुळे संपूर्ण गट क्षेत्राची आवश्यकता एकत्रित केली गेली आहे आणि सहभागी व समावेशक गट विकास योजना तयार करण्याची प्रक्रिया प्रकरण ५ मध्ये तपशीलवार नमुद केली आहे . म्हणून, नॉन-पार्ट IX क्षेत्रातील गट स्तरावरील नियोजन प्रक्रिया प्रकरण ५ मध्ये वर्णन केल्याप्रमाणेच असू शकते. परंतु अशाप्रकारच्या उपक्रमाचे नियोजन यापूर्वी केलेले नसल्यामुळे उपक्रमाची माहिती देवून लोकांची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. दरम्यानच्या पंचायतस्तरीय नियोजन समितीच्या जागी तालुकास्तरीय नियोजन समिती मध्ये तज्ञ आणि अधिकारी आणले जाऊ शकतात. त्याचप्रमाणे, नामनिर्देशित सदस्य व अधिकारी यांना घेऊन गटसभा आणि क्षेत्रीय कार्यगट गठीत केले जाऊ शकतात. तथापि प्रकरण ५ मधील तपशीलवार प्रक्रियेव्यतिरिक्त आणि प्रकरण ४ मध्ये वर्णन केलेल्या वैचारिक चौकटी व्यतिरिक्त व्यापक नियोजनास पाठिंबा देण्यासाठी पुढील मुद्द्यांचे पालन केले जाऊ शकते.

**अ) नियोजन प्रक्रीयेमध्ये समुदाय आधारीत देशी संघटनांचा समावेश –**

नॉन-पार्ट IX भागामध्ये खुप मोठया प्रमाणात सामाजिक परंपरेनुसार संघटना असतात. सामाजिक संघटनांना त्याभागातील लोकांच्या रुढी व परंपरा याबाबतची माहीती व जाण असते. नियोजन प्रक्रीयेमध्ये या सामाजिक संघटनांना विश्वासात घेतल्यामुळे स्थानिक लोकांच्या भावना, समस्या, गरजा व प्राधान्यक्रम लक्षात येतात.

**ब) ग्रामीण भागातील लोकांना नियोजनासाठी एकत्र करणे सहभाग घेणे –**

ग्रामीण भागातील लोकांचा नियोजन प्रक्रीयेमध्ये प्रशासनाने गहण व व्यापक स्तरावर नियोजन व इतर उपक्रम घेणे आवश्यक आहे. या गोष्टीला दुर्गम व विखुरलेल्या वस्त्यांमध्ये मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देणेत यावी.

**क) सहभागात्मक नियोजन प्रक्रीयेसाठी सामाजिक समावेश–**

या भागामध्ये विरळ लोकसंख्येसह दुर्गम, भौगोलिक सामाजिक व आर्थिक वंचीत भागाचा समावेश असतो. त्यामुळे प्रशासनाने याभागातील लोकांचा नियोजन प्रक्रीयेमध्ये सहभाग घेणेसाठी धोरण आखले पाहीजे. जेणेकरुन त्या लोकांच्या समस्या व गरजा कळू शकतील.

**ड) प्रवर्तकांच्या विशेष गरजा –**

सर्वसाधारण भागा मध्ये नियोजन समिती मध्ये एक प्रवर्तकाचा समावेश करणेत यावा. गरजेच्या ठिकाणी तालुकास्तरीय नियोजन समिती मध्ये तीन प्रवर्तकांची नेमणूक करता येईल. प्रवर्तक महत्वाच्या क्षेत्रीय कार्यगटात सामील होवू शकतात.

**इ)** ADC भागात कार्यकारीसदस्य हे तालुका नियोजन समितीचे अनिवार्य सदस्य राहतील. अशा प्रतिनिधींची संख्या स्थानिक गरजे नुसार ठरविणेत येईल.

**फ)** पंचायत स्तरावरती पंचायतराज विभागाच्या लोकांची कमी प्रमाणात संख्या असते. त्यामुळे तालुकास्तरीय नियोजन समितीमध्ये ग्रामविकास विभाग, कृषीविभाग, वनविभाग, फलोत्पादन विभाग व आदिवासी विभाग यांचा समावेश करणे तयावा. तसेच वरील सर्व विभागांचा क्षेत्रीय कार्यगटामध्ये समावेश करणे तयावा.

### ८.२ नॉन-पार्ट IX येणाऱ्या भागांचा विकास आराखडा तयार करणे

जिल्हा हा देशाच्या कारभारातील महत्वाचा घटक आहे. परंतु स्वायत्त परिषदेबरोबर जिल्हे एक संघ नसतात. असे सुध्दा असु शकते की, एका परिषदे मध्ये अनेक जिल्हे असु शकतात. किंवा परिषद ही जिल्हयाचा घटक असु शकतो. जिल्हास्तरावरील नियोजन व परिषद स्तरावरील नियोजनाबाबत राज्यसरकारने कार्यपध्दती निश्चित करावी. व

त्यानुसार मार्गदर्शक सुचना द्याव्यात. काही वेळा जिल्हयाचा विकास आराखडा बनविणेत आलेला असेल व परिषद ही जिल्हयाचा भाग असेल त्यावेळेस परिषद विकास आराखडा हा जिल्हा विकास आराखडयाचा भाग असेल. जर परिषदेत एकापेक्षा जास्त जिल्हयांचा समावेश होत असेल त्यावेळी जिल्हा विकास आराखडा तयार करणेत यावा. व त्याचे परिषदे साठी एकत्रिकरण करावे. त्यामुळे नॉन-पार्ट IX भागातील सर्व जिल्हयांसाठी तयार करणेत आलेला जिल्हा विकास आराखडा समान दृष्टीकोन व प्रकरण ६ मध्ये वर्णन केलेल्या पध्दतीने व प्रकरण ४ मध्ये विस्तृतपणे नमुद केलेल्या वैचारीक मुद्दयांच्या आधारे तयार होईल. त्या व्यतीरीक्त मागील परिशिष्ठात दिलेल्या पध्दतींचा अवलंब करावा. जिल्हयात लोकस्तरावरती कोणतेही प्रतिनिधी नसल्याने जिल्हा पंचायत नियोजन समिती व क्षेत्रीय कार्यगटामध्ये त्या भागातील संबंधित अधिकारी / विषयतज्ञ यांचे नामनिर्देशन होऊ शकते. असे असले तरी नियोजनाची कार्यपध्दती व प्रक्रीयाही वर्णन केल्याप्रमाणे समान राहील. स्थानिक प्रतिनिधीत्वाची गरज व तालुकास्तरीय पंचायतींच्या अभावामुळे ग्रामीण भागातील जिल्हा नियोजन समिती वर पाच प्रवर्तकांचे नामनिर्देशन करणे तयावे. स्वायत्त जिल्हा परिषद संस्थेचे निवडून आलेले सदस्य / कार्यकारी सभासद हे जिल्हास्तरावरील नियोजन समितीचे सदस्य असतील.

नॉन-पार्ट IX भागातील जिल्हा परिषदावरील बाबींचा विचार करताना ग्रामीण भागासाठी जिल्हा विकास आराखडा तयार करताना पुढील बाबींचा प्राधान्याने विचार करावा.

1) विकासातील असमानता दूर करणे.
2) समाजातील वगळलेल्या घटकांसाठी आर्थिक, सामाजिक व भौगोलिक स्तरावर विकास करणे.
3) भौगोलिक गरजांनुसार आर्थिक विकास व दारिद्रय नर्मुलन कार्यक्रम.
4) विविध योजनांचे एकत्रिकरण करुन सर्वांगीण सर्वसमावेशक शाश्वत विकास करणे.
5) महिला सबळीकरण व लिंग समस्या.
6) योजना तयार करताना शाश्वत विकास लक्ष्यांचे स्थानिकीकरण करणे.
7) योग्य प्रमाणात पायाभुत सुविधांची तरतुद करणे. उदा. पिण्याचे पाणी, स्वच्छता इ.
8) सामाजिक, आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वपुर्ण सामाजिक सुविधा पुरविणे व देखभाल करणे.
9) समाजातील उपेक्षीत घटकांच्या गरजा भागविणे.
10) इ- साक्षरता.

## प्रकरण- ९

# जिल्हा नियोजन समितीने विकास आराखडयाचा मसुदा तयार करणे.

**९.१ जिल्हा नियोजन समितीसाठी घटनात्मक तरतुदी -**

भारतीय राज्यघटनेचे कलम २४३ झेड डी नुसार राज्यांना जिल्हा नियोजन समिती गठीत करणे बंधनकारक आहे. जिल्हयातील सर्व ग्रामपंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेले आराखडयांचे एकत्रिकरण करुन विकास आराखडयाचा मसुदा तयार करणे जिल्हा नियोजन समितीस बंधनकारक आहे. कलम २४३ Z(D) मध्ये खालील तरतुदी आहेत.

**कलम २४३ Z(D) जिल्हा नियोजन समिती –**

1) प्रत्येक राज्याने प्रत्येक जिल्हयासाठी जिल्हा नियोजन समिती गठीत करावी. ही समिती जिल्हयातील ग्रामपंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या विकास आराखडयांचे एकत्रिकरण करेल व जिल्हयासाठी विकास आराखडयाचा मसुदा तयार करेल.

2) राज्याचे विधी मंडळ कायद्यानुसार तरतुदी करतील.

अ) जिल्हा नियोजन समितीची रचना –

ब) अशा समिती मधील जागा भरण्याची पध्दत

परंतु, अशा समितीचे निवडून आलेले एकुण सदस्य ४/५ संख्येपेक्षा कमी नसतील. सदस्य हे जिल्हा परिषदेचे व नगरपालिकेचे निवडून आलेले सदस्य असतील व हे ग्रामीण व शहरी लोकसंख्येच्या प्रमाणात असतील.

क) जिल्हा नियोजन संदर्भातील कामे अशा समित्यांना दिली जातील.

ड) अशा समित्यांचे अध्यक्ष निवडले जातात.

३) प्रत्येक जिल्हा नियोजन समिती विकास आराखडयाचा मसुदा तयार करेल.

अ) संबंधित आहे.

i) पंचायत व नगरपालिका यांचे समान गरजा असलेले विषय, स्थानिक नियोजन, पाणी आणि इतर भौतिक संसाधनांचे वाटप व पायाभुत सुविधा व पर्यावरण संवंर्धनाचा एकात्मिक विकास याचे नियोजन.

ii) उपलब्ध संसाधनांची व्याप्ती उदा. आर्थिक किंवा इतर.

ब) राज्यपालांच्या आदेशानुसार अशा संस्थांशी सल्ला मसलत करु शकतात.

